रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८९▌अंक ३०२▌पृष्ठे १० ▌RGD/016/2026-28 www.krushival.in

# कृषीवल

रायगड, शनिवार, दि. ११ एप्रिल २०२६

किंमत ४ ₹

## तहसीलदार राकेश गिड्डेंचे अपघाती निधन



**केज :** लातूरकडे जात असताना रेणापूरजवळ नियंत्रण सुटल्याने कार उलटून झालेल्या भीषण अपघातात केजचे तहसीलदार राकेश अण्णासाहेब गिड्डे (३१) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. गिड्डे हे मूळचे सांगली जिल्ह्यातील येलडा येथील रहिवासी होते. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी तसेच दोन वर्षांची मुलगी आहे. केज येथील तहसीलदार राकेश अण्णासाहेब गिड्डे हे आपल्या ह्युंडाई क्रेटा कारने सकाळी लातूरकडे निघाले होते. रेणापूरजवळ कारवरील नियंत्रण सुटल्यामुळे गिड्डे यांची कार रस्त्याच्या बाजूला तीन चार कोलांटउड्या घेत उलटली.

**HIRING ALERT**
Looking For 2 waiters, 2 house boy
(Preffered Male Candidate)
Hotel : Outpost
Job Location : Alibaug
Salary As Per Industry Standards,
Age :- Below 40,
Relevant Experience : 4 to 6 years.
Interested candidates may connect immediately on 8010169688 / 7798467555 & email your latest resume on Sujit.patil@outpostalibaug.com and Pradeep.bhardwaj@Outpostalibaug.com and update your expected salary.

## वेधक

### मदतीच्या बहाण्याने जीवघेणा हल्ला

**पनवेल :** मदतीचा बहाणा करून दोघा लुटारूंनी एका व्यक्तीला निर्जनस्थळी नेऊन, त्यांच्यावर चाकूने जीवघेणा हल्ला करून त्याला लुटल्याची खळबळजनक घटना पनवेलमधील टेंभुर्डे गावाजवळ घडली. या हल्ल्यात सदर व्यक्ती गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. खांदेश्वर पोलिसांनी या प्रकरणातील दोघा लुटारूंविरोधात जबरी लुटीचा गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे. या घटनेत गंभीर जखमी झालेल्या व्यक्तीचे नाव गौतम मल्हारी हाके असे असून, ते पुण्यात राहण्यास आहेत. जखमी हाके यांना तातडीने एम.जी.एम. हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. त्यानंतर खांदेश्वर पोलिसांनी रुग्णालयात जाऊन हाके यांचा जबाब घेतला.

### दुचाकीस्वाराचा मृत्यू

**पनवेल :** कळंबोली सर्कल परिसरात झालेल्या अपघातात ४२ वर्षीय दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. फूरकान नासीर पटेल असे मृत व्यक्तीचे नाव असून, कंपनीतून काम संपवून घरी परत येत असताना हा अपघात घडला. पनवेल शहरातील पटेल मोहल्ला येथे राहणारे फूरकान पटेल हे कळंबोली सर्कलजवळील उड्डाणपुलावरून खाली उतरल्यानंतर त्यांच्या दुचाकीला मागून येणाऱ्या ट्रकने जोरदार धडक दिली. या धडकेत ते गंभीर जखमी झाले. त्यांना नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले; मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. याप्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून, सपोनि दत्तात्रय डफळ यांनी ट्रक चालक पांडुरंग गुजले (२४) याला ताब्यात घेतले आहे.

### अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**रसायनी :** नानीवली चौक येथील एका १४ वर्षे ७ महिने वयाच्या मुलीवर खरबाची वाडी येथील तरूणाने पीडित मुलगी अल्पवयीन असल्याची माहिती असतानाही तिच्याशी ओळख करून लग्नाचे आमिष दाखवून मोहोपाडा येथील रूमवर बळजबरीने शारीरिक संबंध करून तिला गर्भवती केले. ही बाब पीडित मुलीने आपल्या आईला सांगितली असता मुलगी अल्पवयीन असतानाही तिला सारसई, ता. पनवेल येथील कालिका माता मंदिरात बालविवाह लावून दिला. याबद्दल रसायनी पोलीस ठाण्यात कारवाई करण्यात आली आहे. अत्याचार करणारा तरूण (तिचा नवरा), मुलीची आई, सासू, सासरे व नातेवाईकांवर कारवाई करण्यात आली आहे.

## पेन्शनसाठी निधी नाही, मग योजनांवर हजारो कोटी का?

# ‘लाडकी बहीण’ योजना वादात

**उच्च न्यायालयाने सरकारला फटकारले**

**रायगडात पाच लाख लाभार्थी**

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्यातील ‘मुख्यमंत्री लाडकी बहीण’ योजना सध्या वादात सापडली असून, तब्बल २ कोटी ४३ लाख महिलांना दरमहा १,५०० रुपये देण्यासाठी सुमारे ४३,७४० कोटींचा खर्च होत आहे. यात रायगड जिल्ह्यातच ५ लाख २४ हजार महिला लाभार्थी आहेत. निवडणुकीत मते मिळवण्यासाठी महिलांना पैशाचे आमिष दाखवून ही योजना राबवण्यात आल्याचा आरोप होत असून, निधीअभावी इतर योजनांना फटका बसत असल्याने वाद अधिक तीव्र झाला आहे. दरम्यान, पेन्शन देण्यासाठी निधी नाही, मग योजनांवर हजारो कोटी खर्च का? अशा तीव्र शब्दात उच्च न्यायालयाने राज्य सरकारला खडे बोल सुनावले.

महायुती सरकारची महत्त्वाकांक्षी ‘मुख्यमंत्री लाडकी बहीण’ योजना आता न्यायालयाच्या कक्षेत येताच सरकारच्या आर्थिक प्राधान्यक्रमांवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगानुसार निवृत्तीवेतन देण्यासाठी निधी नसल्याचे सरकारकडून सांगितले जात असताना, दुसरीकडे हजारो कोटींच्या योजनांचा बोजा उचलला जात असल्याबद्दल मुंबई उच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली. ही

### प्राधान्यक्रमाचा पुनर्विचार करा!

“लाडकी बहीण योजनेसाठी कोट्यवधी नव्हे तर, हजारो कोटी रुपये उपलब्ध होतात; पण पेन्शनसारख्या मूलभूत हक्कांसाठी निधी कसा नाही?” असा थेट प्रश्न न्यायालयाने उपस्थित केला. अशा परिस्थितीत सरकारने आपल्या प्राधान्यक्रमांचा पुनर्विचार करणे आवश्यक असल्याचेही मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट करीत सरकारला खडे बोल सुनावले आहेत.

सुनावणी एका निवृत्त महिलेच्या याचिकेवर झाली. सातव्या वेतन आयोगानुसार लाभ न मिळाल्याने त्यांनी न्यायालयात धाव घेतली होती. यावर सरकारने निधीअभावी अडचणी असल्याचे स्पष्ट केले. मात्र, न्यायालयाने यावर थेट सवाल उपस्थित करत सरकारच्या धोरणांवर बोट ठेवले.

दरम्यान, या योजनेमुळे राज्याच्या तिजोरीवर प्रचंड आर्थिक ताण पडत असल्याचे स्पष्ट होत आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महिलांना आकर्षित करण्यासाठी ही योजना पुढे आणल्याचा आरोप होत असून, त्याचा परिणाम इतर महत्त्वाच्या योजनांवर होत असल्याची टीका वाढत आहे.

योजनेच्या अंमलबजावणीतही मोठ्या त्रुटी समोर येत आहेत. महिला व बालकल्याण विभागाच्या पडताळणीत पान २ वर



## आरसीएफ निधीवर ‘निरंक’चा खेळ

### जिल्हा रुग्णालय प्रशासनाचा गोंधळ उघड

- **७४.६९ लाख मिळूनही माहिती नाकारली**
- **नोंदीतील विसंगतीमुळे पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह**

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग जिल्हा रुग्णालयाला कोट्यवधींची मदत मिळूनही “निरंक” माहिती देण्याचा प्रकार उघडकीस आल्याने प्रशासनाच्या कारभारावर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. माहिती अधिकारातून समोर आलेल्या या प्रकाराने आरोग्य यंत्रणेतील नोंद व्यवस्थेतील ढिसाळपणा पुन्हा एकदा उघड झाला आहे. रायगड जिल्हा सामान्य रुग्णालय, अलिबाग येथे राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेड (आरसीएफ) कंपनीकडून निधीतून मिळालेल्या मदतीवरून मोठा गोंधळ उडाला आहे. माहिती अधिकार कार्यकर्ते संजय गंगाराम सावंत यांनी मागविलेल्या माहितीतून हा प्रकार उघडकीस आला.



माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत मिळालेल्या माहितीनुसार, सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात रुग्णालयाला रु. ७४.६९ लाखांचा निधी मिळाला होता. मात्र, सुरुवातीला या निधीबाबत “निरंक” माहिती देण्यात आल्याने संशयाची सुई प्रशासनाकडे वळली. यावर स्पष्टीकरण देताना रुग्णालय प्रशासनाने हा निधी कोविडसंदर्भात नसल्यामुळे माहिती देताना गैरसमज झाल्याचे सांगितले. पान २ वर

### पेणमध्ये मद्यधुंद डॉक्टरचा धिंगाणा

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण शहरात कायदा व सुव्यवस्थेला धक्का देणारी धक्कादायक घटना घडली असून, एका डॉक्टरनेच दारूच्या नशेत थेट पोलीस ठाण्यात घुसून गोंधळ घातल्याने खळबळ उडाली आहे. संगम वसंत पाटील (रा. फणस डोंगरी, गोळीबार मैदान) असे या डॉक्टरचे नाव असून, शहरातील चावडी नाका परिसरात त्रिवेणी हेल्थ केअर नावाचे त्याचे क्लिनिक आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सत्यजित पाटील हे अपंग व्यक्ती डॉ. पाटील यांच्या पान २ वर



### ‘सेलिब्रेशन’चा कर घोटाळा उघड




- **‘कृषीवल’च्या पाठपुराव्यानंतर मोठा खुलासा**
- **‘घरगुती’च्या आड लाखोंचा महसूल बुडवला**

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण तालुक्यातील बोरगाव ग्रामपंचायत हद्दीतील सेलिब्रेशन रिसॉर्ट प्रकरणाने नवे वळण घेतले असून, ‘घरगुती’ कराच्या आड वर्षानुवर्षे महसूल बुडवण्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणावर दैनिक कृषीवलने सातत्याने आवाज उठवल्यानंतर प्रशासनाला अखेर कारवाई करावी लागली.

**कृषीवल इफेक्ट**

बोरगाव ग्रामपंचायत हद्दीतील सेलिब्रेशन रिसॉर्टवर अलीकडेच पोलिसांनी टाकलेल्या पान २ वर

## पोटनिवडणुकांसाठी लगबग

- **उमेदवारी अर्ज भरण्याला वेग**
- **२८ एप्रिलला मतदान**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील १२७ ग्रामपंचायतींमधील ३० सरपंच आणि १७० सदस्यपदांसाठी पोटनिवडणुका जाहीर झाल्या असून, या पार्श्वभूमीवर उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया वेगाने सुरू झाली आहे. एकूण २०० जागांसाठी होणाऱ्या या निवडणुकांचे मतदान २८ एप्रिल रोजी होणार आहे. उमेदवारी अर्ज भरण्यास शनिवार (दि. ४) पासून सुरुवात झाली असून, विविध राजकीय पक्षांचे कार्यकर्ते आणि इच्छुक उमेदवार अर्ज भरण्यासाठी सक्रिय झाले आहेत. निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासकीय यंत्रणाही सज्ज झाली आहे.

उरण तालुका वगळता जिल्ह्यातील उर्वरित १४ तालुक्यांतील ग्रामपंचायतींमध्ये या पोटनिवडणुका होणार आहेत. अलिबाग तालुक्यातील सहा ग्रामपंचायतींमध्ये १० सदस्य आणि १ थेट सरपंच अशा ११ जागांसाठी निवडणूक होणार आहे. मुरुडमध्ये सहा ग्रामपंचायतींमध्ये १५ सदस्यपदांसाठी लढत होईल, तर पनवेलमध्ये दोन पान २ वर





### अलिबागमध्ये अकरा अर्ज दाखल

अलिबाग तालुक्यातील सहा ग्रामपंचायतींमधील पोटनिवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली असून, आतापर्यंत एकूण ११ अर्ज प्राप्त झाले आहेत. यामध्ये एक सरपंच पदासाठी आणि दहा सदस्य पदांसाठी अर्जांचा समावेश आहे. नवेदर नवगाव ग्रामपंचायतीमध्ये सरपंच व एक सदस्य अशा दोन जागांसाठी निवडणूक होणार आहे. कोप्रोलीमध्ये पाच सदस्य, रेवदंडामध्ये एक सदस्य, वैजाळीमध्ये एक सदस्य, खंडाळेमध्ये एक सदस्य आणि नागावमध्ये एक सदस्य पदासाठी निवडणूक घेतली जाणार आहे. या निवडणुकांमध्ये विविध जागा आरक्षणानुसार राखीव ठेवण्यात आल्या आहेत. खंडाळेमध्ये सर्वसाधारण महिला, नागावमध्ये सर्वसाधारण, रेवदंडामध्ये अनुसूचित जमाती स्त्री, वैजाळीमध्ये सर्वसाधारण, नवेदर नवगावमध्ये अनुसूचित जमाती स्त्री, तसेच कोप्रोलीमध्ये अनुसूचित जमाती, अनुसूचित जमाती स्त्री आणि सर्वसाधारण अशा प्रवर्गांसाठी जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत, अशी माहिती अलिबाग तहसील कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

**राष्ट्रीय लोक अदालत ठरणार दिलासादायक** | **९ मे रोजी रायगड जिल्ह्यात सर्वत्र आयोजन**

## ८० हजार प्रकरणांचा होणार निपटारा

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

न्यायालयीन प्रलंबित तसेच दाखलपूर्व प्रकरणांचा निपटारा जलद गतीने व्हावा, यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या ९ मे रोजी रायगड जिल्ह्यात सर्व न्यायालयीन ठिकाणी ही लोक अदालत पार पडणार असून, सुमारे ८० हजार प्रकरणे जागेवरच निकाली काढण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याची माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव तथा वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश तेजस्वीनी निराळे यांनी दिली.



प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष राजेंद्र द. सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवारी (दि. १०) पत्रकार परिषद घेण्यात आली. यावेळी लोक अदालतीचे महत्त्व आणि उद्दिष्ट स्पष्ट करण्यात आले.

रायगड जिल्ह्यात यापूर्वी १४ मार्च रोजी लोक अदालत घेण्यात आली होती. या अदालतीत ६,४९३ प्रलंबित आणि ७८,३२४ दाखलपूर्व अशा एकूण ८४,८१७ प्रकरणांचा निपटारा करण्यात आला होता. त्याच धर्तीवर आता ९ मे रोजी होणाऱ्या लोक अदालतीत सुमारे २० हजार प्रलंबित आणि ६० हजार दाखलपूर्व प्रकरणे सामोपचाराने पान २ वर

### पुन्हा फुलले संसार

रायगड जिल्ह्यात २२ मार्च २०२५ ते १४ मार्च २०२६ या कालावधीत पाच वेळा लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले. या कालावधीत प्रलंबित आणि दाखलपूर्व प्रकरणांचा सामोपचाराने निपटारा करण्यात आला. विशेषतः वैवाहिक वादांवर भर देण्यात आला होता. या लोक अदालतींमधून तब्बल ३१ जोडप्यांचे वाद मिटवून त्यांचा संसार पुन्हा सुरळीत करण्यात आला. त्यामध्ये २२ मार्च २०२५ रोजी ४, १० मे २०२५ रोजी ५, १३ सप्टेंबर २०२५ रोजी ५, १३ डिसेंबर २०२५ रोजी ११ आणि १४ मार्च २०२६ रोजी ६ प्रकरणांचा समावेश आहे. या उपक्रमामुळे अनेक कुटुंबांना नव्याने आयुष्याची सुरुवात करण्याची संधी मिळाली आहे.



# माथेरान भाजपचा प्रदेशाध्यक्षांवर भरोसा नाय?

## रवींद्र चव्हाणांच्या पत्रानंतरही कार्यकर्ते प्रसाद लाडांच्या भेटीला

| नेरळ | प्रतिनिधी |

माथेरानमधील हात रिक्षा चालकांच्या पुनर्वसनाचा प्रश्न सध्या ऐरणीवर आला असताना भाजपच्या स्थानिक कार्यकर्त्यांच्या हालचालींमुळे राजकीय चर्चांना उधाण आले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पर्यावरणपूरक ई-रिक्षा देण्याची मागणी करत हात रिक्षा चालक आंदोलन करत असताना, प्रदेशाध्यक्षांनी मुख्यमंत्र्यांना पत्र दिल्यानंतरही भाजप कार्यकर्ते थेट आमदार प्रसाद लाड यांच्या भेटीला गेल्याने पक्षांतर्गत समन्वयावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



माथेरानमध्ये ''माणसाने माणसाला ओढण्याची'' अमानवी प्रथा बंद करून ९४ हात रिक्षा चालकांचे पुनर्वसन करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने ऑगस्ट २०२५ मध्ये दिले होते. मात्र, अद्याप राज्य सरकारकडून ठोस अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे हात रिक्षा चालकांकडून पर्यावरणपूरक ई-रिक्षा देण्याची मागणी करत विविध स्तरांवर पाठपुरावा सुरू आहे.

याच पार्श्वभूमीवर दोन दिवसांपूर्वी हात रिक्षा चालकांसह भाजप कार्यकर्त्यांनी राज्याचे भाजप प्रदेशाध्यक्ष आणि माजी मंत्री रवींद्र चव्हाण यांची भेट घेतली होती. या भेटीत चव्हाण यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून ९४ हात रिक्षा चालकांना ई-रिक्षा उपलब्ध करून देण्याची मागणी केली. तसेच लवकरच बैठक आयोजित करण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे आश्वासन त्यांनी दिले.

मात्र, या घडामोडीनंतर अवघ्या दोनच दिवसांत माथेरानमधील भाजप पदाधिकाऱ्यांनी विधान परिषद सदस्य प्रसाद लाड यांची भेट घेतली. या वेळी भाजप तालुकाध्यक्ष प्रवीण सकपाळ, नगरपालिकेचे उपाध्यक्ष संतोष शेलार, श्रमिक रिक्षा संघटनेचे अध्यक्ष शकील पटेल, सचिव सुनील शिंदे तसेच शिवसेना शिंदे गटाचे शहरप्रमुख व माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर उपस्थित होते.

या बैठकीत मनोज खेडकर यांनी ई-रिक्षा संदर्भात प्रत्यक्ष ग्राउंड रिपोर्ट तपासण्याची मागणी शासनाकडे करावी, अशी विनंती केली. तर संतोष शेलार यांनी माथेरान नगरपालिकेने सर्व ९४ हात रिक्षा चालकांना ई-रिक्षा देण्याचा ठराव केल्याची माहिती दिली. प्रसाद लाड यांनीही विधान परिषदेत हा मुद्दा उपस्थित केल्याचे सांगत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. या सर्व घडामोडींमुळे माथेरानमधील भाजपमध्ये नेमका समन्वय आहे की संभ्रम, असा सवाल उपस्थित होत आहे.

### कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम

प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी थेट मुख्यमंत्र्यांना पत्र देऊन प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न सुरू असताना, स्थानिक भाजप पदाधिकाऱ्यांनी पुन्हा आमदार प्रसाद लाड यांची भेट घेणे चर्चेचा विषय ठरले आहे. सामान्यतः प्रदेशाध्यक्षांच्या पत्रानंतर तातडीने शासनस्तरावर हालचाली अपेक्षित असतात. मात्र, तरीही स्थानिक कार्यकर्ते वेगवेगळ्या स्तरावर पाठपुरावा करत असल्याने, त्यांना स्वतःच्या पक्षाच्या प्रदेश नेतृत्वावर पूर्ण विश्वास आहे का, असा सवाल उपस्थित होत आहे. यामुळे माथेरान भाजपमध्ये निर्णय प्रक्रियेबाबत संभ्रम असून, कार्यकर्त्यांचा कल नेमका कुणाकडे आहे, यावर राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे गौळवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे, या मिळकतीचे मालक सदाशिव पांडुरंग माळी यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ एकक हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ३०/२/अ | ००-१८-८० | १.१९ |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतींबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून, ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक- ११ एप्रिल २०२६

ॲड.शरद आर. सावंत
बी. कॉम. एल. एल. बी.
पत्ता - सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग, विहंग को.ऑ. हौ. सो. लि. कोतवालनगर कर्जत ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

# कोप्रोली प्राथमिक आरोग्य केंद्र सलाईनवर



- कोप्रोली आरोग्य केंद्रात रिक्त पदामुळे रुग्णांची हेळसांड
- दोन डॉक्टर, २३ आरोग्य सेविकांची पदे रिक्त

| उरण | प्रतिनिधी |

तालुक्यातील आरोग्य विभागाची अतिशय दुर्दशा झाली आहे. अनेक वर्षांपासून लोकप्रतिनिधी व शासकीय अधिकाऱ्यांच्या अनास्थेमुळे उरणमधील आरोग्य व्यवस्था व्हेंटिलेटर आहे. आरोग्य विभागाच्या दुर्लक्षामुळे कोप्रोली प्राथमिक आरोग्य केंद्रच सलाईनवर गेले आहे. कोप्रोली केंद्रात डॉक्टर आणि आरोग्य सेविका व इतर कर्मचारी अशी २७ पदे रिक्त आहेत. त्यामुळे उरण ग्रामीण भागातील हजारो गर्भवती महिला, नवजात बालकांची तपासणी आणि इतर कामांचा भार अवघ्या तीन आरोग्य सेविकांवर आहे.

उरण तालुक्यातील दोन लाख लोकसंख्येसाठी येथील शासकीय इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय व कोप्रोली येथील प्राथमिक आरोग्य केंद्र एकमेव आधार आहे. उरणच्या पूर्व भागातील सुमारे एक लाख गोरगरीब नागरिक उपचारासाठी कोप्रोली प्राथमिक आरोग्य केंद्राकडे धाव घेतात. मात्र, मागील आठवड्यात उद्भवलेली पाणदिव्यातील डेंग्यूची साथ आटोक्यात आल्यानंतर आता कोप्रोली प्राथमिक आरोग्य केंद्राच्या अनेक उणिवा समोर आल्या आहेत.

कोप्रोली प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी वैद्यकीय अधिकारी ३, महिला आरोग्य परिचारिका २, आरोग्य सेविका २६, शिपाई २ आदी ३३ पदे मंजूर आहेत. यामध्ये आवश्यकता असलेल्या तीन सुरक्षारक्षकांचा समावेश नाही. मात्र, यापैकी वैद्यकीय अधिकारी २, महिला आरोग्य परिचारिका १, आरोग्य सेविका २३, शिपाई २ अशी एकूण २७ पदे रिक्त आहेत.

रुग्ण तपासणीचा भार केवळ तीन आरोग्य सेविकांवर असल्यामुळे येथील आरोग्य सेवेचा परिणाम रुग्णावर होत आहे. रिक्त पदांमुळे रुग्णांची हेळसांड होत असल्याची बाब अनेकदा समोर आली आहे. रिक्त पदांमुळे आरोग्य केंद्राच्या कामकाजावर परिणाम होत आहे. वेळेत उपचार होत नसल्याने रुग्णांची हेळसांड होत आहे.

# चवदार तळ्याच्या पाण्याचा बेकायदेशीर उपसा



| महाड | प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यातील महाड नगरपरिषदेच्या मालकीच्या ऐतिहासिक चवदार तळ्यातून बेकायदेशीररित्या पाण्याचा उपसा केल्याचा प्रकार समोर आला आहे. काही दिवसांपूर्वी सकाळच्या सुमारास धनंजय जाधव या खाजगी ठेकेदाराने चार ते पाच पंपांच्या सहाय्याने तळ्यातील पाणी बाहेर काढल्याची माहिती स्थानिक नगरसेवकांनी मुख्याधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली.

सुमारे दोन तास चाललेल्या या पंपिंगमुळे तळ्यालगतच्या विहिरींच्या पाण्याची पातळी कमी झाल्याची चर्चा शहरात सुरू आहे. आधीच पाणीटंचाईचा सामना करणाऱ्या महाडमध्ये या घटनेमुळे भविष्यात गंभीर टंचाई निर्माण होण्याची भीती नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

नगरपरिषदेची कोणतीही परवानगी न घेता पाण्याचा उपसा केल्याचा आरोप होत असून, संबंधित ठेकेदारावर कठोर कारवाई करण्याची मागणी काही नगरसेवकांनी केली आहे. दरम्यान, याप्रकरणी तक्रार दाखल करण्यात आली असून, चौकशी सुरू असल्याची माहिती महाड नगरपालिकेचे मुख्याधिकारी धनंजय कोळेकर यांनी दिली. चौकशी अहवालाच्या आधारे संबंधित ठेकेदारावर योग्य ती कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे गौळवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे, या मिळकतीचे मालक वासुदेव वाळकू गायकर व राजेंद्र वाळकू गायकर यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ एकक हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ३०/३ | ००-३१-१० यापैकी क्षेत्र | २.३१ |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतींबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून, ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणा-या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक- ११ एप्रिल २०२६

ॲड.शरद आर. सावंत
बी. कॉम. एल. एल. बी.
पत्ता - सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग, विहंग को.ऑ. हौ. सो. लि. कोतवालनगर कर्जत ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५

जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की मौजे देऊळवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक बेबीबाई आत्माराम बोराडे वै ६ यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहे सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

मोजे देऊळवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत :

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ८३ | ४०/अ | ०-८७-०० पैकी खरेदी देणार यांचे अविभक्त हिश्श्याचे क्षेत्र | ०-४४ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ११/०४/२०२६

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
किशोर तुकाराम देशमुख
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ९४२२०६८७५५

जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाच्या बागायती मिळकती त्यात स्थित असलेल्या घर मिळकतीसह विद्यमान मालक श्रीमती कस्तुर उर्फ कस्तुरबेन दामजी वेलाणी व श्री. राहुल दामजी वेलाणी, रा. घाटकोपर, मुंबई यांचेकडून विकत घेण्याचे ठरविलेले आहे व त्याबाबत उभयपक्षी सामंजस्य करारनामा सुध्दा स्वाक्षरीत करण्यात आलेला आहे.

मिळकतींचे वर्णन

| अ. क्र. | गट नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रू.पैसे | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | ७४ | ०-०६-५० | १.५५ | श्रीमती कस्तुर उर्फ कस्तुरबेन दामजी वेलाणी श्री. राहुल दामजी वेलाणी |
| २ | ८० | ०-०५-२० | १.२३ | श्रीमती कस्तुर उर्फ कस्तुरबेन दामजी वेलाणी |
| ३ | ८२ | ०-०५-०० | १.१५ | श्री. राहुल दामजी वेलाणी |

व अ.क्र.१ कडील मिळकतीमध्ये स्थित असलेले ग्रामपंचायत आवास घर क्र. १३८ ही घर मिळकत सुध्दा.

तरी वर नमुद बागायती मिळकती व त्यातील घर मिळकत या संदर्भात कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, मालकी, वहिवाट, कुळ, ताबा, कब्जा, तारण,गहाण, लिज, लिन, साठेकरार, बोजा, वहिवाटीचे मार्ग अथवा इतर कसल्याही प्रकारचा हक्क असल्यास त्यांनी आपली लेखी हरकत योग्य त्या कागदपत्रांसह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ (पंधरा) दिवसांचे आत सादर करावी. वरील मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकती निर्वेध आहेत असे समजून आमचे अशिल सदरील खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दिनांक : ११/०४/२०२६

सही/-
ॲड. जयेश अ. जोशी
९३२, टिळक रोड, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड

पान १ वरून

## ‘लाडकी बहीण’ योजना वादात

तब्बल ७१ लाख महिला अपात्र ठरल्या असून, ई-केवायसी न केल्यामुळे अनेक लाभार्थ्यांना योजनेतून वगळण्यात आले आहे. काही प्रकरणांमध्ये नियमबाह्य लाभ घेतल्याचेही उघड झाले आहे. या सर्व पार्श्वभूमीवर राज्य सरकारने आता लाभार्थ्यांची नव्याने तपासणी सुरू केली असून, अपात्रांना वगळण्याची प्रक्रिया वेगाने सुरू आहे. मात्र, न्यायालयाच्या कडक निरीक्षणांनंतर सरकार या योजनेत बदल करणार की कायम ठेवणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## आरसीएफ निधीवर ‘निरंक’चा खेळ

प्रत्यक्षात या निधीतून रुग्णालयातील दुरुस्ती व वैद्यकीय उपकरणांसाठी सुमारे रु. ७४.४८ लाख खर्च झाल्याचेही स्पष्ट करण्यात आले. तसेच २०२२-२३ मध्ये आरसीएफमार्फत सीएसआर अंतर्गत उपकरणे देणगी स्वरूपात देण्यात आली होती. मात्र, ही उपकरणे १ एप्रिल २०२३ रोजी प्रत्यक्षात रुग्णालयात दाखल झाल्याने त्यापूर्वीच्या नोंदीत ती दिसली नाहीत आणि त्यामुळे ''निरंक'' उत्तर देण्यात आल्याचे प्रशासनाने सांगितले.

दरम्यान, प्रशासनाने या गोंधळाबाबत लेखी स्पष्टीकरण देत वस्तुस्थिती मान्य करण्याचे आवाहन केले असून, देण्यात आलेल्या उपकरणांचे फोटोही सादर केल्याचे नमूद केले आहे. मात्र, एकीकडे कोट्यवधींचा निधी आणि अत्याधुनिक उपकरणे मिळाल्याचे स्पष्ट होत असताना दुसरीकडे ''निरंक'' माहिती देण्यात आल्याने प्रशासनाच्या पारदर्शकतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दरम्यान, आरसीएफचे वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी डॉ. राकेश कवळे यांनी खुलासा करताना सांगितले की, कंपनीने अंतर्गत अलिबाग सिव्हिल हॉस्पिटलसाठी मोठ्या प्रमाणावर निधी आणि अत्याधुनिक उपकरणे उपलब्ध करून दिली आहेत. २०२०-२१ मध्ये रु. ७४.६९ लाखांचा निधी, तर २०२२-२३ मध्ये रु. १.३७ कोटींची उपकरणे देण्यात आली. याशिवाय औषधे, ऑक्सिजन प्लांट व नर्सिंग सुविधा उभारणीसाठीही मोठे योगदान देण्यात आले आहे. या सर्व प्रकरणामुळे प्रशासनाच्या कामकाजातील त्रुटी पुन्हा एकदा समोर आल्या असून, संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.

## ‘सेलिब्रेशन’चा कर घोटाळा उघड

धाडीत वेश्या व्यवसायाचा पर्दाफाश झाल्यानंतर या प्रकरणातील अनियमितता आता एकामागोमाग एक उघड होत आहेत. त्यातच रिसॉर्टवर अनेक वर्षे व्यावसायिक कराऐवजी ‘घरगुती’ कर आकारण्यात आल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. कृषीवलने या प्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा करत संबंधित प्रशासनाचे लक्ष वेधले होते. त्यानंतर समोर आलेल्या माहितीनुसार, पूर्णतः व्यावसायिक वापरासाठी उभारलेल्या या रिसॉर्टला मुद्दाम ‘घरगुती’ कर लावण्यात आला होता. हा प्रकार केवळ निष्काळजीपणाचा नसून, हेतुपुरस्सर दुर्लक्ष केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. २५ मार्च रोजी गटविकास अधिकारी गजानन लेंडी यांना याबाबत माहिती देण्यात आल्यानंतर त्यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९६० च्या कलम १२४ अंतर्गत तातडीने चौकशीचे आदेश दिले. चौकशीत रिसॉर्टवर चुकीचा कर लावल्याचे स्पष्ट झाले असून, यामध्ये ग्रामसेवकाची जबाबदारी ठळकपणे समोर आली आहे. एखादे बांधकाम घरगुती की व्यावसायिक याची खातरजमा करणे हे ग्रामसेवकाचे कर्तव्य असताना, बोरगावमध्ये गेल्या ८-९ वर्षांपासून एकाच ग्रामसेवकाच्या अखत्यारीत हा कारभार सुरू असल्याने ‘हितसंबंध’ जोपासले गेले का, असा थेट सवाल उपस्थित होत आहे. एवढ्या मोठ्या रिसॉर्टकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होणे संशयास्पद मानले जात आहे.

दरम्यान, गटविकास अधिकाऱ्यांनी आता स्पष्ट निर्देश देत, सेलीब्रेशन रिसॉर्टला बांधकामाच्या सुरुवातीपासूनच व्यावसायिक कर आकारण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे आता ग्रामपंचायतीच्या तिजोरीत लाखो रुपयांचा महसूल जमा होणार असून, संबंधितांवर पुढील कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## मद्यधुंद डॉक्टरचा धिंगाणा

विरोधात तक्रार देण्यासाठी पोलीस ठाण्यात आले होते. त्यावेळी त्यांच्या मागोमाग डॉ. पाटील ठाण्यात पोहोचले आणि त्यांनी सत्यजित पाटील यांना धमकावण्यास सुरुवात केली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलीस निरीक्षक संदीप बागूल यांनी डॉ. पाटील यांना केबिनमध्ये बोलावून समज देण्याचा प्रयत्न केला. मात्र, दारूच्या नशेत असलेल्या डॉक्टरने जोरजोरात आरडाओरडा व शिवीगाळ सुरू केली. केबिनबाहेर काढल्यानंतरही त्यांनी पोलीस अमलदाराशी धक्काबुक्की करत अश्लील शिवीगाळ केली. तसेच ''पत्रकारांना बोलावतो, पोलिसांना धंद्याला लावतो'' अशा शब्दांत धमकी देत अंमलदार कक्षातच उघडपणे गोंधळ घालत सरकारी कामात अडथळा निर्माण केला. याप्रकरणी पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपी डॉ. संगम वसंत पाटील यांना अटक करण्यात आली आहे. या घटनेमुळे पेण शहरात संतापाची लाट उसळली असून, समाजात जबाबदारीची भूमिका निभावणाऱ्या डॉक्टरकडून अशा प्रकारचे वर्तन अयोग्य असल्याच्या तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संदीप बागूल यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## पोटनिवडणुकांसाठी लगबग

ग्रामपंचायतींमध्ये दोन सदस्यपदांसाठी निवडणूक होणार आहे.

कर्जत तालुक्यात चार ग्रामपंचायतींमध्ये सहा सदस्य, खालापूरमध्ये पाच ग्रामपंचायतींमध्ये सहा सदस्य आणि एक सरपंच अशा सात जागा, रोहा येथे दोन ग्रामपंचायतींमध्ये पाच सदस्य, माणगावमध्ये १६ ग्रामपंचायतींमध्ये १५ सदस्य व दोन थेट सरपंच अशा १७ जागा, सुधागड (पाली) मध्ये सहा ग्रामपंचायतींमध्ये सात सदस्य व एक सरपंच अशा आठ जागा, तळा येथे सहा ग्रामपंचायतींमध्ये १४ सदस्य पदांसाठी निवडणूक होणार आहे.

महाडमध्ये ३१ ग्रामपंचायतींमध्ये ३३ सदस्य व १३ थेट सरपंच अशा एकूण ४६ जागा, पोलादपूरमध्ये १७ ग्रामपंचायतींमध्ये १७ सदस्य व पाच सरपंच अशा २२ जागा, श्रीवर्धनमध्ये आठ ग्रामपंचायतींमध्ये १९ सदस्य व तीन सरपंच अशा २२ जागा, तर म्हसळा तालुक्यात ११ ग्रामपंचायतींमध्ये १२ सदस्य व दोन सरपंच अशा १४ जागांसाठी निवडणूक होणार आहे.

अलिबाग तालुक्यातील नवेदर नवगाव, कोप्रोली, रेवदंडा, वैजाळी, खंडाळे आणि नागाव या सहा ग्रामपंचायतींमध्ये पोटनिवडणुका होणार आहेत. यामध्ये एक सरपंच पद व दहा सदस्यपदांसाठी मतदान होणार आहे. नवेदर नवगावमध्ये थेट सरपंच पदासाठी निवडणूक होणार असून, इतर ग्रामपंचायतींमध्ये सदस्यपदांसाठी निवडणूक घेतली जाणार आहे.

दरम्यान, उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम तारीख १३ एप्रिल असून, त्यामुळे अर्ज भरण्यासाठी मर्यादित कालावधी शिल्लक राहिला आहे. १५ एप्रिल रोजी अर्जांची छाननी, १७ एप्रिल रोजी माघार प्रक्रिया आणि त्याच दिवशी अंतिम उमेदवारांची यादी जाहीर केली जाणार आहे. २८ एप्रिल रोजी सकाळी साडेसात वाजल्यापासून मतदान प्रक्रिया सुरू होणार असून, मतमोजणी २९ एप्रिल रोजी केली जाणार आहे.

## ८० हजार प्रकरणांचा होणार निपटारा

सोडविण्यात येणार आहेत. या लोक अदालतीत वीज, पाणी तडजोडी, बँक व्यवहार, कामगार प्रकरणे, फौजदारी, धनादेश अनादर (चेक बाऊन्स), अपघात, वैवाहिक वाद, नोकरी विषयक, महसूल तसेच भाडे संबंधित विविध प्रकारची प्रकरणे निकाली काढली जाणार आहेत. न्यायाधीश, तज्ज्ञ वकील आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या मदतीने ही प्रक्रिया पार पडते. विशेष म्हणजे, या लोक अदालतीत कोणतीही कोर्ट फी भरावी लागत नाही. तसेच येथे झालेल्या निर्णयाविरुद्ध अपील करता येत नाही. उलट, लोक अदालतीत निकाली निघालेल्या प्रकरणांमध्ये भरलेली कोर्ट फी कायद्यानुसार परत मिळते, हे या उपक्रमाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य असल्याचेही निराळे यांनी सांगितले.

PUBLIC NOTICE

DOCUMENTS MISSING

Notice is hereby given that the property being land plot no. 29, comprised in survey no.25 and 26 and city survey no 1294.Alibag raigad.I Kamran Shamshad Ansari. aged 45 years. Residing A24,Shribag No.2, Alibag, Raigad..(adhar no 4740 4354 5199) Hrerby infrom to the general public my lost/misplace of original document.date of 23/03/2026 my property registeredin document no 622/1988 of the original sale deed registered in document no 622/1988 Dated 30/05/1988 registered at sub registrar office alibag raigad. My client was travelling near alibag bus stand unfortunately the above saide original doucument have fell down from the same are not traceable. FIR has Lodged in alibag police station NCR / lost Property registration NO.0288/2026 date of 24/3/2026 If any find the said document please contact over phone no. 9673056955 and if anybody is in possession of the original document relating to the saide property they are requested to hand over the same to the below address.

Adv.Rasika Amar Joshi.
Res.: Parvatinandan, SResidency Near
Balkrushana Apartment, Shivaji nagar,
chendhare, Alibag, raigad, 402201
Mob. No. 7020271126

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.कामरान शमशाद अन्सारी, वय ४५ वर्ष ए रा. श्रीबाग अलिबाग, रायगड यांच्या मालकीची मौजे श्रीबाग-२ ता. अलिबाग, जि. रायगड येथील भुमापन क्र. २५ व २६, सिटी सर्व्हे नं १२९४ मधील भुखंड श्रीबाग क्षेत्र विकास योजना नं. २ मधील भुखंड नं. ई - २९, क्षेत्र ५० चौ.मीटर या मिळकतीचे खरेदीखताचे ता. ३०/०५/१९८८ रोजी दुय्यम निबंधक कार्यालय अलिबाग येथे नोंदणीकृत केले खरेदीखत दस्त क्र ६२२/१९८८ हा आमचे ता. २३/०३/२०२६ रोजी अशिलांकडुन अलिबाग मध्ये प्रवास करित असताना कोठेतरी पडून गहाळ झाला झालेला आहे. तशी दस्त हरविल्याची तक्रार अलिबाग पोलीस ठाणे येथे ता.२४/०३/२०२६ रोजी नोंदणीकृत केलेली आहे.

तरी, सदरचा खरेदीखत दस्त कोणाला सापडला/मिळाला असल्यास कृपया त्या व्यक्तीने ९६७३०५६९५५ या क्रमांकावर संपर्क साधावा. आणि कोणाकडे सदर मालमत्तेशी संबधीत मुळ दस्तऐवज असेल त्यांनी तो खालील पत्यावर सुपुर्द करावा अशी विनंती आहे.

ॲड. रसिका अमर जोशी
पार्वतीनंदन सोसायटी,
बाळकृष्ण सोसायटी जवळ
शिवाजी नगर चेंढरे अलिबाग
७०२०२७११२६

अर्जदार तर्फे वकिल ॲड. अतुल अ. चौगुले

श्रीवर्धन येथील मा. दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) सो यांचे न्यायालयात

दिवाणी चौ. अर्ज नं.०८/२०२५
नि. ७/ड
ने. ता. ८/५/२६

-: जाहिर नोटीस :-

१) श्री. नितीन तुकाराम टाकळे
वय ४६, वर्षे, धंदा-नोकरी
२) श्रीम. सुलोचना तुकाराम टाकळे
वय ७६ वर्षे, धंदा-गृहीणी — अर्जदार
अर्जदार क्र. १ व २ राहणार मु. कातकरवाडी, बागमांडले, ता. श्रीवर्धन, जि. रायगड

विरूद्ध

१) श्रीम. सुनंदा तुकाराम टाकळे
वय ७० वर्षे, धंदा-गृहीणी
२) श्री. अभिषेक तुकाराम टाकळे
वय ३० वर्षे, धंदा-नोकरी — सामनेवाला
३) श्रीम. अश्विनी तुकाराम टाकळे
वय ३५ वर्षे, धंदा-गृहीणी
सामनेवाला क्र.१ ते ३ राहणार मु. गडबवाडी, पो. बागमांडला दांडा, ता. श्रीवर्धन, जि. रायगड

सर्व जनतेस या नोटीसीद्वारे कळिवण्यात येते की, गडबवाडी, ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथील मयत कै. तुकाराम भाऊ टाकळे यांचा मृत्यू त्यांच्या राहत्या घरी गडबवाडी, ता.श्रीवर्धन येथे दि. ०५/०७/२०२४ रोजी झाला आहे. त्यांच्या पश्चात मयताचे वारस अर्जदार क्र. १ व २ आणि सामनेवाला क्र. १ ते ३ आहेत. मयत कै. तुकाराम भाऊ टाकळे यांचा गडबवाडी येथे मृत्यू झालेला आहे. तरी त्यांच्या निधानानंतर त्याच्या पश्चात अर्जदार क्र. १ व २ आणि सामनेवाला क्र. १ ते ३ यांचे नाव हे सदर शासकीय, निमशासकीय, बँका, पतपेढ्या, तहसील, प्रांत, तलाठी, सर्कल करणे करिता अर्जदार हे कायदेशीर वारस असल्याबाबतचा सक्षम न्यायालयाचा वारस दाखला आणण्यास सांगितले. अर्जदार यांना वारस दाखल्याची आवश्यकता असल्याने वारस दाखला मिळण्याकरीता मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे. सदरचा वारस दाखला अर्जदारांना देण्याबाबत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत लेखी हरकत घेण्यात यावी. अन्यथा मागाहून येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नसून अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल.

आज दिनांक ०६/०४/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी जाहिर नोटीस प्रसिध्द केली.

श्रीवर्धन
ता. ०६/४/२०२६

सही/-
व. लिपीक
दिवाणी न्यायालय, श्रीवर्धन

सही /-
सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय, श्रीवर्धन

जा.क्र.६३२/२०२६
सहाय्यक धर्मादाय आयुक्त
कल्पतरु इमारत, पोस्ट ऑफिसजवळ
अलिबाग, जि.रायगड
दि. ०९-०४-२०२६

Public Trust Registration Office,
Raigad Region, Raigad
"Property No. 625, Ground Floor,
Near Maruti Mandir, At. Chendhare,
Post. & Tal. Alibag,
Dist. Raigad -402201
Date: 09/04/2026

Public Notice

Application No.: 150/2026
Name of Public Trust: KULKARNIBHAI BIRADAR JAMBHULWADI INMAT TRUST
Trust Registration No. : E-213
Applicant Name : Mr. Vinay Murlidhar Kulkarni

All concerned persons are hereby informed through this public notice that an application has been submitted to the Assistant Charity Commissioner, Raigad Division, Alibag, under Section 22 of the Mumbai Public Trusts Act, 1950.
Any person having objections to the entries mentioned below should submit their objections in writing within the prescribed period.
Details of Immovable Properties (Land Properties) to be Recorded.
1) Immovable Property (Description) - Land situated at Shrivardhan, Tal. Shrivardhan, Dist. Raigad

| Sr. No. | Village | C.S. Or Municipal No. Or Survey No. | Area |
|---|---|---|---|
| 1 | Shrivardhan | 342a, Hissa No. 1/A2, 342-A, Hissa No. 1/A-1 | 1. Trust Hall 100 x 52.9 =5290 Sq Ft 2. Two Blocks -312 Sq. Ft 3. Office- 126 Sq Ft |

Main Assessment Value:Rs.12728000/-
Boundaries:
On The East Side By: Government Hospital
On The West Side By: House of Mr. Gadre & Farm
On The South Side By: Road
On The North Side By: Farm of Mr. Gadre & Mr. Joshi

Any person having any objection regarding the above-mentioned property should submit their written objection with supporting documents to this office within 30 days from the date of publication of this notice.

If no objection is received within the stipulated period, it shall be presumed that no one has any objection, and further action will be taken accordingly. No objections raised after the prescribed period will be considered, and appropriate orders will be passed.

This notice is issued under my signature and seal by the Assistant Charity Commissioner,Raigad Division, Raigad, on 09/04/26

Superintendent
Public Trust Registration Office
Raigad Region, Raigad

# निवडक

## रेल्वे पूलाचे काम अंतिम टप्प्यात



**चिरनेर :** उरण पूर्व विभागातील वाहनांना व नागरिकांना दैनंदिन प्रवासासाठी मागील तीन वर्षांपूर्वी पाडण्यात येऊन नव्याने मध्यरेल्वेच्या वतीने बांधण्यात येत असलेल्या गव्हाणफाटा-चिरनेर मार्गांवरील कंटेनर मालवाहतूक रेल्वे ओव्हरहेड पूलाच्या स्लॅबचे काम झाले असून,आत्ता पुलावरील पादचारी मार्ग आणि पुलाच्या दोन्ही बाजूचे सरक्षक कठडे बांधण्याचे काम सुरु असून, एकंदरीत या पुलाचे काम अंतिम टप्प्यात आले असून, मार्च अखेर पूर्ण होणारे हे पुलाचे काम एप्रिल २०२६ अखेरीस पूर्ण होऊन वाहतुकीस खुला करण्यात येणार आहे. हा पूल वाहतुकीस खुला झाल्यानंतर दैनंदिन पाच हजार प्रवासी व वाहनचालकांची प्रतिक्षा संपणार असून, दररोजची मागील तीन वर्षांपासून होणारी गैरसोय दूर होणार असल्याने त्यांना दिलासा मिळणार आहे. त्यामुळे उरण पूर्व विभागातील चिरनेर,आवरे वशेणी, केळवणे खोपटा मार्गांवरील एसटी बस प्रवास सुरु होऊन रिक्षा व अन्य वाहनातून नागरिकांना पनवेल, मुंबई, नवी मुंबई व ठाणे मार्गांकडे जाण्यासाठी सुलभ होणार असून, प्रवास सुखकर होणार आहे. त्यामुळे वाहनचालक व प्रवाशांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झालेआहे. तीन वर्षे प्रतिक्षेत असलेल्या प्रवाशांची प्रतिक्षा संपणार असून, एक किमी वळसा घेऊन जाणाऱ्या वाहनांसाठी एप्रिल अखेरीस हा पूल वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार असल्याचे मध्यरेल्वेच्या सूत्रांकडून सांगण्यात आले आहे.

## घरफोडी करणारा पोलिसांच्या ताब्यात

**पनवेल :** पनवेल शहरातील तक्का तसेच करंजाडे परिसरात घरफोडी करणाऱ्या तिघा सराईत गुन्हेगाराना पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेऊन त्यांच्याकडून चोरीचा माल व रोख रक्कम हस्तगत केली आहे. शहरातील तक्का परिसरात आरोपी ललित शाही ( वय ३३), किशोर शाही (वय.२९) व शेरबहादूर शाही (वय. ३५) यांनी आपसात संगनमत करून जवळपास ६०,८८,००० रु किमतीचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम, घड्याळ घरफोडी करून चोरून नेले होते. तसेच प्रकारे करंजाडे येथे सुद्धा घरफोडी करून सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा लाखो रुपये किमतीचा ऐवज चोरून नेला होता. याबाबत तक्रार दाखल होताच वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विनोद लबडे, परेश म्हात्रे, गंथडे, वायकर, दिवेकर, सम्राट डाकी, विनोद देशमुख आदींच्या पथकाने आरोपीना ताब्यात घेऊन यांच्याकडून मोठ्या प्रमाणात चोरीचा माल हस्तगत केला आहे.

# ‘नो पार्किंग’मध्ये पार्किंग

## जिल्हा रुग्ण प्रशासनाचा गलथान कारभार

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

अलिबागमधील जिल्हा रुग्णालयाच्या आवारात ‘नो पार्किंगचे फलक लावण्यात आले आहेत. तरीदेखील त्याठिकाणी वाहने पार्कींग केली जातात. त्याचा त्रास येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांना होत आहे. रुग्ण प्रशासनाच्या गलथान कारभारामुळे नागरिकांमधून प्रचंड संताप व्यक्त केला जात आहे.



ग्रामीण व शहरी भागातील सर्वसामान्यांना चांगली आरोग्य सेवा मिळावी, म्हणून अलिबागध्ये ४० वर्षापूर्वी जिल्हा सामान्य रुग्णालय बांधण्यात आले. दुमजली बांधलेल्या या इमारतीमध्ये २०० खाटांचे रुग्णालय आहे. महिलांसह पुरूष लहान मुले अशा सर्व प्रकारच्या व्यक्तींच्या आजारांवर या रुग्णालयात उपचार केले जातात.

रुग्णालयामध्ये बाह्य रुग्ण कक्ष असून अस्थिव्यंग, दिव्यांग, डोळे, नाक कान घसा अशा आजारांवरील तज्ञ डॉक्टरांचे कक्ष आहे. या ठिकाणी प्राथमिक उपचारासाठी हजारोच्या संख्येने रुग्ण येतात. तसेच दाखल केलेल्या रुग्णांच्या आजारावरही रुग्णालयात उपचार केले जातात. जिल्ह्यात रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. अपघातासह वेगवेगळ्या आजारावर उपचार करण्यासाठी रुग्णालयात येणाऱ्यांची संख्या प्रचंड वाढली आहे. त्यामुळे रुगालयाच्या आवारात वाहनांची वर्दळही मोठ्या प्रमाणात होते.

जिल्हा रुग्णालयाच्या आवारात पार्किंगची योग्य व्यवस्था नसल्याचा त्रास सर्वसामान्यांना कायमच होत आला आहे. रुग्णालयाच्या आवारात ठिकठिकाणी करण्यात आलेल्या बांधकामामुळे वाहने कुठे पार्किंग करायची असा प्रश्न नागरिकांसमोर कायमच आहे. रुग्णालयाच्या आवारात पार्किंग व्यवस्था सुरळीत राहण्यासाठी रुग्ण प्रशासनाने खासगी सुरक्षा यंत्रणा तैनात केली आहे.

आवारात पार्कींग व ‘नो पार्किंग असे ठिकठिकाणी फलक लावण्यात आले आहेत. मात्र हे फलक फक्त नावापुरताच असल्याचे समोर आले आहे. नो पार्किंग असताना देखील रुग्णालयातील कर्मचाऱ्यांसह काही मंडळींकडून त्याठिकाणी बिनधास्तपणे वाहने पार्कींग केली जात आहेत. नो पार्किंगच्या फलकांकडे दुर्लक्ष करून वाहने पार्किंग केली जात असताना देखील तेथील सुरक्षा यंत्रणा व प्रशासनाकडून बघ्याची भूमिका घेतली जात आहे.

सर्वसामान्यांनी रुग्णालयाच्या प्रवेशद्वाराच्या बाजूला वाहने पार्किंग केल्यास प्रशासनाकडून त्यांना तंबी भरली जाते. मात्र, काही मंडळींनी नो पार्किंगच्या ठिकाणी पार्कींग केल्यावर मात्र त्यांना मान सन्मान देण्याचा प्रकार रुग्ण प्रशासनाकडून केला जात आहे. नो पार्किंगच्या ठिकाणी पार्किंग करणाऱ्यांविरोधात प्रशासनाकडून कोणतीही कारवाई होत नाही. रुग्ण प्रशासनाच्या या गलथान कारभाराबाबत सर्वसामान्यांकडून नाराजीचे सुर उमटत आहेत.

### रुगालयाच्या आवारात खडीचे साम्राज्य

अलिबागमधील जिल्हा रुग्णालयाच्या प्रवेशद्वारापासून मेडीकल कॉलेजच्या प्रशासकीय इमारतीच्या कार्यालयापर्यंतचा रस्ता खड्ड्यात गेला आहे. ठिकठिकाणी खडी पडली आहे. धुळीचा त्रासदेखील सर्वसामान्यांना होत आहे. त्याच रस्त्यावरून रुग्णांचीदेखील ने -आण होते. मात्र या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत प्रशासन उदासीन ठरल्याचे चित्र दिसून आले आहे.

## तळ्यात मिरची खरेदीला वेग



**| तळा | प्रतिनिधी |**

उन्हाळा सुरू झाला की महिला वर्ग स्वयंपाकासाठी लागणारा मसाला बनविण्याची लगबग सुरू झाली आहे. यासाठी बाजारपेठेत मसाला बनविण्यासाठी लागणाऱ्या शंकेश्वरी, बेडगी, गंटूर, तेजालवंगी जातीच्या मिरची विक्रीसाठी उपलब्ध झाल्या आहेत. साधारणतः मार्च ते एप्रिल महिन्यात गृहिणींची मसाला बनविण्याची लगबग सुरू होत असत. मात्र, ऐन हंगामामध्ये मिरचीचे भाव वाढत असल्यामुळे महिला वर्ग आधीपासूनच मिरचीची खरेदी करून तिला तीन ते चार वेळा उन्हात वाळवून मग आवश्यकतेनुसार त्यामध्ये गरम मसाला, धणे, बडीशोप इ.पदार्थ एकत्र करून मसाला तयार करून घेतात. गावाला बनविलेल्या मसाल्याने स्वयंपाकाला विशिष्ट चव येते हे माहीत असल्याने मुंबईला राहणारे चाकरमानी देखील गावाला असलेल्या आपल्या नातेवाईकांकडून गावावरूनच मसाला बनवून पाठविण्याचा आग्रह धरतात त्यामुळे गृहिणींची मिरची खरेदीसाठीची लगबग सुरू झाली आहे.

# नांदगाव विद्यालयात सेवापूर्ती सोहळा

**| पाली/गोमाशी | प्रतिनिधी |**

संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव येथे प्राचार्य बबन पालवे आणि चतुर्थ कर्मचारी काशिनाथ पवार यांच्या सेवापूर्ती सोहळ्याचे गुरुवारी (दि.९) एप्रिल रोजी कै नामदेवशेठ खैरे सभागृहात आयोजन करण्यात आले होते. या सेवापूर्ती सोहळ्यासाठी प्रमुख अतिथी म्हणून पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, भोराई शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सुरेश खैरे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

सेवापूर्ती सोहळ्यात प्राचार्य बबन पालवे आणि काशिनाथ पवार यांना चित्रलेखा पाटील आणि सुरेश खैरे यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. या सन्मान पत्राचे वाचन शिंदे स्वाती, शिंदे तन्मयी यांनी केले. तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक अशोक शिंदे यांनी केले




चित्रलेखा पाटील यांची प्रमुख उपस्थिती



शेकाप आणि पाटील कुटुंबीयांनी शिक्षणाला नेहमी प्राधान्य दिले आहे. आज पर्यंत जिल्ह्यात ४० हजार विद्यार्थ्यांना सायकल वाटप करण्यात आले आहे. तसेच या विद्यालयाच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी कोणतीही मदत लागली तर मी माझी शाळा म्हणून मदत करेल असे आश्वासन पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील यांनी सांगितले. कार्यक्रमासाठी शेकाप पदाधिकारी, पंचक्रोशीतील नागरिक, शिक्षक वृंद, सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा भूषण सुतार तर आभारप्रदर्शन महेंद्र निकुंभ यांनी केले.

# नवी मुंबई विमानतळावर आपत्ती व्यवस्थापनाचे धडे

- उंच इमारतींवरील बचावकार्याचे प्रात्यक्षिक
- सरावात अत्याधुनिक साधनांचा वापर





**| पनवेल | प्रतिनिधी |**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर आपत्ती व्यवस्थापनाची चाचणी घेण्यासाठी आपत्कालीन मॉक ड्रिल घेण्यात आले. या सरावात चक्रीवादळ परिस्थितीचे अनुकरण करून विविध यंत्रणांनी समन्वयाने आपत्कालीन प्रतिसाद कसा दिला जातो, याचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.

या मॉक ड्रिलमध्ये सिडको, नवी मुंबई महापालिका, पनवेल महापालिका, अग्निशामक दल, आग व बचाव सेवा, अपोलो हॉस्पिटल, फोर्टिस हॉस्पिटल, स्वदेश फाऊंडेशन आणि व्हाइट लोटस हॉस्पिटल यांचा सहभाग होता. आपत्कालीन परिस्थितीत तत्पर प्रतिसाद देण्यासाठी विमानतळावरील विमानतळ आपत्कालीन अग्निशमन सेवा पथकाने महत्त्वाची भूमिका बजावली. क्रॅश फायर टेंडर सारख्या अत्याधुनिक वाहनांच्या सहाय्याने विमान आगीसारख्या आपत्कालीन परिस्थितींमध्ये जलद प्रतिसाद कसा दिला जातो, याचे प्रात्यक्षिक करण्यात आले. पथकांनी अत्याधुनिक साधनांचा वापर करून अडकलेल्या नागरिकांना सुरक्षित बाहेर काढण्याचे प्रात्यक्षिक केले. ७० मीटर उंचीपर्यंत पोहोचणाऱ्या हायड्रॉलिक यंत्रणेच्या साह्याने उंच इमारतींवरील बचावकार्य प्रभावीपणे पार पाडले गेले.

या मोहिमेत केंद्र व राज्य शासनाचे विविध विभाग, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, सशस्त्र दले, केंद्रीय राखीव पोलीस दल, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण आणि अणुऊर्जा विभागांतील अधिकाऱ्यांनी सहभाग घेतला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हाधिकारी किशन जवळे, डॉ. दिनेशकुमार अस्वाल, मेजर जनरल अजय वर्मा, डॉ. विनोद कौशिक, सरस सेठ, मनोज सानप, पवन चांडक, तहसिलदार भामरे, डॉ. आनंद गोसावी, अमर सिंग, दीपक तिवारी, अमित कुमार, योगिता गवथे, श्रीदत्त कामत, सागर पाठक आदी मान्यवरांचा समावेश होता.

# ‘ग्रीन आशा’ जेएनपीएत दाखल

**| उरण | प्रतिनिधी |**

पश्चिम आशियातील तणावपूर्ण स्थितीच्या पार्श्वभूमीवर, ‘ग्रीन आशा’ हे एलपीजी वाहून नेणारे भारतीय जहाज यशस्वीरित्या भारत देशात दाखल झाले आहे. सुमारे १५ हजार टन एलपीजी घेऊन आलेले हे जहाज भारतीय नौदलाच्या देखरेखीखाली सुरक्षित मार्गक्रमण करत जेएनपीए बंदरात सुरक्षितपणे पोहोचले.




या जहाजाचे सुरक्षित आगमन हे भारताच्या ऊर्जा सुरक्षेसाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. ग्रीन आशाने इराणमधील लारक, केशम आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीचा संवेदनशील सागरी मार्ग यशस्वीरित्या पार केला. जेएनपीए बंदरातील बीपीसीएलच्या लिक्विड जेट्टीवर हे जहाज उभे करण्यात असून हा एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. आखातात व्रातात युद्धाला सुरुवात झाल्यापासून जेएनपीए बंदरात पोहोचलेले एलपीजी वाहून आणणारे हे पहिलेच जहाज आहे. ग्रीन आशाचे सुरक्षित आगमन हे केवळ एक यशस्वी सागरी ऑपरेशन नाही, तर भारताच्या ऊर्जासुरक्षेचा मजबूत आधार असल्याचे सांगण्यात आले.

## विदेशी मद्य साठ्याप्रकरणी कारवाई

**| पनवेल | प्रतिनिधी |**

बेकायदेशीररित्या विमल पान मसाल्यासह देशी-विदेशी मद्य साठ्याप्रकरणी एका इसमा विरोधात पनवेल तालुका पोलिसांनी कारवाई करून साठा हस्तगत केला. कसळखंड गाव कमानी जवळ आरोपी कुंदन सिह हा टपरीवर बेकायदेशीररित्या विमल पान मसाल्यासह देशी-विदेशी मद्य साठा करून विकत असल्याची माहिती गजाजन घाडगे याना मिळताच त्याच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने त्याठिकाणी छापा टाकून जवळपास ३१०० रु किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला.

**नागरिकांना नाहक त्रास | महावितरणाचा गलथान कारभार**

# नागोठणे तासनतास वीज गायब

**| नागोठणे | प्रतिनिधी |**


नागोठणे शहर व ग्रामीण विभागात महावितरणने सध्या कडक उन्हाळ्यातही खेळ मांडला असून सध्या वारंवार वीज पुरवठा खंडित होत आहे. याचा नाहक त्रास नागरिकांना सोसावा लागत आहे.



वीज खंडित होण्याची कोणतीच ठराविक वेळ नसून रात्री बेरात्री, तर दिवसा कधीही अर्ध्या, एका तासाच्या अंतराने वीज खंडित होत आहे. कधी पाच मिनिटे तर कधी अर्धा किंवा एक-एक दोन-दोन तास वीजपुरवठा खंडित होत आहे. तसेच विजेच्या शटडाऊनची माहिती जाबाबदार अधिकाऱ्यांकडून येत नसल्याने नागरिकांत संभ्रम निर्माण झाला आहे. तसेच कडक उन्हाळ्यात वारंवार वीज खंडित होऊनही वीज ग्राहक असलेले नागरिक मात्र शांत शांत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

महावितरणच्या या गलथान कारभाराने जणू काही शहरात अघोषित लोडशेडिंग करण्यात येत असल्याचा प्रत्ययच नागरिकांना येत आहे. मागील काही दिवसांपासून तर नागोठणे शहरात विद्युत पुरवठा खंडित होणे, विद्युत दाब अचानक कमी जास्त होणे यासारखे प्रकार नेहमीचेच झाले आहेत.

वेळी अवेळी वीजपुरवठा खंडित होत असल्यामुळे याचा विपरित परिणाम विजेवर चालणाऱ्या उपकरणावर होत आहे.



# मुंढेंची चोविसावी बदली

बहुचर्चित अधिकारी तुकाराम मुंढे यांची २१ वर्षातली चोविसावी बदली झाली आहे. गेल्या वर्षी ऑगस्ट महिन्यात असंघटित कामगार आयुक्त पदावरून त्यांची दिव्यांग कल्याण विभागाच्या सचिवपदी नेमणूक झाली होती. पण तिथून अवघ्या दहा महिन्यांमध्ये त्यांना हलवण्यात आले आहे. आता ते आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या सचिव म्हणून काम करतील. या निमित्ताने मुंढे यांच्या नियमाला धरून कठोर कारवाई करण्याच्या वृत्तीची चर्चा होते आहे. प्रत्येक काळामध्ये, दिल्लीपासून मुंबईपर्यंत सरकारला नडणारे असे काही अधिकारी असतातच. किरण बेदी, टीएन शेषन यांच्यासारख्यांची नावे विख्यात आहेत. महाराष्ट्रात एकेकाळी अरुण भाटिया यांचा जबर बोलबाला व धाक निर्माण झाला होता. आधी धुळे येथील भ्रष्टाचार प्रकरण उघडकीस आणल्यानंतर त्यांची अशीच बदली करण्यात आली. नंतर पुण्यात असताना त्यांनी बेकायदा बांधकामे व नोकरभरतीतील घोटाळे बाहेर काढले. त्यावरून राज्यकर्त्यांशी त्यांचे वाद झाले. मोदींच्या काळात केंद्रात असे कमी अधिकारी निपजले. अशोक लवासा यांच्यासारखा एखादाच. त्यांनी निवडणूक आयुक्त म्हणून मोदी व शाह यांच्याविरुध्दच्या तक्रारींची दखल घेतल्याने खळबळ उडाली होती. सध्याच्या काळात महाराष्ट्रात तुकाराम मुंढे यांचे नाव असेच गाजते आहे. मुंढे हे जातील तिथे त्यांनी भ्रष्टाचाराला चाप लावलेला दिसतो. २००८ मध्ये २००८ साली नागपूर परिषदेवर जेव्हा त्यांची मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून निवड झाली, त्याच दिवशी त्यांनी काही शाळांना भेट दिली. तेव्हा त्यांना अनेक शिक्षक गैरहजर दिसले. दुसऱ्या दिवशी त्यांनी त्या सर्व शिक्षकांचे निलंबन केले. वैद्यकीय कारभारातील अनियमितता पाहून त्यांनी काही डॉक्टरांना निलंबित केले. इतिहासात पहिल्यांदाच 'सीईओ'ने डॉक्टरला निलंबित केले होते. २०११-१२मध्ये सोलापूर जिल्हाधिकारीपदाची कारकीर्द गाजली. तिथे दुष्काळी कामे हा अनेकांचा व्यवसाय झाला होता. मुंढे यांनी जलयुक्त शिवार योजनेमध्ये त्यांनी सोलापुरातील २८२ गावे घेतली. परिणामी वर्षाला जिथे ४०० टँकर लागत होते ती संख्या ३०-४० वर आली. नवी मुंबई मनपा आयुक्तपदी असताना त्यांनी कित्येक कामचुकार अधिकारी व कर्मचाऱ्यांना कामावरून काढले. अनेक फेरीवाले व अनधिकृत विक्रेते यांना चाप लावला. यातून स्थानिक नेत्यांशी त्यांचा संघर्ष झाला. पुढे पुणे पालिकेच्या परिवहन सेवेचे व्यवस्थापकीय संचालक असतानाही त्यांचे कर्मचारी, कंत्राटदार इत्यादींशी वाद झाले.

### खैरनारांपासून आजपर्यंत

मुंढे यांनी दिव्यांग विभागात केलेल्या कामाची नुकत्याच झालेल्या विधिमंडळ अधिवेशनात मुख्यमंत्र्यांनी प्रशंसा केली होती. सरकारकडे नोंदणी न केलेल्या संस्थांना चाप लावण्याचा धडाका त्यांनी लावला होता. शिवाय अपंगत्वाचे खोटे प्रमाणपत्र मिळवून सरकारी लाभ उकळणाऱ्या कर्मचाऱ्यांवरही त्यांनी बडगा उगारला होता. त्यातून अनेकांचे हितसंबंध दुखावले गेले होते. त्यामुळेच आता त्यांची महसूल खात्यात बदली झाली आहे. तिथे ते कोणता उपक्रम करतात हे पाहावे लागेल. मात्र हे सगळे पाहिल्यानंतर दोन-तीन मुद्दे उपस्थित होतात. मुंढे हे जिथे जातात तिथे नियमाने वागू लागतात व तसे केले की तात्काळ भ्रष्टाचार उघड होतो. याचाच अर्थ आपला सर्व कारभार भ्रष्टाचारात आरपार बुडालेला असतो. मुंढे तिथे नसतात तेव्हा तो उघड होत नाही वा त्याला आळा घालणारे कोणी नसते. याचा दुसरा अर्थ असाही होतो की, मुंढे तिथून गेले की पुन्हा पहिले पाढे पंचावन्न असे होत असावे. अन्यथा, मुंढे यांना ज्या ठिकाणी जाताक्षणी अनियम तितता दिसू लागतात व इतर अधिकाऱ्यांना त्यांचा त्रास होत नाही हे विलक्षण म्हणावे लागेल. काही वेळेला मुंढे यांच्यासारख्या अधिकाऱ्यांना प्रसिद्धीचा कैफ चढतो. भ्रष्टाचार उघड केला की, त्याचा गाजावाजा होतो. मिडियामध्ये असे अधिकारी हिरो होतात. अमिताभ बच्चनच्या सिनेमाप्रमाणे हे अधिकारी जणू एकट्याने सगळा भ्रष्टाचार व अनाचार निपटून टाकू शकतात असे वातावरण तयार होते. १९९० च्या दशकात गो. रा. खैरनार नावाचे एक अधिकारी असेच गाजले होते. मुंबई महापालिकेत अतिक्रमणविरोधी विभागात उपायुक्त म्हणून काम करताना त्यांनी दाऊद इब्राहिमची कथित बांधकामे पाडली होती. त्यामुळे ते देशभर प्रसिध्द पावले. मग ते सगळ्याच भ्रष्टाचारावर बोलू लागले. शरद पवार यांच्याविरुध्द आपल्याकडे ट्रकभरून पुरावे आहेत असा त्यांचा दावा होता. लोक त्यांच्यामागे प्रचंड गर्दी करू लागले. हा खेळ काही महिने चालला. त्याच्या जोरावर महाराष्ट्रात भाजप सेना युतीचे पहिले सरकार आले. नंतर खैरनार यांचे दावे बोगस आहेत हे सिद्ध झाले.


### बदलीची चौकशी हवी

मुंढे यांनी असे भरमसाठ दावे केलेले नाहीत. तसेच प्रसिद्धीसाठी सनसनाटी कारवाया केल्या आहेत असे दिसत नाही. पण या ठिकाणी दुसराही प्रश्न उपस्थित होतो. सरकारी यंत्रणेत नियम असतात. चांगल्या वाईट गोष्टी असतात. अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचाराला कुलूप लावावे हे अपेक्षित असतेच. पण एक अधिकारी म्हणून या नियमांचा वापर करून जनतेचे जीवन सुसह्य करणे, विधायक गोष्टी घडवून आणणे हेही त्यांचे कर्तव्य असते. शिवाय कोणत्या तरी एकाच गोष्टीवर लक्ष केंद्रीत न करता त्या यंत्रणेच्या सर्व बाजू सुधारणे व सेवेचा दर्जा उंचावणे हीदेखील त्यांची जबाबदारी असते. उदाहरणार्थ, पुणे परिवहन सेवेत असताना मुंढे यांनी भ्रष्टाचार बाहेर काढला हे योग्यच झाले. पण बससेवेचा विस्तार करण्यासाठी आणि दीर्घ काळात बससेवा अधिक उपयोगी होण्यासाठी त्यांनी काही योजना राबवल्या काय हेही पाहावे लागते. मुंढे यांनी आपल्या हातातील अधिकारांचा त्याच जोराने विधायक कामांसाठी उपयोग केला का हा प्रश्न आहे. कदाचित त्यांनी तो केलाही असेल. पण त्यांच्या भ्रष्टाचारविरोधी प्रतिमेमुळे ते काम झाकले गेले असेल किंवा त्याला फारशी प्रसिद्धी मिळाली नसेल हेही शक्य आहे. आणि हे केवळ मुंढे यांनाच लागू नाही. यापूर्वीचे भाटिया, शेषन इत्यादींच्या बाबतही तो उपस्थित झाला होता. शेषन यांचे निवडणूक आयोगातले काम गाजले. पण त्यांचे इतर ठिकाणचे अधिकारी म्हणून काम हे तितकेसे कडक या प्रतिमेला साजेसे नव्हते असे काहींचे म्हणणे आहे. या संदर्भात सरकारनेही दोन गोष्टींचा जबाब द्यायला हवा. वारंवार अशा अधिकाऱ्यांची बदली करून काय साधले जाते, त्याऐवजी त्यांच्याकडून काम करून घेण्याचे मार्ग का शोधले जात नाहीत हे त्याने स्पष्ट करायला हवे. दुसरी बाब म्हणजे, अधिकाऱ्यांच्या बदल्या हा सरकारचा अधिकार असला तरी अशा वरचेवर बदल्या म्हणजे सरकार अकार्यक्षम असल्याचे सिद्ध होते हेही लक्षात घ्यायला हवे. त्यासाठी अशा बदल्या केल्या गेल्या तर त्याचे स्पष्टीकरण देण्याचे बंधन सरकारवर टाकले जायला हवे. अशा बदल्यांबाबत काही नियम करायला हवेत आणि लोकपालांसारख्या संस्थांकडे त्याबाबत तक्रारी करता यायला हव्यात. मुंढे हे भ्रष्टाचारविरोधी कारवाई करतात हे सर्वमान्य असेल तर त्यांना हलवणे म्हणजे भ्रष्टाचाराला पाठीशी घालणे असे समजून त्यांची सुनावणी केली जायला हवी.

विचार

# "सामाजिक समतेचा आधारवड ज्योतीबा फुले"

*ज्योतीबा ज्या काळात जन्माला आले तो काळ अत्यंत कर्मठ समाजव्यवस्थेचा होता. ज्या काळात शिक्षण ही श्रीमंतांची मक्तेदारी आहे. गरीब, स्त्रिया आणि दलित- पददतील यांना शिक्षण देण्याची गरजच नाही. ह्या विचारश्रेणीचे मुळ खोलवर रूजलेल होते. अशा या मतप्रवाहाच्या विरूध्द जाऊन ज्योतीबांनी धाडस दाखविले. कारण त्यांची विचारसरणी ही आधुनिकतेची कास धरणारी होती. समाजाचा विकास करायचा असेल, देशाची स्थिती सुधारावयाची असेल तर या देशातील, महाराष्ट्रातील शुद्राअतिशुद्र, स्त्रिया यांना शिक्षणाशिवाय पर्याय नाही. ही काळाची गरज आहे.*



संजीव मोरे

आधुनिक भारताच्या कर्त्या समाजसुधारकांच्या परंपरेत महात्मा जोतीराव फुले यांचे स्थान दिपस्तंभाप्रमाणे अतिशय श्रेष्ठ दर्जाचे आहे. विशेषतः आपल्या महाराष्ट्राच्या गेल्या दिडशे वर्षांपुर्वी पारतंत्र्याच्या जुलमी शृंखलांनी बंदिस्त झालेल्या विषमता शोषण अशिक्षितता आणि मागासलेपणाच्या गाळात रुतलेल्या अमानवीय दृष्ट परंपरा अंधश्रध्दा व जुनाट धार्मिक संकल्पना यांच्या विळख्यात सापडलेल्या दारिद्र्य, भूक, अन्याय यांनी ग्रासलेल्या आपल्या समाजाला या विविध स्वरूपाच्या अत्यंत कष्टमय आणि दुःखी जीवनातून बाहेर काढून त्यांच्या प्रगतीचा मुक्तीचा मार्ग दाखवण्याचे महान कार्य महात्मा जोतीराव फुले यांनी केलेले आहे. शेकडो वर्षांपासून जो समाज निद्रा अवस्थेत होता त्या समाजाला जागे करून ज्या एका विशिष्ट समाजाची मक्तेदारी निर्माण झालेली होती ती दूर करण्यासाठी या महापुरूषाने आपले संपुर्ण आयुष्यच पणाला लावले म्हणून त्यांना 'युगप्रवर्तक' क्रांतीसुर्य म्हटले पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, महात्मा ज्योतीबा फुले यांनी तळागाळातील माणसांवर लादलेल्या गुलामीची जाणीव करून दिली आणि सामाजिक लोकशाहीचा प्रकाश भारतात निर्माण केला. म्हणून जोतीबांचे स्मरण केवळ त्यांच्या जन्मदिनीच नव्हे तर ते पुन्हा-पुन्हा करायला पाहिजे.

ज्योतीबा ज्या काळात जन्माला आले तो काळ अत्यंत कर्मठ समाजव्यवस्थेचा होता. ज्या काळात शिक्षण ही श्रीमंतांची मक्तेदारी आहे. गरीब, स्त्रिया आणि दलित- पददतील यांना शिक्षण देण्याची गरजच नाही. ह्या विचारश्रेणीचे मुळ खोलवर रूजलेल होते. अशा या मतप्रवाहाच्या विरूद्ध जाऊन ज्योतीबांनी धाडस दाखविले. कारण त्यांची विचारसरणी ही आधुनिकतेची कास धरणारी होती. समाजाचा विकास करायचा असेल, देशाची स्थिती सुधारावयाची असेल तर या देशातील, महाराष्ट्रातील शुद्राअतिशुद्र, स्त्रिया यांना शिक्षणाशिवाय पर्याय नाही. ही काळाची गरज आहे. असे होणार नसेल तर हा समाज खऱ्या अर्थाने प्रगतीचे फळे चाखू शकणार नाही. हा अत्यंत मोलाचा आणि कळकळीचा विचार त्याकाळी कोणी स्वप्नात देखील केला नव्हता. तो क्रांतीकारी विचार ज्योतीबांनी त्याकाळी केला आणि पुण्यातील बुधवार पेठेत भिडे यांच्या वाड्यात १८४८ या साली मुलींची पहिली शाळा त्यांच्या वयाच्या २१ व्या वर्षी सुरू केली आणि या देशाचा शैक्षणिक पाया घातला. म्हणून ज्योतीबा हेच ख-या अर्थाने शिक्षणाचे जनक आहेत, असे म्हटले तर ती अतियशोक्ती ठरू नये.

त्यानंतर १८५१ साली दलितांसाठी पुण्यातील नाना पेठेत शाळा सुरू करून ज्योतीबांनी शैक्षणिक पाया रचला आणि त्यानंतर अनेक शाळांची निर्मिती करून पुणे हे शिक्षणाचे माहेरघर झाले ते आजपर्यंत कायम आहे.

महात्मा ज्योतीबा फुले त्यांचे शैक्षणिक विचार व्यापक व राष्ट्राच्या विकासासाठी पोषक होते ते पुढील उदाहरणावरून स्पष्ट होते. आज भारतातील राजकीय नेते ज्या राष्ट्रीय शिक्षणाचा विचार करतात, बोलतात त्या राष्ट्रीय शिक्षणासंदर्भात महात्मा फुले यांनी सर विल्यम विलसन हंटर यांच्या अध्यक्षतेखाली जे कमिशन नेमले होते. त्या कमिशनसमोर १९ ऑक्टोबर १८८२ साली अशी मागणी केली होती की, या देशातील बारा वर्षाच्या आतील मुला-मुलींना सक्तीचे मोफत शिक्षण दिले पाहिजे. परंतू या मागणीला त्या वेळेच्या परंपरावादी, वर्णवर्चस्वादी समाजाने विरोध केला आणि त्या मागणीच्या विरोधात साक्षी देऊन ज्योतीबांचे ही पुरोगामी विचार खोडून टाकले. ज्योतीरावांनी १२८ वर्षापूर्वी ज्या गोष्टींचा आग्रह धरला होता त्या सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा आता १२८ वर्षानंतर म्हणजे १ एप्रिल २०१० पासून अंमलात आला. वास्तविक हा कायदा डॉ. आंबेडकरांनी घटना लिहितांना घटनेत समाविष्ट केलेला आहे व देशात घटनात अंमलात आल्यानंतर पहिल्या पंचवार्षिक योजनेत त्यांची अंमलबजावणी व्हावी असे अभिप्रेत होते. परंतू या देशातील राज्यकर्त्यांनी अत्यंत मुलभूत अशा गोष्टीकडे दुर्लक्ष करून फार मोठ्या विलंबाने ही योजना लागू केली. यावरून आजचे राज्यकर्ते आणि महात्मा फुले यांचा शैक्षणिक दृष्टीकोनातील फरक अधोरेखित होतो.

ज्योतीबांनी शेतक-यांचा आसूड या त्यांच्या पुस्तकात समाजाची त्या वेळची शिक्षणाअभावी झालेली परवड, समाजाचे झालेले खच्चीकरण याला शिक्षणाचा अभाव कसा कारणीभूत आहे हे त्यांच्या पुढील ओळींवरून स्पष्ट होते.

**विद्ये विना मती गेली !**
**मती विना निती गेली !**
**निती विना गती गेली !**
**गती विना वित्त गेले !**
**वित्त विना शुद्र खचले !**
**इतके अनर्थ एका अविद्येने केले !**

अशा सुभाषित वजा शब्दात त्यांनी शिक्षणाविषयी विचारांचे सार सांगितले आहे. त्यांचे हे विचार किती सत्याला स्पर्श करणारे आहेत याची जाणीव करून देतात. अज्ञानापोटी दलित- पद दलित, बहुजन समाज, आदिवासी इतर मागास वर्ग आणि स्त्रिया यांना दुस-याच्या ओंजळीने पाणी पिणे भाग पडते. शिक्षणाच्या अभावामुळे स्वतःची विचारधारा प्रगट करू शकत नाही, विचारच नाही म्हणून जीवनाचे प्रगतीचे विचार करण्याची क्षमता नाही. जे आहे तेच देवाने आपल्यासाठी योजले आहे अशा भोळ्या समजुतीपायी अन्यायाच्या विरुद्ध उभे राहण्याची क्षमताच नाही. कारण त्यांचा आत्मविश्वास पूर्णपणे नामशेष झालेला असतो. नियती ठेवील तसेच राहावे, तक्रार करता कामा नये अशी त्यांची वृत्ती होऊन बसते. धार्मिक, सामाजिक, राजकीय स्वार्थीवृत्तीचे धुरी जसे सांगतील जे सांगतील तसे निमुटपणे वागणे अशी मानसिकता होऊन अशा अन्याय वृत्तीला जाब विचारण्याची त्यांची मानसिकताच नसते. या सर्वांचे आकलन समाजातील तळागाळातील माणसाला व्हावे असे जर वाटत असेल तर शिक्षण हा एकमेव मार्ग आहे हे महात्मा ज्योतीबांनी त्या काळी अत्यंत तळमळीने सांगण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

ज्योतीबा फुले यांनी शिक्षण क्षेत्रात तर त्यांच्या जीवनाच्या अंतापर्यंत कार्य केले. तसेच सामाजिक क्षेत्रातही त्यांचे योगदान अमूल्य आहे. ज्योतीबा हे विचार आणि कृती यांची सांगड घालून काम करणारे सुधारक म्हणून त्यांच्या कार्यामुळेच सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक जागृती झाली. म्हणूनच त्यांच्यानंतर या महाराष्ट्राला लाभलेले थोर समाजसुधारक शिक्षणाचे महत्व जाणणारे शाहूम हाराज, महात्मा फुले यांना भारताचे मार्टिन ल्यूथर किंग म्हणत. तर सयाजीराव गायकवाड हे शिक्षणाचे महत्व जाणणारे राजे त्यांना भारताचे वाशिंग्टन म्हणत तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्योतीबांना आपल्या गुरूस्थानी मानले होते. ज्योतीबांचे विचार भारतीय समाजाला मानवी स्वातंत्र्याकडे नेणारे आहेत. गुलामगिरीच्या बेड्या तोडून टाकण्याच्या बळ देणा-या समतेचे महत्व सांगणारे आहेत. भारतीय समाजव्यवस्थेतील शोषणव्यवस्था उघड करून जातीव्यवस्थेची अंताची लढाई उभी करूनही महात्मा फुले यांनी समाजाच्या ऐक्याला बाधा येऊ दिली नाही. त्यांचे विचार अत्यंत परिपक्व होते. समाज मनाचे ठाव घेणारे होते. समाजाच्या ऐक्याला बाधा येणार नाही यासाठी ते कार्यरत होते आणि म्हणूनच महात्मा गांधींनी ज्योतीबांचा खरा महात्मा म्हणून गौरव केला आहे. अशा थोर महात्म्याची आज जयंती. थोर पुरूषांचे केवळ नामस्मरण करून काहीही साध्य होणार नाही तर त्यांचया विचारांमध्ये असलेली कृतीशिलत अंगिकारली तरच त्याला अर्थ आहे. अशा या युगप्रवर्तक महामानवाला जयंती निमित्ताने कोटी कोटी प्रणाम.

चर्चा आजची

# एसटीच्या स्वच्छतेसाठी प्रवाशांना भुर्दंड

अंतरा पारंगे

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या एसटी बसचा प्रवास हा सुरक्षित आणि स्वस्त मानला जातो. त्यामुळे आजही अनेकजण लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी लालपरीलाच प्राधान्य देतात. मात्र, आता राज्य परिवहन महामंडळाने प्रवाशांना मोठा आर्थिक धक्का दिला आहे. एसटी महामंडळाने १५ एप्रिलपासून तिकीट दरात १० टक्क्यांची हंगामी दरवाढ जाहीर केली आहे. त्यामुळे प्रत्येक तिकीटामागे आता दोन व त्यापेक्षा अधिक रक्कम मोजावी लागणार आहे. सध्या तेलापासून वेगवेगळ्या वस्तू महाग झाल्या आहेत. या महागाईच्या झळा सर्वसामान्यांना बसत असतानाच आता एसटी प्रवास करताना प्रवाशांच्या खिशाला कात्री बसणार आहे. त्यामुळे आता एसटीच्या तिकीट दरातदेखील महागाईचे संकट उभे राहिले आहे.

मागील वर्षीच एसटीने १४.९९ टक्के भाडेवाढ केली होती. त्यानंतर आता पुन्हा २ व त्यापेक्षा अधिक रुपयांचा बोजा टाकला आहे. त्यामुळे उन्हाळी सुट्टीतील प्रवास महागला असून प्रवाशांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने एसटी बसेस आणि बसस्थानकांच्या स्वच्छतेचा दर्जा सुधारण्यासाठी एक मोठा निर्णय घेतला आहे. मात्र, या निर्णयाचा थेट फटका सर्वसामान्य प्रवाशांच्या खिशाला बसणार आहे. आता स्वच्छतेच्या नावाखाली प्रत्येक प्रवाशाकडून स्वच्छता अधिभार वसूल केला जाणार आहे. ही भाडेवाढ १५ एप्रिल ते १५ जून या कालावधीसाठी असून प्रत्येक तिकीटामागे २ रुपये अतिरिक्त मोजावे लागणार आहेत.

मुलांच्या परीक्षा संपल्यानंतर शाळा-महाविद्यालयांना एप्रिल ते मे या दरम्यान सुट्ट्या असतात. या कालावधीत अनेक जण उन्हाळ्यात प्रवासाचा बेत आखतात. एप्रिल आणि मे या दोन महिन्यांमध्ये एसटी बसमध्ये सर्वसामान्य प्रवाशांची मोठी गर्दी होत असते. मात्र, ऐन याच काळात आता एसटी महामंडळाकडून हंगामी भाडेवाढ करण्यात आली आहे. त्याचा मोठा फटका हा आता प्रवाशांना बसण्याची शक्यता आहे. प्रवाशांना या हंगामी भाडेवाढीमुळे मोठी आर्थिक झळ बसणार आहे. यामुळे प्रवाशांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे.

ही भाडेवाढ साध्या आणि जलद बससाठी ही वाढ लागू असणार आहे. यामुळे लांब पल्ल्याचा प्रवास १०० रुपयांपर्यंत महागणार आहे. तसेच रात्रसेवा, या बस सेवेसाठी लागू राहणार आहे. नव्या भाडेवाढीनुसार प्रौढ प्रवाशांसाठी १२ रुपये, लहान मुलांसाठी ७ रुपयांची प्रति टप्पा वाढ करण्यात आली आहे. तर अमृत ज्येष्ठ नागरिक योजनेअंतर्गत मोफत प्रवास करणाऱ्या ७५ वर्षांवरील प्रवाशांकडूनही हे २ रुपये शुल्क आकारले जाणार आहे.

महिलांसाठी अर्ध तिकीट करता आणि इकडे प्रवास भाडे वाढवता, त्यापेक्षा एसटीच बंद करू टाका. श्रीमंत लोक एसटीने प्रवास करत नाहीत, भाव वाढ ही गरिबांच्या खिशाला कात्री आहे. तिकटाची दरवाढ कमी करून गरिबांना दिलासा दिला पाहिजे. आधीच बसेसची अवस्था दयनीय आहे आणि दुरुस्तीअभावी प्रवाशांचे हाल होत आहेत. महामंडळाने या निर्णयाचा फेरविचार करावा, प्रवाशांकडून बोलले जात आहे.

स्वच्छतेच्या बाबतीत एसटीची कायम बोंबाबोंब राहिली आहे. धुळीने माखलेल्या आणि मोडक्या सीट्स, पान-तंबाखूच्या पिचकाऱ्यांनी रंगलेले बस, बसस्थानकाचे कोपरे, खाद्यपदार्थांचे रिकामी पाकीटे आणि बॉटल्स हे चित्र सर्रास दिसून येते. शिवाय एसटी बस बाहेरूनही अस्वच्छ असते. बसस्थानकाच्या परिसरात साचलेला कचरा, स्वच्छतागृहाची अनियमित स्वच्छता यामुळे दुर्गंधी पसरली असते. वास्तविक ही कामे एसटीला मिळणाऱ्या उत्पन्नातून करणे गरजेचे असते. मात्र स्वच्छतेचा भुर्दंड प्रवाशांवर टाकला जात असल्याचे बोलले जात आहे.

प्रासंगिक कराराकरिता एसटी बस बुक करणाऱ्या व्यक्तीकडून अधिभाराच्या नावाखाली प्रतिबस ५० रुपये आकारले जाणार आहे. शिवाय, आवडेल तेथे प्रवास, पासधारक प्रवासी यांच्याकडून प्रत्येकी पाच रुपये घेण्यात येणार आहे. या माध्यमातून सातून एसटी महामंडळाने उत्पन्नाचा नवीन मार्ग शोधला असल्याची प्रतिक्रिया उमटत आहे. एसटी स्वच्छ राहावी म्हणून प्रवाशांवर भुर्दंड का, असाही प्रश्न प्रवाशांकडून उपस्थित केला जात आहे.


दोन महिन्यांच्या या कालावधीत मोठ्या प्रमाणावर नागरिक शहरांकडून गावाकडे प्रवास करतात. या काळात एसटीने केलेल्या दरवाढीचा फायदा घेत खासगी ट्रॅव्हल्स चालकही आपले दर वाढवण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे प्रवाशांना एकूणच प्रवासासाठी खिशाला अधिकचा भार सहन करावा लागणार आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये एसटी महामंडळाच्या विभागीय नियंत्रणाच्या अधिपत्याखाली अलिबाग, पेण, मूरूड,रोहा, माणगाव, कर्जत, श्रीवर्धन, महाड असे आठ एसटी बस आगार असून १९ हून अधिक बस स्थानके आहेत. जिल्ह्यात ४१० हून अधिक एसटी बसेस आहेत. त्यामध्ये दोनशेहून अधिक सीएनजीवर चालणाऱ्या बसेस आहेत. लाखो प्रवासी एसटीतून प्रवास करतात. मात्र वाढत्या तिकीट दरामुळे उन्हाळी सुट्टीत बाहेरगावी जाणाऱ्या प्रवाशांना अधिक पैसे तिकीटीसाठी मोजावे लागणार आहेत. मात्र अधिभाराच्या या रकमेतून जिल्ह्यांतील आगार आणि बसस्थानके स्वच्छ ठेवले जातील का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. अनेक बस स्थानकांची अवस्था दयनीय आहे. काही स्थानकांमध्ये खड्डे पडले आहेत. काही स्थानकांमध्ये कचऱ्याचा ढिगारा अनेक दिवस पडून असते. ही स्वच्छता नक्की प्रवाशांच्या सुरक्षेसाठी होईल ना असा प्रश्न जनतेमधून उपस्थित केल जात आहे.

लोकसंसद

## बालकांच्या कर्करोगाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज

जागतिक पातळीवरील 'द लॅन्सेट' या वैद्यकीय नियतकालिकामध्ये प्रकाशित झालेल्या 'ग्लोबल बर्डन ऑफ डिसीज (जीबीडी) २०२३' या अहवालानुसार भारतात मुलांमधील कर्करोग हे बाल मृत्यूच्या प्रमुख कारणांपैकी दहावे कारण ठरले असून २०२३ मध्ये यामुळे सुमारे १७ हजार बालकांचा मृत्यू झाला आहे. 'द लॅन्सेट'च्या अहवालानुसार २०२३ मध्ये जगभरात बाल कर्करोगाची ३ लाख ७७ हजार प्रकरणे नोंदवली गेली आणि १ लाख ४४ हजार मृत्यू झाले. त्यापैकी २०.५ टक्क्यांपेक्षा जास्त मृत्यू एकट्या दक्षिण आशियामध्ये झाले आहेत.



कर्करोगाचे उशिरा झालेले निदान, योग्य औषधोपचारांची कमी उपलब्धता आणि आरोग्यसेवेची अपुरी पायाभूत सुविधा अशा कारणांमुळे दक्षिण आशियामध्ये कर्करोगामुळे होणाऱ्या बालमृत्यूचे प्रमाण वाढले आहे. बालकांच्या कर्करोगाकडे गांभीर्याने लक्ष देण्यासाठी विशेष धोरणाची आवश्यकता असून त्यासाठी भारताच्या राष्ट्रीय कर्करोग नियंत्रण नियोजनात आणि राष्ट्रीय तपासणी कार्यक्रमात बाल कर्करोगाचा समावेश करणे, विशेष बालरोग कर्करोग केंद्रे स्थापन करणे आणि बाल कर्करोगाचा दीर्घकालीन पाठपुरावा कार्यक्रमाची गरज कर्करोग तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. बालकांच्या कर्करोगाविषयी अधिक जागरूकता, लवकर झालेले निदान आणि योग्य औषधोपचारांमुळे अनेक मृत्यू टळू शकतात, असेही मत कर्करोग तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

**- प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

# क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले

श्याम ठाणेदार

भारताचे थोर सुपुत्र, विचारवंत, समाजसुधारक, लेखक महात्मा जोतीराव फुले यांची आज जयंती. महात्मा जोतीराव फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला. जोतीरावांच्या वडिलांचे नाव गोविंदराव तर आईचे नाव चिमणाबाई असे होते. सातारा जिल्ह्यातील कटगुण हे त्यांचे मूळ गाव. त्यांचे आडनाव गोऱ्हे असे होते पण त्यांच्या वडिलांचा फुले विक्रीचा व्यवसाय होता त्यामुळे ते फुले म्हणूनच ते ओळखले जाऊ लागले पुढे फुले हेच आडनाव रूढ झाले. काही दिवसांनी कटगुणहुन त्यांचे कुटुंबीय पुरंदर तालुक्यातील खानवडी येथे आले. खानवडी येथे त्यांचे घर असून त्यांच्या नावे सात बाराचा उतारा देखील आहे. प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी भाजी विक्रीचा व्यवसाय केला. जोतीराव फुले यांना लहानपणापासून शिक्षणाची आवड होती. १८४२ साली त्यांनी पुण्याच्या स्कॉटिश मिशन हायस्कूलमध्ये माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी प्रवेश घेतला. अतिशय तल्लख बुद्धीच्या जोतिरावांनी पाच सहा वर्षातच तो अभ्यासक्रम पूर्ण केला. २३ सप्टेंबर १८७३ रोजी महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. तथाकथित सनातनी उच्चवर्णीय लोकांकडून सर्वसामान्य लोकांवर होणारा अन्याय अत्याचार दूर करणे तसेच गुलामगिरीतून शूद्रातिशूद्र समाजाची मुक्तता करणे व त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करुन देणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते.

**'सर्वसाक्षी जगत्पती।**
**त्याला नकोच मध्यस्ती'।।**

हे या समाजाचे घोषवाक्य होते. सत्यशोधक समाजाने गुलामगिरीविरुद्ध आवाज उठवला आणि समाज न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली. या समाजातर्फे पुरोहितांशीवाय लग्न लावण्यास सुरुवात केली. मराठीत मंगलाष्टके रचली. समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत शिक्षण पोहचवणे हे सत्यशोधक समाजाचे महत्वाचे ध्येय होते. महात्मा फुले यांनी एका कवितेत शिक्षणाचे महत्व पटवून देताना म्हटले आहे की

**विद्येविना मती गेली ।**
**मतिविना नीती गेली।**
**नितीविना गती गेली ।**
**गतिविना वित्त गेले ।**
**वित्ताविना शूद्र खचले ।**
**इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।**

एक महिला शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते. समाज शिक्षित करायचा असेल आणि बहुजन समाजात शिक्षण मुहूर्तमेढ रोवयची असेल तर महिलांना शिक्षित व्हायलाच हवे असे त्यांचे मत होणे म्हणूनच त्यांनी त्याची सुरवात स्वतःच्या घरापासून केली. जोतिरावांनी त्यांच्या पत्नी सावित्रीबाईंना शिक्षण देऊन शिक्षण कार्यास प्रवृत्त केले. महात्मा फुले यांनी १८४८ साली पुण्यातील भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा काढून तेथील शिक्षिकेची जबाबदारी सावित्रीबाईंवर सोपवली. पुढे सावित्रीबाई या शाळेच्या मुख्याध्यापिकापदी आरूढ झाल्या. शाळेच्या मुख्याध्यापकपदी आरूढ झालेली भारतातील पहिली महिला म्हणजे सावित्रीबाई फुले त्याचप्रमाणे मुलींसाठी पहिली शाळा काढणारे पहिले भारतीय म्हणजे महात्मा जोतीराव फुले. महात्मा जोतीराव फुलेंनी देशात मुलींच्या शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. आज सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत असे कोणतेच क्षेत्र नाही की ज्यात महिलांनी आपला झेंडा रोवला नाही. कला, क्रीडा, साहित्य, विज्ञान, तंत्रदान, शिक्षण, समाजकारण, राजकारण, अर्थकारण अशा सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत त्या केवळ आणि केवळ फुले दाम्पत्यांमुळे. महिलांसाठी फुले दाम्पत्यांनी जे कार्य केले ते ३३ कोटी देवांनीही केले नाही. महात्मा फुले यांनी पुण्यातील वेताळ पेठेत १८५२ साली अस्पृश्यांसाठी शाळा स्थापन केली. त्यांच्या या शैक्षणिक कार्याला सनातन्यांनी खूप विरोध केला. मुलींनी शिक्षणासाठी घराबाहेर पडणे म्हणजे धर्म बुडणे अशी आरोळी ठोकत सनातनी लोकांनी महात्मा फुले यांच्या या महान कार्यास विरोध केला. २८ नोव्हेंबर १८९० रोजी महात्मा फुले यांचे निधन झाले. आज त्यांच्या जन्मदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. महात्मा फुलेंना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

११ एप्रिल

१) श्री. नारायण रामजी कडवे सारळ, अलिबाग ११-४-१९४४

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



जगदीश पी शाह, स्मरणार्थ अलिबाग

किर्ती वाघमारे

## वृद्ध महिलेची फसवणूक


**। पालघर । प्रतिनिधी ।**

टेलिकॉम विभागाचा अधिकारी आणि पोलीस असल्याचे भासवून एका सायबर भामट्याने मिरारोडमधील एका वृद्ध महिलेचे तब्बल ४८ लाख २९ हजार रुपयांची लूट केली. डिजिटल अरेस्टची भीती दाखवून ही मोठी लूट करण्यात आली असून, याप्रकरणी नयानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिरारोड येथील शोभा नायक (६०) यांच्या फिर्यादीनुसार, १३ मार्च ते ५ एप्रिल या कालावधीत हा फसवणुकीचा प्रकार घडला. सुरुवातीला शोभा यांचे पती वासुदेव नायक यांच्या मोबाईलवर आकाश शर्मा नावाच्या व्यक्तीचा फोन आला. त्याने आपण दिल्ली येथील दूरसंचार विभागातून बोलत असल्याचे सांगितले. भामट्याने नायक दाम्पत्याला चॅटिंग ॲप डाऊनलोड करण्यास भाग पाडले. त्यानंतर आरोपीने पोलिसांचा गणवेश परिधान या ॲपवरून व्हिडिओ कॉल करून त्याने तुम्ही नरेश गोईल याच्या गुन्ह्यात संशयित आहात, असे सांगून नायक दाम्पत्यावर दबाव टाकला. तपासाच्या आणि पोलीस चौकशीच्या नावाखाली आरोपीने या दाम्पत्याच्या संपत्तीची सर्व माहिती काढून घेतली. अटक करण्याची भीती दाखवून त्याने त्यांना वेगवेगळ्या बँक खात्यांवर पैसे भरण्यास सांगितले.

घाबरलेल्या शोभा नायक यांनी आरोपीने दिलेल्या विविध बँक खात्यांवर ४८ लाख २९ हजार आरटीजीएस द्वारे वर्ग केले. पैसे दिल्यानंतर आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच शोभा नायक यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दिली. याप्रकरणी आकाश शर्मा नावाच्या व्यक्ती विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणारे महात्मा ज्योतिबा फुले



**अरविंद मोरे**

महात्मा ज्योतिराव गोविंदराव फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला. महात्मा फुले हे शालेय जीवनापासूनच हुशार होते. त्यांना मराठी, इंग्रजी, उर्दू, कन्नड, तामिळ, गुजराती भाषा येत असत. इ.स. १८४२ मध्ये १४ व्या वर्षी माध्यमिक शिक्षणासाठी पुण्याच्या स्कॉटिश मिशन हायस्कूलमध्ये इंग्रजी माध्यमात त्यांनी प्रवेश घेतला. बुद्धी अतिशय तल्लख, त्यामुळे पाच-सहा वर्षातच त्यांनी अभ्यासक्रम पूर्ण केला. शिक्षणामध्ये त्यांना विशेष रुची होती. त्याकाळी त्यांनी शिक्षणाला खूप महत्व दिले. तेव्हा इंग्रजांचे राज्य होते. तर जनता ही निरक्षर व गरिबीत जीवन जगत होती. त्यांना शिक्षणाचे महत्व समजावून सांगण्याची गरज होती. परंतु, कोणीही पुढाकार घेत नव्हते. अशा अवस्थेत ज्योतिबा फुलेंच्या मनात खूप मोठे द्वंद्व सुरु होते. त्यांच्या मनात विचारांची घालमेल सुरु होती. स्त्रियांना तर कुठलेच अधिकार नव्हते. स्त्रियांसाठी शिक्षण हा विचार दूर-दूरपर्यंत कोणाच्याही मनात शिवत नव्हता. त्याकाळी काळी लहान वयात लग्न व्हायचे. त्या वेळेच्या रूढी परंपरेप्रमाणे ज्योतिबांचे लग्न लहान वयातच झाले. अर्थातच त्यांची होणारी पत्नी सावित्री ही सुद्धा वयाने लहानच होती. एवढ्या लहान वयात लग्न आणि बाल वयात कोवळ्या मनावरचे संस्कार व जबाबदाऱ्या या प्रक्रियेतून हे दाम्पत्य जात होते. पण जयंतीबांच्या मनात मात्र विचार हे वेगळेच घोंगावत होते. त्यांनी आपल्या पत्नीला (सावित्रीला) शिक्षण देण्याची खूणगाठ बांधली. ज्योतिबाने घरूनच शिक्षणाचे पाठ आपल्या सावित्री पत्नीला दिले. संसार आणि शाळा या दोन आघाडींवर त्यांच्या संसाराचा गाडा सुरु होता.

ज्योतिबाच्या मनात सावित्रीबाईना घरी शिक्षण दिल्यानंतर एक महान विचार आला होता. तो म्हणजे मुलींना/स्त्रियांना शिक्षण देण्याचा. तो काळ एकदमच वेगळा होता. ज्योतीबांचा हा पुरोगामी विचार त्यावेळी कोणालाही रुचणारा नव्हता. तरीही ज्योतीबांना स्त्री शिक्षणाची चळवळ पुढे न्यायची होती. स्त्री शिकली तरच समाजाचा अर्थात राष्ट्राचा उधार होईल, असे त्यांना वाट होते आणि म्हणून त्यांनी स्त्रियांच्या शिक्षणासाठी पहिली शाळा भिडे वाडा पुणे इथून सुरु केली. अर्थात पहिल्या शिक्षिका सावित्रीबाई फुले याच होत्या. सावियत्रीबाईनी पुढाकार घेऊन स्त्रियांना शिक्षण देण्याचे काम सुरु केले. यामध्ये सावित्रीबाई फुलेंना फार अपमान सहन करावा लागला. हे आपण सर्वांना सर्वश्रुत आहेच. तसेच ज्योतिबा फुलेंना सुद्धा आपला वारंवार जीव धोक्यात टाकावा लागला. त्यांच्यावर अनेकदा प्राणघातक हल्ले झाले. परंतु, त्यातून बरेचदा ते वाचले. कारण काय तर हा शिक्षणाचा त्यांचा पुरोगामी विचार त्यावेळच्या समाजाला आवडत नव्हता. तरीही या दोन्ही दाम्पत्यांनी हार मनाली नाही आणि शिक्षणाची मोहीम ही सुरूच ठेवली. काय गरज होती या फुले दाम्पत्यांना? का ते आपले प्राण धोक्यात टाकत होते? तसे बघितले तर फुले दाम्पत्य हे श्रीमंत होते. त्यांना काय पडली शिक्षणाने इतरांना सुशिक्षित करण्याची. यासाठी ज्योतीबांना खूपच यातना भोगाव्या लागल्या. फुले कुटुंबावर समाजाने बहिष्कार टाकला होता. शेवटी फुले दाम्पत्यांना कुटुंबावर बहिष्कार टाकल्यामुळे घर आणि गावाचा त्यांना करावा लागला.

तरीही शिक्षणासाठी ज्योतिबा फुलेंचे अतोनात प्रयत्न सुरूच होते. या महाभागाने आधुनिक काळात अनेक सुधारणांना महाराष्ट्रात प्रथम जन्म दिला. त्यांच्या हातून सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या चळवळीचा महाराष्ट्रात उगम झाला नसता तर महाराष्ट्राचं काय संपूर्ण भारत शिक्षणात मागे राहिला असता. ज्योतिरावांच्या सार्वजनिक कार्याची सुरुवात मुळी शिक्षण प्रसारपासून झाली. शिक्षणाचे जीवनच प्रथम समाजाला पाजण्याचा त्यांनी निश्चयाने घेतला होता. शिक्षणाशिवाय सुधारणा नाही म्हणून शिक्षण प्रसार करणे हा त्यांच्या चळवळीचा पवित्रा होता.

इंग्लंडमध्ये त्यावेळी सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा जारी करण्याची चळवळ जोरात सुरु होती. आपल्याही देशात अशा कायद्याची जरुरी ज्योतीबांनी सरकारला कळविली होती. १८७४ पासून सत्यशोधक समाजाच्या मंडळींनी सभांतून ठराव करून ते मुंबई सरकारकडे पाठविले आणि ठिकठिकाणच्या लोकांच्या नावाने व सह्यांचे विनंती अर्जही पाठविले. त्यानंतर १० वर्षानंतर सरकार जागे झाले. १८८४ साली विलायत सरकारने सक्तीच्या शिक्षणाच्या उपयुक्ते बद्दल भारतात मत अजमावून पाहण्याकरिता एक कमिशन नेमले. या चौकशी कमिटीचे अध्यक्ष हंटर हे होते. हंटर कमिशनने त्यावेळी बऱ्याच साक्षी घेतल्या. त्याप्रसंगी ज्योतिरावांनी जी साक्ष झाली ती फारच महत्वाची होती. ज्योतिराव फुले सोडून सक्तीच्या शिक्षणासाठी इतरांनी विरोधात मत दिले होते. परंतु, ज्योतिरावांनी प्रभावीपणे सक्तीच्या शिक्षाच मुद्दा इंग्रज सरकारला पटवून दिला. त्यांनी त्यावेळी म्हटले की, जर सरकार खरोखर जनतेचे मायबाप समजत असेल तर त्यांनी सक्तीचे शिक्षण करावे. यावेळी ज्योतिरावांनी हंटर कमिटीपुढे सक्तीच्या शिक्षणाची रूपरेषा इतक्या उत्तम तऱ्हेने मांडली होती, तिचीच हुबेहूब नक्कल इ.स. १९२२ सालच्या मुंबई कायदे कौसिलात त्यावेळच्या शिक्षण मंत्र्यांनी शिक्षणाची योजना म्हणून बिल पास करून घेतले. यामुळे आपण आज शिक्षणात क्रांती करू शकलो. समाज शिक्षित झाला. असे मोठे भरीव कार्य ज्योतिरावांनी आपल्यासाठी केले. आपली जी काही प्रगती झाली आहे ती ज्योतिरावांमुळेच हे अगदी सूर्यप्रकाशा एवढे सत्य आहे.

सन १८७७ मध्ये महाभयंकर दुष्काळ पडला होता. २० कोटी लोकसंख्येपैकी दोन कोटी लोक अन्नावाचून तरफडून मेले. माणसांना व गुराढोरांना पाणी नव्हते, चारा नव्हता. ज्योतिरावांनी पुढाकार घेऊन मुळा मुठा नदीवर धारण बांधण्याची संकल्पना मांडली. ज्योतिरावांनी पुढाकार घेऊन धरण बांधले आणि पाण्याचा सुकाळ झाला. याचा परिणाम म्हणून शेत पाण्याखाली आणि शेतकरी समृद्ध झाला. फळे, पिके फुलू लागली व आज ही जे क्षेत्र समृद्ध असून संपन्न आहे ते केवळ ज्योतिरावांमुळेच.

११ मे १८८८ रोजी कोळीवाडा हॉल, मुंबई येथे मुंबई शहरातील नागरिकांची एक जंगी जाहीर सभा बोलावली होती. या सभेस मुंबईतील बरेच प्रतिष्ठित नागरिक, दुकानदार, कारखानदार व मजूर उपस्थित होते. यावेळी त्यांचा गुणगौरव करून ज्योतिराव महात्मा पुरुष म्हणून संबोधून त्यांना महात्मा पदवी देण्यात आली.

ही कार्ये केवळ महात्माच करू शकतात. ज्यांच्या मनामध्ये मानवता आहे. मानवाला या महात्म्याने शिक्षण व शेतकऱ्यांना मुबलक पाणी दिले, धारण बांधून अजूनही आपली तहान भागवत आहेत. तसे बघितले तर हाच खरा आधुनिक भारताचा रत्न आहे. अशा या महान भारत रत्नाला, महात्म्याला जयंतीनिमित्य विनम्र अभिवादन!

# सफाई कामगारांच्या लढ्याला यश

## अन्यायाविरोधातील एकजुटीने प्रशासन झुकले

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

**शहराच्या स्वच्छतेची जबाबदारी खांद्यावर वाहणाऱ्या सफाई कामगारांनी अन्यायाविरोधात उभारलेला आवाज अखेर यशस्वी ठरला आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेले बेमुदत कामबंद आंदोलन प्रशासनाने मागण्या मान्य केल्यानंतर मागे घेण्यात आले असून, कामगारांनी पुन्हा कामावर रुजू होण्याचा निर्णय घेतला आहे. या विजयामुळे कामगारांमध्ये समाधान आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.**

श्रीवर्धन नगरपरिषद हद्दीत कार्यरत कंत्राटी सफाई कामगार अनेक वर्षांपासून विविध समस्यांना सामोरे जात होते. शासनाने मंजूर केलेली ६२७ रुपये दैनिक मजुरी प्रत्यक्षात मिळत नसून कामगारांना केवळ ३३३ रुपये दिले जात असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला होता. या आर्थिक तफावतीमुळे कामगारांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली होती. याशिवाय, पगाराचा सातत्याने होणारा विलंब, भविष्यनिर्वाह निधी व बोनसचा अभाव, आरोग्य सुविधांची कमतरता आणि काम करताना आवश्यक सुरक्षा साधनांची अनुपलब्धता या मुद्द्यांमुळे कामगारांचे जीवन अधिकच कठीण झाले होते. या सर्व समस्यांचा निषेध करत त्यांनी एकजुटीने संप पुकारला.

कामगारांनी सुरू केलेल्या या आंदोलनामुळे शहरातील स्वच्छता व्यवस्था विस्कळीत झाली होती. रस्त्यांवर कचऱ्याचे ढिग साचू लागल्याने नागरिकांमध्येही चिंता व्यक्त केली जात होती. या परिस्थितीमुळे प्रशासनावर तातडीने तोडगा काढण्याचा दबाव वाढला होता. स्थानिक सर्व पक्षीय लोकप्रतिनिधींनीही कामगारांच्या मागण्यांना पाठिंबा देत प्रशासनावर दबाव वाढवला. नगराध्यक्षांसह विविध पक्षांच्या नगरसेवकांनी कामगारांच्या बाजूने भूमिका घेतली. नगरसेवक देवेंद्र भुसाणे यांनी ''कामगारांना न्याय मिळाला नाही, तर स्वतः उपोषणाला बसणार'' असा प्रखर इशारा दिल्याने आंदोलनाला अधिक बळ मिळाले होते.

कामगारांच्या मागण्यांची गंभीर दखल घेत नगरपरिषद प्रशासनाने अखेर महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. विद्यमान ठेकेदाराचे कंत्राट रद्द करून नवीन ठेकेदाराची नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

तसेच, कामगारांना शासनमान्य मजुरी देण्याचे आणि रखडलेले पगार तातडीने देण्याचे आश्वासन प्रशासनाने दिले आहे. या निर्णयामुळे कामगारांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मागण्यांना न्याय मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

### स्वच्छता सेवा पुन्हा सुरळीत होणार

मागण्या मान्य झाल्यानंतर सफाई कामगारांनी संप मागे घेत कामावर रुजू होण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे गेल्या दोन दिवसांपासून विस्कळीत झालेली शहराची स्वच्छता सेवा आता पुन्हा सुरळीत होणार आहे. नागरिकांनीही या निर्णयाचे स्वागत करत प्रशासन आणि कामगारांचे आभार मानले आहेत.

## पत्रकारांसाठी ‘आपलेपणाचा’ नवा आधार

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

लोणावळा येथे पत्रकारांसाठी पन्नास वर्षापूर्वी उभारण्यात आलेल्या कै. दी. गो. तेंडुलकर स्मृती मंदिर विश्रामधामाच्या विस्तारीत कक्षाचे उद्घाटन ११ एप्रिल रोजी दुपारी २ वाजता होणार आहे. सतत समाजासाठी झटणाऱ्या पत्रकारांना स्वतःसाठी वेळ मिळत नाही, ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन या प्रकल्पाची उभारणी करण्यात आली आहे. आयुष्यातील थकवा घालवणारा आणि नव्या उर्जेने पुन्हा कार्यरत होण्यासाठी प्रेरणा देणारा ‘घरचा’ हळवा कोपरा निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. यामागे पत्रकार संघाच्या सदस्यांची मेहनत, जिद्द आणि एकोप्याची भावना दडलेली आहे, असे मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण यांनी सांगितले.

## स्वामी समर्थ प्राणप्रतिष्ठा सोहळा

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

मोहोपाडा आळी आंबिवली येथे आकर्षक श्री स्वामी समर्थ मठ साकारण्यात आले आहे. या मठातील श्री स्वामी समर्थ प्राणप्रतिष्ठा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. गुरुवारी (दि.९) सकाळी गणेश पूजन, पुण्याहवन, मातृकापूजन नांदी श्राद्ध, दुपारी अग्नीस्थापना नवग्रह मंडळ, वास्तूमंडळ व मुख्य देवता मंडळ स्थापना कार्यक्रम झाला. यानंतर दुपारी पाच ते आठ वाजता मोहोपाडा पोलिस चौकी येथून मुख्य बाजारपेठ तेथून आळी आंबिवली गावातून श्री स्वामी समर्थ मठ अशी नगर प्रदक्षिणा करण्यात आली. या मिरवणूक रथात कळश तसेच श्री स्वामी समर्थांची मूर्ती बसविण्यात आली होती. झांझफथक व बॅण्डच्या तालावर मिरवणूक काढण्यात आली. यावेळी महिलांनी डोक्यावर तुळशीवृंदावन घेतल्याचे पहावयास मिळाले. तर शुक्रवारी (दि.१०) सकाळी त्रिपर्यांय हवन, मूर्ती स्थापना, कलश प्राणप्रतिष्ठा, तत्वन्यास, कळशारोहण, दुपारी षौढशोपचार पुजा-आरती आदी कार्यक्रम पार पडले.

## पाणी फाउंडेशनतर्फे फार्मर कप

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**



पाणी फाउंडेशनतर्फे पेण तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी युसुफ मेहेरअली सेंटर बांधणवाडी येथे ‘फार्मर कप २०२६’ चे तीन दिवसीय निवासी प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले होते. या तीन दिवसांच्या प्रशिक्षणाचे आयोजन पानी फाउंडेशन, कृषी विभाग पेण, उमेद यांच्या संयुक्त विद्यमाने केले होते. यावेळी प्रगतशील शेतकरी सदाशिव म्हात्रे, रमेश पाटील ॲड.डी के पाटील, प्रदीप म्हात्रे, कैलासराजे घरत, रोहिणी ठाकूर, अभिमन्यू म्हात्रे यांच्यासह ६६ प्रशिक्षणार्थी शेतकरी व महिला या मार्गदर्शन शिबिरात सहभागी झाल्या होत्या. प्रशिक्षक टीम आशिष लाड, अभिजीत पवार अनिकेत जगदाळे, अंकिता कोठे, कल्याणी माळी, बालकृष्ण रणसिंग, विजय नाचरे यांनी शेतीविषयी उत्तम मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणातून गटशेतीतून उत्पन्न वाढीबाबत आवश्यक माहिती मिळाली. भर उन्हातच शेत नांगरणी करावी, भाताचे वाण घेऊन ‘बीज उगवण प्रक्रिया’ तसेच ‘रासायनिक बीज प्रक्रिया’ व ‘जैविक बीज प्रक्रिया’ करताना कोणती काळजी घ्यावी, यांचे प्रात्यक्षिक करून घेतले. त्यामुळे शेतकऱ्यांना आपल्याकडून होणाऱ्या चुका लक्षात आल्या.

**सर्व यंत्रणांनी काटेकोर अंमलबजावणी करावी | आयुक्त रुबल अग्रवाल यांचे निर्देश**

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवाचे नियोजन

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दि.१४ एप्रिल रोजी होणाऱ्या जयंती उत्सवासाठी देशभरातून लाखो नागरिक चैत्यभूमीवर अभिवादनासाठी येतात. हा जयंती उत्सव सुरळीत पार पडण्यासाठी पोलीस, महानगरपालिका व जिल्हा प्रशासनाने परस्पर समन्वयाने काम करावे. जयंती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर करण्यात आलेल्या नियोजनाची सर्व यंत्रणांनी काटेकोर अंमलबजावणी करावी, असे निर्देश कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल यांनी दिले.

कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १४ एप्रिल रोजीच्या १३५ व्या जयंतीच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने आढावा बैठक मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे झाली. यावेळी ते बोलत होते. या बैठकीस अपर आयुक्त फरोग मुकादम, अपर जिल्हाधिकारी बप्पासाहेब



थोरात, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. शिवनंदा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाणदिन समन्वय समिती, दादर चैत्यभूमी स्मारक समितीचे प्रतिनिधी यांच्यासह विविध विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. तर कोकण विभागातील सर्व जिल्हाधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीस सहभागी झाले होते.

यावेळी आयुक्त रुबल अग्रवाल म्हणाल्या की, गर्दी व्यवस्थापन, वाहतूक नियंत्रण आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस विभागाने विशेष दक्षता घ्यावी. तसेच महानगरपालिकेने स्वच्छता, पिण्याचे पाणी, तात्पुरत्या शौचालयांची व्यवस्था व आरोग्य सेवा याबाबत योग्य नियोजन करावे. चैत्यभूमी परिसरातील स्वच्छता, साफ- सफाई याबाबत संबंधित यंत्रणांनी काटेकोरपणे जबाबदारी पार पाडावी. तसेच, कोकण विभागातील जिल्ह्यांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांची रोषणाई, संविधानाच्या प्रतींचे वाटप, जनजागृतीपर कार्यक्रम, व्याख्याने तसेच सामाजिक समतेचा संदेश देणारे विविध उपक्रम आयोजित करावेत, असे निर्देश विभागातील जिल्हाधिकाऱ्यांना त्यांनी दिले.

कोकण विभागातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्यांमध्ये सामाजिक समता सप्ताह आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

बैठकीत चैत्यभूमीवर हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी, नियंत्रण कक्ष, आरोग्य सेवा, रुग्णवाहिका, रेल्वे व्यवस्था, बेस्ट व्यवस्था, पिण्याचे पाणी, भोजन व्यवस्था, सीसीटीव्ही देखरेख, पोलीस बंदोबस्त तसेच वाहतूक नियोजन यासंदर्भातदेखील विभागीय आयुक्तांकडून निर्देश देण्यात आले.

# निवडक

## भूपेंद्र गायकवाड पुरस्काराने सन्मानित



**रसायनी :** छावा प्रतिष्ठान, नवी मुंबई यांच्या वतीने भव्य पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात महाराष्ट्रासह भारतातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना सन्मानित करण्यात आले. यावेळी मास्टर भूपेंद्र शिवाजी गायकवाड यांना ‘छत्रपती संभाजी महाराज राष्ट्रीय क्रीडा रत्न पुरस्कार २०२६’ प्रदान करण्यात आला. तसेच, त्यांच्या दोन गुणवंत विद्यार्थ्यांना आदित्य अमोल खंडीझोड व धनेशा सुनील शिंगोटे यांना इंडियन नॅशनल अवॉर्ड २०२६ देऊन गौरविण्यात आले. यावेळी सुभेदार कुणाल मालुसरे, आयपीएस अधिकारी दिपक साकोरे, डिसीपी डॉ. राज खतीब, अभिनेते विजय पाटकर, पैलवान चौधरी, दिपक राजे शिर्के उपस्थित होते. मास्टर भूपेंद्र गायकवाड हे स्वसंरक्षण, शारीरिक शिस्त व सामाजिक सुरक्षितता यांचा समन्वय साधणारे प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहे. मास्टर भूपेंद्रस मार्शल आर्ट स्पोर्ट्स अँड फिटनेस अकादमीचे संस्थापक म्हणून त्यांनी हजारो विद्यार्थ्यांना योग्य दिशा दिली आहे. सन २००६ पासून सिक्युरिटी महाविद्यालयात मार्शल आर्ट ॲक्टिव्हिटी राबवून परिसरातील हजारो विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले आहे. सन २०१८ पासून विभागातील मुला-मुलींना आत्मसंरक्षणाचे प्रशिक्षण दिले. राजमाता जिजाऊ यांच्या प्रेरणेने महाराष्ट्राचे मर्द मावळे स्पर्धेद्वारे चांदीचा कडा देऊन खेळाडूंना सन्मानित करण्याची अभिनव संकल्पना त्यांनी यशस्वीरित्या राबवली आहे.



## जागतिक होमिओपॅथी दिन साजरा

**कर्जत :** कर्जत मेडिकल असोसिएशनतर्फे जागतिक होमिओपॅथी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. होमिओपॅथीचे जनक डॉ. सॅम्युअल हॅनिमन यांच्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कर्जत येथील रॉयल गार्डन रेस्टॉरंटमध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी रायगड मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. आशुतोष कुलकर्णी, कर्जत मेडिकल असोसिएशनचे नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. प्रशांत गांगल, सुकाणू समितीचे सदस्य डॉ. प्रभाकर काळे यांच्यासह कर्जत मेडिकल असोसिएशनचे संपादक डॉ. कुमार ओसवाल, डॉ. नितीन भोपतराव, डॉ. विलास सारोदे, सचिव डॉ. संजीव पाटील, डॉ. गीता राव, डॉ. शर्वाणी कुलकर्णी, डॉ. राहुल पाटील, कर्जत मेडिकल असोसिएशनचे उपाध्यक्ष डॉ. रितेश जैन, तसेच डॉ. मनीष परमार, उप खजिनदार डॉ. गणेश मेंगाळ आणि इतर वरिष्ठ सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ. आशुतोष कुलकर्णी यांनी सर्व सदस्यांनी एकत्रितपणे काम करून विविध वैद्यकीय पद्धतीतील सर्वोत्तम उपचारांचा वापर करत रुग्णसेवा अधिक प्रभावी करण्याचे आवाहन केले. तर डॉ. नितीन भोपतराव यांनी मानसिक स्थिती आणि आजार यांच्या परस्पर संबंधांचे निरीक्षण होमिओपॅथीमधे किती उपयुक्त आहे, हे सोदाहरण स्पष्ट केले.

## कालनिर्णयतर्फे पाकनिर्णय स्पर्धा

**अलिबाग :** दरवर्षीप्रमाणे यावर्षीही कालनिर्णयतर्फे वाचकांसाठी ‘पाकनिर्णय स्पर्धा-२०२७’ ही पाककृती स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेसाठी चॉकलेट पदार्थ, कैरी/आंब्याचे पदार्थ, गोड/ तिखट वड्या आणि रोल/रॅप असे चार विभाग ठरविण्यात आले आहेत. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांनी आपल्या पाककृती या विभागांतर्गत पाठविणे आवश्यक आहे. प्रत्येक स्पर्धक जास्तीत जास्त दोन विभागांसाठी आपली पाककृती पाठवू शकतो. स्पर्धकांनी आपली पाककृती आणि पाककृतीचा स्पष्ट फोटो paknirnay@kalnirnay.com या इमेलवर किंवा www.kalnirnay.com/paknirnay या लिंकवर अपलोड करावा. स्पर्धकांनी प्रथम आपले नाव, संपूर्ण पत्ता, संपर्क क्रमांक, इमेल आयडी त्यानंतर पदार्थाचे नाव, साहित्य आणि कृती याच क्रमाने पाककृती लिहून पाठवावी. पाककृती पाठविण्याची अंतिम तारीख १५ मे २०२६ पर्यंत असणार आहे. प्रत्येक विभागातून तीन विजेते निवडण्यात येणार आहेत. तर सर्वोत्कृष्ठ १२ पाककृती ‘कालनिर्णय मराठी २०२७’, तर उत्तेजनार्थ १८ पाककृती ‘कालनिर्णय सांस्कृतिक दिवाळी अंक २०२६’मध्ये प्रसिद्ध करण्यात येतील. काही खास पाककृती ‘स्वादिष्ट २०२७’ मधून प्रसिद्ध होणार आहेत. अधिक माहितीसाठी www.kalnirnay.com/paknirnay या संकेतस्थळावर भेट द्यावी.

## कर्करोगग्रस्तांसाठी रक्तदान शिबीर

**मुंबई :** समर्थ चॅरिटेबल ट्रस्ट आणि श्री स्वामी साई पेपर सर्व्हिसेसच्या संयुक्त विद्यमाने परळ येथील टाटा रुग्णालयातील कर्करोगग्रस्त रुग्णांसाठी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर बेस्ट अलॉटीज असोसिएशन, डॉ. एस. एस. राव रोड, परळ येथे रविवारी १२ एप्रिल रोजी सकाळी ८.३० ते दुपारी १ वाजेपर्यंत असणार आहे. तरी रक्तदात्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून रक्तदान करावे, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष योगेश नाटेकर, सरचिटणीस अमित डगरे, खजिनदार अनिकेत करमळकर यांनी केले आहे.


## जाहीर नोटीस

सदरील नोटिशीद्वारे सर्वांना सूचित करण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील परिशिष्टमध्ये नमूद केलेली जमीनमिळकत हि संदर्भित जमीनमिळकतीच्या विद्यमान मालकाकडून कायमस्वरूपी व कायदेशीरपणे विकत घेण्याचे ठरविले आहे. संदर्भित मिळकत हि पूर्णपणे बिनजोखमी, बोजविरहित व निर्वेध तसेच कोणत्याहीप्रकारे अबाधित असल्याचा निवार्ळा विध्यमान मालकानी आमच्या अशिलाला दिलेला आहे. असे असूनदेखील संदर्भित मिळकतीमध्ये जर कोणत्याही व्यक्तीचे/व्यक्तींचे खरेदीखत, करारभाडेपट्टा, बक्षीस, गहाणखत इत्यादीद्वारे व इतर कसल्याही कराराद्वारे वा दस्ताद्वारे प्राप्त होणारे कायदेशीर हक्क/अधिकार वा हितसंबंध असतील तर अशा व्यक्तीने/व्यक्तींनी त्या आशयाची लेखी हरकत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १० दिवसांचे आत आमच्या खालील नमूद पत्त्यावर पाठवून द्यावी. विहित मुदतीनंतर आलेली हरकत/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व आमचे अशील संदर्भित मिळकतींचा व्यवहार अंतिमः पूर्ण करतील याची कृपया नोंद घ्यावी.

**: संदर्भित जमीन मिळकतींचे परिशिष्ट :**

| मौजे | गट नं | हिस्सा नं | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु. पै.) | विद्यमान मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| कोळगाव, ता. अलिबाग, जी. रायगड | ८८ | - | ०.२८.४० | ७.३२ | अनुसया दामोदर म्हात्रे व इतर |

अलिबाग
दिनांक : ११-०४-२०२६

ऋग्वेद ठाकूर
एडव्होकेट
ए -२०३, वसंत पुष्प सि एच एस,
स्टेट बँक ऑफ इंडिया समोर,
अलिबाग, जि. रायगड - ४०२ २०१.

अलाथिया लॉ एल एल पि
(एडव्होकेट्स अँड सॉलिसिटर्स)
१२२, १२वा मजला,
मित्तल टॉवर सी विंग,
नरिमन पॉईट, मुंबई - ४०० ०२१.

# मुरुडमध्ये पौष्टिक आहार वाटप

| कोर्लई | प्रतिनिधी |

राज्यात दि.९ ते दि.२३ एप्रिल या कालावधीत पोषण पखवाडा साजरा करण्यात येत आहे. मुरुड तालुका पंचायत समितीचे सभापती निलेश घाटवळ मान्यवरांच्या हस्ते पोषण पखवाडा कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी गरोदर, स्तनदा, माताना पौष्टिक आहाराचे वाटप करण्यात आले.

पोषण पखवाडा बाबत आयुक्त एकात्मिक बाल विकास सेवा योजना महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे आलेले परिपत्रक वाचन करण्यात आले. यावेळी निलेश घाटवळ, अश्विनी जंगम, अश्विनी डोंगरीकर, गणेश नाक्ती, गटविकास अधिकारी राजेंद्रकुमार खताळ, सहाय्यक गटविकास अधिकारी मंगेश पाटील, संजय शेडगे, विस्तार अधिकारी प्रसाद माळी, वसंत दळवी, राजेश वाडेकर, स्वप्नील म्हात्रे, शुभांगी कोतवाल, सुवर्णा चांदोरकर, आशा सोनकुसरे, श्रुतिका भायदे, अंगणवाडी सेविका व कर्मचारी वृंद आदी उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खाली वर्णन केलेल्या मे. राहुल डायिंग अँड प्रिंटिंग प्रा. लि. इंडियन कंपनी अ‍ॅक्ट अंतर्गत नोंदणीकृत कंपनी, कार्यालय: पत्ता : रुम क्रमांक ९, दुसरा मजला, बोटावाला बिल्डिंग, ओल्ड हनुमान लेन, मुंबई-४०000२ पर्यायी पत्ता : पत्ता: प्लॉट नं १११/१ रोड नं-१३ एम.आय.डी.सी. अंधेरी (पूर्व), मुंबई-४000९३ यांच्या मालकीची व प्रत्यक्ष ताबे कब्जातील असणारी खाली नमूद बिनशेती जमीन मिळकती गट क्र. १५९/१ हे. ५ आर. ९८ प्र.0 (५९८00 चौ. मी.), गट क्र. १५९/२ हे. ४ आर. १0 प्र. 0 (४१000 चौ. मी.), गट क्र. १५९/३ हे. ४ आर. ६३ प्र. 0 (४६३00 चौ. मी.), गट क्र. १९६ हे. ५ आर. १0 प्र.0 (५१000 चौ. मी.), एकूण क्षेत्रफळ : हे. १९ आर. ८१ प्र. 00 (१९८१00 चौ.मी.) (या संपुर्ण क्षेत्रासाठी संपुर्ण मालकी हक्क असणारी) जमिन मिळकती खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मालक व त्यांच्या जमिनीचे तपशीलवार वर्णन खालीलप्रमाणे:-

| अ.क्र. | शेतकऱ्याचे नाव | गावाचे नांव | सर्व्हे क्र. /गट क्र. | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|
| १. | मे. राहुल डायिंग अँड प्रिंटिंग प्रा.लि. | मौजे. ताम्हणशेत, ता. रोहा, जि. रायगड | १५९/१<br>१५९/२<br>१५९/३<br>१९६<br>भोगवटदार वर्ग-१ | (५९८00 चौ. मी.)<br>(४१000 चौ. मी.)<br>(४६३00 चौ. मी.)<br>(५१000 चौ. मी.) |
| | | | एकूण क्षेत्र | (१९८१00 चौ. मी.) |

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस, हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहीवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास अथवा सदरहू कंपनीच्या विरुद्ध कोणताही दावा, हक्क किंवा हरकत असल्यास, ज्यामुळे प्रस्तावित खरेदीदारांचे सदर जमीन मिळकत खरेदी करण्यासंबंधित हक्क व अधिकार बाधित होतील. त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांचे आत खालील सही करणार त्यांचे खाली नमूद पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी, वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे. असे समजून सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशील सदर मिळकतीचे खरेदीखताचे व्यवहार पूर्ण करतील मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

दिनांक :- /0४/२0२६

सही/-
**अ‍ॅड. उदय व्ही. कबीर**
C/o. पत्ता :- ९0९, मयुरेश स्क्वेअर,
सेक्टर. १५, प्लॉट क्र. १७, सीबीडी बेलापूर
नवी मुंबई ४00६१४
मोबाईल क्रमांक ९00४0७१४२२

दिनांक १0/0४/२0२६

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशीलांनी मौजे झाप ता. सुधागड जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे - झाप ता. सुधागड जि. रायगड**

| कब्जेदाराचे नांव | गट न./स. नं. | क्षेत्र हे. आर | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| श्री. हरिदास गंगाराम बडे व ५ | ३३३ | 0-४४-५0<br>पैकी 0-१६-0 | ७-५६ |

सदर वरील वर्णन केलेली एकूण सर्व मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे कब्जेदार यांचेकडून कायम खरेदीने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर होणारे खरेदी विक्री व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा दावा असल्यास वा सदरहु मिळकतीचे खरेदी विक्री बाबत तसेच हक्क हितसंबंध, मालकी वहीवाट, पोटगी बक्षिसपत्र मृत्यूपत्र, साठेकरार अथवा कोणाचेही काही हक्क हितसंबंध वहिवाट अथवा सदर मिळकतीचे ताबे कब्जा वहिवाट असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून संबंधीत तक्रारदार याने आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत ७ दिवसांचे कालावधीत खालील पत्त्यावर नोंदवावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे. असे समजून आमचे अशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

ठिकाण :- पाली - सुधागड
दिनांक : १0/0४/२0२६

सही/-
**श्री. प्रभाकर कृष्णकांत भोईर**
अ‍ॅडव्होकेट
मु. पो. नविन पनवेल ता.पनवेल जि. रायगड
मो. बा. नं. ८१४९६५१५0८

महाराष्ट्र शासन
**महसूल व वन विभाग**
**विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय**
**जुने सचिवालय, विस्तार इमारत, पहिला मजला,**
**एलफिस्टन कॉलेजच्या बाजूला, काळा घोडा, फोर्ट, मुंबई- 0३२**

क्रं. अपिल/डेस्क/आरटीएस/रिव्ही/११0२/२0२५ दिनांक : 0९.0४.२0२६

जाहीर नोटीस
प्रती,
जयराम रामजी ठोंबरे पाटील तर्फे वारस
१. श्री. कुसुम जयराम ठोंबरे उर्फ पाटील
२. श्री. योगेश जयराम ठोंबरे
दोघे रा. १ व २ रा. भिलवले.
पो. वावंढळ, ता. खालापूर जि. रायगड
३. सौ. मंगल कमलाकर गडगे उर्फ
मंगला जयराम ठोंबरे उर्फ पाटील
रा. खरवई गाव- बदलापूर, ता. अंबरनाथ, जि. ठाणे ... अर्जदार
विरुध्द
श्री. प्रकाश हरी ठोंबरे - मयत वारस
१. सौ. वैशाली शैलेश बापार्डेकर पुर्वाश्रमीची
इंद्रा प्रकाश ठोंबरे
रा. माथेरान, ता. कर्जत, जि. रायगड
२. सौ. सुचित हरिभाऊ लबडे पुर्वाश्रमीची
चंद्रा प्रकाश ठोंबरे
रा. माथेरान, ता. कर्जत, जि. रायगड
३. सौ. राखी गणेश ठाकूर
रा. चावणे, ता. पनवेल, जि. रायगड
४. सौ. रेखा निलेश लबडे पुर्वाश्रमीची
रेखा प्रकाश ठोंबरे
५. श्रीम. शैला प्रकाश ठोंबरे
रा. भिलवले, पो. वावंढळ, ता. खालापूर
जि. रायगड
६. श्री. अनिल बाज्याबा चौधरी
पो. वावंढळ ता. खालापूर, जि. रायगड
७. श्री. अनंत रघुनाथ ठोंबरे
रा. भिलवले, पो. वावंढळ, ता. खालापूर
जि. रायगड
८. मे. नील लॅड प्रा.लि. तर्फे संचालक
प्रकाशचंद्र शुक्ला यांचेतर्फे अखत्यारी
श्री. संतोष गजानन नेरुरकर
१0२, सागर दर्शन, १0२३/४ रामनाथ रोड,
अलिबाग जि. रायगड
९. श्रीम. बिंदु श्रीकांत झवेरी
रा.३१, उषाकिरण चार्मीअल रोड, मुं- ... सामनेवाले

**विषय : अपर जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडील क्र. हक्कनोंद/अपिल नं. २८१/२0२४ दि. १६/0८/२0२५ चे विरूद्ध पुनरिक्षण अर्ज**

सामनेवाले यांस कळविण्यात येते की, वरील पुनरिक्षण अर्जाची सुनावणी (विलंबाच्या व दाखल करून घेण्याच्या मुद्यावर) मा. अतिरिक्त विभागीय आयुक्त, कोकण विभाग, मुंबई यांचे समोर त्यांचे जुने सचिवालय, १ ला मजला, विस्तार भवन, फोर्ट, मुंबई-३२ येथील कार्यालयात दिनांक 0६.0५.२0२६ रोजी सकाळी ११.00 वाजता होणार आहे.

वरील दिवशी व वेळी आपण स्वतः अगर वकीलामार्फत किंवा प्राधिकृत अभिकर्त्या मार्फत हजर राहून आपले म्हणणे मांडावे. वरील तारखेस आपण हजर राहून म्हणणे न मांडल्यास पुनरीक्षण अर्जाचे कामी आपणास काही सांगणे नाही असे समजण्यात येऊन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

सही/-
**(वैभव गुहागरकर)**
नायब तहसिलदार (अपिले)
कोकण विभाग

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळिवण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे मुशेत, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती, त्या मिळकतींचे विद्यमान मालक १) ज्योती दिपक विचारे, २) भारती संदिप महाबळे, ३) लिना अमित पडवळ, ४) सौ. अरुणा कमळाकर वाकडे, (पुर्वाश्रमीची अरुणा मधुकर निर्गुण), ५) श्री. अशोक विठोबा (विठ्ठल) निर्गुण, ६) सुनिल रामचंद्र कदम, ७) प्रदिप रामचंद्र कदम, ८) संदिप रामचंद्र कदम, ९) संजय रामचंद्र कदम, १0) प्रिया प्रशांत भुवड, ११) रंजना गणेश पाशिलकर, १२) सौ. स्नेहा सुतेज लब्दे, (पुर्वाश्रमीची करुणा मधुकर निर्गुण), १३) मालती मधुकर निर्गुण, १४) पल्लवी पांडुरंग कदम, उर्फ वासंती पांडुरंग कदम, १५) रोहिदास हरिश्चंद्र पवार, १६) प्रल्हाद हरिश्चंद्र पवार, १७) प्रमिला बाळाराम पिसाळ, १८) देवेंद्र वैजनाथ गुप्ता, १९) प्रविण वैजनाथ गुप्ता, २0) ज्योत्स्ना सचिन दुबे, २१) सुषमा सुभाष निर्गुण, २२) सुहास सुभाष निर्गुण, २३) अमोल सुभाष निर्गुण, २४) महेश रामभाऊ जगताप, २५) राजेंद्र रामभाऊ जगताप, २६) दिपिका दिनेश जगताप, २७) अनिकेत दिनेश जगताप, २८) स्पृहा स्वप्नील वाळंज, २९) शिल्पा शाम परब, ३0) मिताली महादेव शिरोडकर, ३१) गौरी कांचन चौधरी, ३२) जयश्री सुरेश झोरे, ३३) दत्ताराम गजानन निलवर्ण, ३४) मिना प्रकाश निलवर्ण, ३५) रमाकांत गजानन निलवर्ण व ३६) स्नेहल विजय पवार यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं./हि.नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| मुशेत | ४/३ | 0-१८-९0<br>पो. ख.0-0२-३0<br>0-२१-२0 | ४.५६ |
| मुशेत | ५ | 0-0७-00<br>पो.ख. 0-0१-00<br>0-0८-00 | १.६९ |

सदरच्या मिळकती या त्यांचे निर्वेध मालकी हक्कांच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क- हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतींचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व त्यांचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : ११/४/२0२६

सही/-
**अ‍ॅड. गणेश गोविंद पाटील**
ए/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग'को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी, अलिबाग,
रायगड, ४0२ २0१.

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **- मुख्य संपादक**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय**
**(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड जि. रायगड)**
ज.म. र अर्ज २९/२0२६

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्रीम. संपदा दिलीप भोपी, (सासरचे नाव)
श्रीम. संपदा काशिनाथ नाईक, (माहेरील नाव) अर्जदार
रा. मु. पो. तेलवडे, ता. मुरुड जि. रायगड
विरुद्ध
निबंधक, जन्म मृत्यु विवाह नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत आंबोली, सामनेवाला
ता. मुरुड-जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांचा जन्म दि. २४/0१/१९८४ रोजी मौजे आंबोली, ता. मुरुड, जि. रायगड येथे राहत्या घरात झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत आंबोली, यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज अ‍ॅण्ड डेथ अ‍ॅक्ट कलम १९६१ चे कलम १0 अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार यांचा दि. २४/0१/१९८४ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीला मार्फत मे. न्यायालयांत दिनांक १५/0४/२0२६ रोजी सकाळी ११:00 वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म- मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. 0९/0४/२0२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली. कळावे.

सही/-
**(आदेश डफळ)**
तहसिलदार मुरुड-जंजिरा

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल, १) सौ. कलायसेल्वी श्रीनिवासा रामानुजर रा. गट नं.४१/२, ईरवाडी (चिंचघर), मुंबई गोवा रोड, नॅशनल हायवे क्र. १७, ता. पेण, जि. रायगड व २) श्री. मोहित चिमण झोपे रा. त्रिमूर्ती चौक, मोठ्या पाण्याच्या टाकीजवळ, फैजपूर, जळगाव-४२५५0३ यांनी दि. १४-0२-२0२४ रोजी मौजे आंबिवली, ता. पेण. जि. रायगड येथील खालील मिळकतीसंबंधी मिळकतीचे मालक सौ. रुक्साना अन्वर पटेल व श्री. अन्वर हुसेनमियाँ पटेल दोघेही रा. ५0४/५0५, आदिल टॉवर बंदर रोड, जुना पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड यांच्याबरोबर साठेकरार केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नंबर | क्षेत्र(हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| आंबिवली ता.पेण जि.रायगड | १२ | 0-१७-५0<br>पो.ख.0-00-५0<br>एकूण 0-१८-00 | १.४४ |

आमच्या अशिलांनी जमिन मालकांबरोबर दि. १४-0२-२0२४ रोजी साठेकरार केला त्यादिवशी मिळकतीच्या विक्रीच्या रक्कमेपैकी २५% इतकी रक्कम जमिन मालकांस दिलेली आहे.

साठेकरार झाल्यानंतर जमिन मालकांपैकी श्री. अन्वर हुसेनमियाँ पटेल हे दि. 0२-0३-२0२४ रोजी मयत झाले. अन्वर हुसेनमियाँ पटेल यांना अदिल अन्वर पटेल हे वारस आहेत. दि. १४-0२-२0२४ रोजी सदरहू मिळकतीविषयी आमच्या अशिलांनी जमिन मालकांबरोबर साठेकरार केल्यानंतर अनेकवेळा मिळकतीचे खरेदीखत नोंदणीकृत करण्याविषयी बोलणी केली. अन्वर हुसेनमियाँ पटेल मयत झाल्यानंतरसुद्धा आमच्या अशिलांनी रुक्साना अन्वर पटेल व अदिल अन्वर पटेल यांच्याबरोबर सुद्धा मिळकतीचे खरेदीखत नोंदणीकृत करण्याविषयी बोलणी केली. परंतु त्यांनी आमच्या अशिलांबरोबर मिळकतीचे खरेदीखत नोंदणीकृत केलेले नाही. त्यानंतर आमच्या अशिलांनी जमिन मालकांस वकिलांमार्फत दि. ३0-0९-२0२४ व दि. 0४-११-२0२४ रोजी मिळकतीचे खरेदीखत नोंदणीकृत करण्याविषयी रजिस्टर नोटीस पाठविली. परंतु जमिन मालक यांनी आमच्या अशिलांबरोबर सदरहू मिळकतीचे खरेदीखत नोंदणीकृत केलेले नाही.

असे असताना आमच्या अशिलांस खात्रीलायक समजले की, मौजे आंबिवली, ता.पेण. जि. रायगड येथील गट नं.१२ या मिळकतीचे सहमालक रुक्साना अन्वर पटेल व अदिल अन्वर पटेल हे सदरहू मिळकत ही त्रयस्थ इसमांस विकण्याच्या विचारात आहेत. आमच्या अशिलांनी आजतागायत दि. १४-0२-२0२४ रोजीचा साठेकरार रद्द केलेला नसून तो अस्तित्वात आहे. आमचे अशिल हे सदरहू मिळकतीसंदर्भात दिवाणी न्यायालयात दि. १४-0२-२0२४ रोजीच्या साठेकराराच्या अनुषंगाने जमिन मालकांविरुद्ध साठेकराराची विशेष पुर्तता करुन मिळण्याकरिता दावा दाखल करणार आहेत.

तरी या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, मौजे आंबिवली, ता. पेण, जि. रायगड येथील गट नं. १२, एकूण क्षेत्र 0-१८-00 हे.आर, आकार १.४४ रु.पै. या मिळकतीविषयी जमिन मालक रुक्साना अन्वर पटेल व अदिल अन्वर पटेल यांच्याबरोबर कोणीही कोणत्याही प्रकारचा हस्तांतरणाचा व्यवहार करु नये. तसे केल्यास तो आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व आमचे अशिल हे जमिन मालक व खरेदीदार यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करतील याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. १0-0४-२0२६

सही/-
**अ‍ॅड. सुनिल के.वाकडे**
डी-१, तळमजला,
हिराबाग को.ऑप.हौ. सोसायटी.
मोदकम हॉटेल शेजारी, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड
मोबा नं. ९८६७७१५५२४



# शिक्षक संघाकडून गुणवंतांचा सत्कार

| तळा | प्रतिनिधी |

रायगड निवासी शिक्षक संघ, तळा यांच्या वतीने वार्षिक सर्वसाधारण सभा तसेच गुणवंत शिक्षक व विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार समारंभ गायमुख येथे उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संघाचे अध्यक्ष अमिष भौड यांनी भूषविले. कार्यक्रमास संस्थापक अध्यक्ष कमळाकर चोरगे, गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सेवानिवृत्त शिक्षक, आदर्श शिक्षक, गुणवंत विद्यार्थी, नवोदय व शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी, आयडॉल शिक्षक तसेच राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये यश संपादन केलेले शिक्षक व विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमा दरम्यान मान्यवरांनी रायगड निवासी शिक्षक संघाचे कार्य कौतुकास्पद असल्याचे नमूद केले. गेली १४ वर्षे विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शिक्षक व विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना प्रोत्साहन देण्याचे संघाचे कार्य प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

# कामोठ्यात क्षयरोग दिननिमित्त कार्यक्रम

**अलिबाग :** एमजीएम मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल कामोठे यांच्यामार्फत जागतिक क्षयरोग दिननिमित्त डॉ. जी. एस. नरशेट्टी व जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. प्राची नेहुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली क्षयरोग दिन कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाचे नियोजन डॉ. प्रसाद वैगनकर, डॉ. प्रदीप व्ही.पोतदर यांच्यामार्फत करण्यात आले होते. डॉ.ज्योती सालवे प्रतिबंधात्मक उपायावर मार्गदर्शन केले.

## समता नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, कोपरगांव

**स्व.यशवंतराव चव्हाण,समता सहकार मार्ग,खंदकनाला,कोपरगांव-४२३६०१**
ता.कोपरगांव,जि.अहिल्यानगर,(०२४२३)२२५५५७/५८
विश्वास + सुरक्षितता = समता

### संस्थेच्या नावे हस्तांतरीत झालेल्या स्थावर मिळकतीचा जाहीर लिलाव

ज्याअर्थी **समता नागरी सहकारी पतसंस्था मर्या.,कोपरगांव,ता.कोपरगांव,जि.अहिल्यानगर** यांनी खाली नमुद केलेल्या कर्जदार/थकबाकीदारांविरूद्ध महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये वसुली दाखला मिळवून थकीत रक्कमेचा भरणा न केल्यामुळे संस्थेने मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, **अलिबाग रायगड** यांचेकडेस प्रस्ताव दाखल करून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०० नियम ८५ अन्वये मालमत्ता हस्तांतरीत प्रमाणपत्र (**"र"प्रमाणपत्र**) मिळवून सदर तारण मिळकत संस्थेच्या नावे हस्तांतरीत केलेली आहे व मालकी,भोगवटादार सदरी संस्थेच्या नावाची नोंद झालेली आहे. सदर मिळकत विक्री करण्याचा संस्थेस अधिकार आहे. त्याअर्थी संस्थेने स्थावर मिळकतीची जाहीर विक्री करून थकीत रकमेचा वसुल करण्याचा निर्णय घेतला आहे.

**कर्जदाराचे/जामीनदाराचे नाव**

**कर्जदार - श्री.किशोर ओटरमल जैन.,**
**रा.** १७१६/०१,अंजुपार्क बाजारपेठ,मु.पो.नागोठाणे,ता.रोहा,जि.रायगड.४०२१०६
**यांचे जामीनदार :-**
**१)श्री.किरण अमृतलाल जैन.,रा.**आर्ची किराणा बाजारपेठ,मु.पो.नागोठाणे,ता.रोहा,जि.रायगड.४०२१०६
**२)श्री.दिनेश मिश्रीलाल परमार.,रा.**जैन एजन्सी बाजारपेठ,मु.पो.नागोठाणे,ता.रोहा,जि.रायगड.४०२१०६
**३)श्री.असलम रमजान शेख.,रा.**मु.पो.नागोठाणे,ता.रोहा,जि.रायगड.४०२१०६

**संस्थेच्या नावावर हस्तांतरण झालेल्या मिळकतीचे वर्णन**
मौजे उसाळे,ता.सुधागड,जिल्हा रायगड येथील समता नागरी सहकारी पतसंस्था मर्या.कोपरगाव यांची मिळकत.

| भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र एकक आर.चौ.मी | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र एकक आर.चौ.मी | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र एकक आर.चौ.मी | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र एकक आर.चौ.मी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २४/ब/५/ब/भुखंड क्र/१ | ५.५१ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/१५ | १.७१ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/२९ | २.०७ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/४३ | १.७० |
| २४/ब/५/ब/भुखंड क्र/२ | १.६३ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/१६ | १.६९ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/३० | १.८० | २४/ब/५/ब/भुखंड क्र/४४ | १.६९ |
| २४/ब/५/ब/भुखंड क्र/३ | १.९२ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/१७ | १.७० | २४/ब/५/ब/भुखंड क्र/३१ | १.६८ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/४५ | १.६९ |
| २४/ब/५/ब/भुखंड क्र/४ | १.८६ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/१८ | १.६९ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/३२ | २.६९ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/४६ | १.६९ |
| २४/ब/५/ब/भुखंड क्र/५ | १.७८ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/१९ | १.७१ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/३३ | २.४५ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/४७ | २.३९ |
| २४/ब/५/ब/भुखंड क्र/६ | १.८५ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/२० | १.६९ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/३४ | २.१० | २४/ब/५/ब/भुखंड क्र/४८ | २.०० |
| २४/ब/५/ब/भुखंड क्र/७ | २.२६ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/२१ | १.७१ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/३५ | १.४९ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/४९ | ३.६६ |
| २४/ब/५/ब/भुखंड क्र/८ | १.५४ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/२२ | १.६९ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/३६ | १.४२ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/५० | २.४४ |
| २४/ब/५/ब/भुखंड क्र/९ | १.७४ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/२३ | १.९७ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/३७ | ३.१२ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/५१ | ४.२९ |
| २४/ब/५/ब/भुखंड क्र/१० | १.७२ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/२४ | २.३७ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/३८ | २.४६ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/५२ | ५.८५ |
| २४/ब/५/ब/भुखंड क्र/११ | १.५७ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/२५ | १.७८ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/३९ | २.३४ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/५३ | १.९३ |
| २४/ब/५/ब/भुखंड क्र/१२ | १.४२ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/२६ | १.७४ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/४० | १.६९ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/५४ | २.०४ |
| २४/ब/५/ब/भुखंड क्र/१३ | १.७९ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/२७ | १.७३ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/४१ | १.६९ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/५५ | ४.९६ |
| २४/ब/५/ब/भुखंड क्र/१४ | २.१५ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/२८ | १.९७ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/४२ | १.७१ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/खुली जागा | २४.७५ |
| २४/ब/५/ब/भुखंड क्र/ सुविधाजन्य क्षेत्र | १२.०५ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/ बांधकाम रहित क्षेत्र | २.२९ | २४/ब/५/ब/भुखंड क्र/अंतर्गत रस्ता | ८२.४८ | | |

**जाहिर विक्रीत भाग घेऊ इच्छिणाऱ्यांनी नमूद ठिकाणी तारखेस व वेळेत उपस्थित रहावे.**
१) कर्जदाराने कर्ज रक्कम पूर्ण भरल्यास जाहीर विक्री रद्द करण्यात येईल.
२) जाहीर विक्रीच्या अटी व शर्ती विक्रींच्या वेळी वाचून दाखविणेत येतील.
३) विक्री तहकूब अथवा रद्द करण्याचा अधिकार संचालक मंडळाने राखून ठेवला आहे.
४) लिलावात भाग घेणेसाठी रु.२५,०००/- (पंचवीस हजार मात्र)अनामत भरावी लागेल.

वार **गुरुवार,दि.१४/०५/२०२६** रोजी,
वेळ **दु.०३.००** वाजता.
**ठिकाण :-** स्थावर मिळकतीच्या ठिकाणी मौजे उसाळे,ता.सुधागड,जि.रायगड येथे

दि.१०/०४/२०२६
स्थळ:- कोपरगांव

**जे.एस.कदम**
विशेष वसुली व विक्री अधिकारी
समता नागरी सहकारी पतसंस्था मर्या.,कोपरगांव
मो.नं.९३७१३३३५५६

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **झिराड आणि मांडवा येथील** दुकानात पीकअप आशयर व ४०७ वर ड्रायवर हवे आहेत. संपर्क - ८००७८९३२३२
- **बागायती वाडी विक्री १३ गुंठे** (घर, नारळ, सुपारी, विहीर) @२२ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक- सुहास माळी गाव- थळ गुंजाळ आळी, अलिबाग. रिसॉर्टसाठी योग्य जागा. मो. ८७७९८०५३५३
- **अलिबाग तालुक्यातील कुर्डूस** हद्दीमध्ये पोयनाड नागोठणे रस्त्यालगत आंबा, नारळ, चिकूची, झाडे असलेली १ एकर जागा विकणे आहे. लाईट, पाणी, रस्ता उपलब्ध मो.९२८४५०६०४१
- **फर्निचर वर्कशॉपमध्ये कामाला** मुले पाहिजेत १२/१५ वी पास, १५००० महिना, ठिकाण- बामणसुरे संपर्क -९८२३५८५३२१
- **३५ गुंठे शेत जमीन विकणे आहे.** मौजे कावीर-गरुडपाडा. बोअरवेल आणि इलेक्ट्रीक मीटर आहे. आतील रस्त्याला लागून. संपर्क ९८६७५३०७२७
- **अलिबाग एसटी स्टॅन्डजवळ दुकानगाळा** व अलिबागपासून दोन तीन कि.मी. अंतरावर रोडटच एकरवर जागा विक्री करणे आहे. ९७६४५४८६७९
- **नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी** स्टाफची आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, हाऊसकीपर,रेस्टॉरंट कॅप्टन, हाऊसकिपिंग सुपरवायझर, इच्छुक उमेदवारांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा. अथवा व्हॉटसअ‍ॅपवर मेसेज करावा. मोबाईल- ७५५९१८४६१२
- **वरसोली आदर्शनगर येथे ५.७५** गुंठे एन. ए. प्लॉट विकणे आहे. हवेशीर दोन्ही बाजूने रस्ता, बंगला फार्महाऊसकरिता उत्तम लाईट पाणी जवळच उपलब्ध. किंमत २७ लाख गुंठा. एजंट क्षमस्व. फोन-७०३०२११५५५
- **1 BHK ब्लॉक भाड्याने उपलब्ध.** सेंट मेरी स्कूलसमोर चेंढरे-अलिबाग, मो. ७६६६१२६८४४, ८४२११६३२५५

**जाहिरातीसाठी संपर्क : (0२१४१) २२२२९0/ २२२७६१**



## राशीभविष्य

- **मेष** : कायदेशीर बाबतीत विचारानं रहावं. कामासाठी धावपळ होईल. प्रकृतीच्या तक्रारी संभवतात.
- **वृषभ** : व्यवसायात नव्या संधी लाभतील. महत्त्वाच्या भेटी कामी येतील. कलाकारांचा उत्साह वाढेल.
- **मिथुन** : चैनीवर अधिक खर्च होईल. कौटुंबिक समस्या चिंता वाढवतील. कुलदेवतेची उपासना करावी.
- **कर्क** : उपजत कलागुणांचा विकास होईल. थोरामोठ्यांचा सहवास लाभेल. वाहन काळजीपूर्वक चालवा.
- **सिंह** : व्यवसायात आर्थिक उत्कर्ष होईल. कौटुंबिक स्वास्थ्य लाभेल. अचानक धनलाभाचे योग आहेत.
- **कन्या** : दिलासादायक घटना घडतील. प्रेम प्रकरणात वाद संभवतात. स्थावर प्रश्न प्रलंबित राहतील.
- **तूळ** : घरगुती व्यवसायात अनुकूलता राहील. विद्यार्थ्यांच्या गुणांना वाव मिळेल. अनावश्यक खर्च टाळावा.
- **वृश्चिक** : अनुभवींचा सल्ला कामी येईल. आर्थिक आवक साधारण राहील. नव्या योजना मार्गी लागतील.
- **धनु** : महत्त्वाची कामं मार्गी लागतील. यांत्रिक-तांत्रिक क्षेत्रात संधी लाभतील. मानसिक स्वास्थ्य लाभेल.
- **मकर** : नोकरीत बढतीच्या हालचाली होतील. मोठ्या खरेदीला चालना मिळेल. बाकी चिंता नसावी.
- **कुंभ** : अनपेक्षित संधी लाभतील. प्रवास शक्यतो लांबणीवर टाकावा. उष्णतेचे विकार उद्भवू शकतात.
- **मीन** : विवाहाच्या प्रयत्नात दिलासा मिळेल. धार्मिक स्थळाची यात्रा घडेल. नातलगांच्या भेटी होतील.

## ११ एप्रिल

दिनविशेष

**१९०६**: संस्कृतचे अभ्यासक, भाषाशास्त्रज्ञ सुमित्र मंगेश कत्रे यांचा जन्म.
**१९१९** : आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेची स्थापना.
**१९७०** : 'अपोलो-१३' हे यान चंद्राकडे रवाना झाले.
**२०१३** : भाजप प्रदेशाध्यक्षपदी देवेंद्र फडणवीस यांच्या नावाची घोषणा.
**२०१६** : अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री जॉन केरी यांनी हिरोशिमाला भेट दिली.
**२०१७** : कुलभूषण जाधव यांना पाकिस्तानने सुनावलेल्या फाशीप्रकरणी प्रसंगी मर्यादा ओलांडण्याची भारताकडून ताकीद.

टेक फन

## फेसबुक वापरत असाल तर...

छोट्यांनो, आपल्या फेसबुक अकाउंटची माहिती हॅकर्सपर्यंत पोहचू लागली आहे. विविध ॲप्सनाही तुमची माहिती दिली जाते. आपल्या प्रत्येक हालचालीवर गुगल, फेसबुकचं नीट लक्ष असतं. आपण कोणत्या वस्तू खरेदी करतो हेही त्यांना कळतं. त्यामुळे आपण वापरत असलेल्या वस्तूंच्या जाहिराती स्क्रीनवर दिसतात. आपली खाजगी माहिती अशाप्रकारे बाहेर जाऊ नये असं वाटत असेल तर आपल्या फेसबुक खात्याच्या सुरक्षेची खबरदारी आपणच घ्यायला हवी.

* तुमच्या फेसबुक खात्याचा पासवर्ड दुसऱ्या कशासाठीही वापरू नका. * सर्वात महत्त्वाचं म्हणजे तुमचा पासवर्ड दुसऱ्या कोणाला सांगू नका. तो गुप्तच असला पाहिजे. * सोपा पासवर्ड ठेऊ नका. तुमचं नाव, जन्मतारीख असलेला पासवर्ड बदलून टाका. कोणाच्याही पटकन लक्षात येणार नाही असा पासवर्ड असावा. त्यामुळे थोडा विचार करून नवा पासवर्ड तयार करा. * फेसबुकने काही सिक्युरिटी फीचर्स दिले आहेत. त्यांचा वापर करा. दुसऱ्यांच्या कॉम्प्युटरवर फेसबुक वापरलं असेल तर लॉग आउट करायला विसरू नका. अनोळखी कॉम्प्युटरवर फेसबुकचा वापर करू नका.

मुलांचा कोपरा

## असा खेळा बुद्धिबळ

मित्रांनो, बुद्धिबळ हा खेळ खेळण्यासाठी खेळाडूंमध्ये उत्कृष्ट बुद्धिमत्ता आणि उत्तम निर्णय घेण्याची क्षमता असणे आवश्यक आहे. हा खेळ फार प्राचीन आहे असून तो भारतात सुरू झाला. आता तो जगभर खेळला जातो. बुद्धीचा हा खेळ रशियाचा राष्ट्रीय खेळ आहे. तो दोन खेळाडूंमध्ये खेळला जातो. १५ व्या शतकात हा खेळ युरोप, ग्रीस, स्पेन, आयबेरिया आणि रशिया आदी देशांमध्ये पसरला.



त्याकाळी 'चतुरंग' म्हणून तो ओळखला जायचा. भारतात तो अजूनही बुद्धिबळ किंवा चतुरंग म्हणून ओळखला जातो. १८८७ पासून बुद्धिबळ या खेळाची चॅम्पियनशिप सुरू झाली. विश्वनाथन आनंद हा भारतातील सर्वात प्रसिद्ध खेळाडू आहे.

बुद्धिबळ खेळण्यासाठी तुम्हाला एक लाकडी चौकोन किंवा ब्लॉक, आठ उभे स्तंभ आणि आठ आडव्या रेषा आवश्यक आहेत. अशा प्रकारे एकूण ६४ लहान चौरस आहेत आणि हे चौरस क्रमाने पांढरे आणि काळे आहेत. तसेच खेळात १६ काळे आणि १६ पांढरे तुकडे आहेत किंवा सोळा तुकड्यांमध्ये आठ प्यादे, दोन हत्ती, दोन उंट, दोन घोडे, एक राजा आणि एक वजीर आहे. आधी सांगितल्याप्रमाणे या गेममध्ये फक्त दोन खेळाडू खेळू शकतात, त्यापैकी एका खेळाडूला १६ काळी चिन्हे आणि दुसऱ्या खेळाडूला १६ पांढरी चिन्हे दिले जातात. या खेळाचा उद्देश दुसऱ्या खेळाडूच्या राजाला हरवणे हा असतो. याला चेकमेट असे म्हणतात आणि प्रत्येक खेळाडूला आपल्या राजाला सुरक्षित ठेवण्यासाठी उरलेल्या चिन्हाचा वापर करून विशिष्ट चाल करावी लागते.

ब्युटी टॉक

## अशी आहे हॉट स्टोन थेरपी

हॉट स्टोन थेरपीमुळे स्नायूंवरचा ताण कमी होतो, रक्तप्रवाह सुरळीत सुरू राहतो आणि झोपेचा दर्जा सुधारतो. यामुळे दिवसभर आपल्याला प्रसन्न वाटतं. चला तर मग ही थेरेपी नेमकी काय आहे हे जाणून घेऊ या.

हॉट स्टोन थेरपीत गुळगुळीत, सपाट दगड गरम करून शरीराच्या विविध भागांवर ठेवले जातात. विशिष्ट प्रकारच्या व्हॉल्कॅनिक रॉकपासून बनवण्यात आलेले हे दगड उष्णता शोषून घेत असल्याने गरम राहतात. हे दगड शरीरावर ठेवण्याचीही वेगळी पद्धत आहे. थोडा दाब देऊन, अंगावर गोलाकार फिरवून मग ते विशिष्ट अवयवावर ठेवतात. या दगडांमधली उष्णता शरीरात शोषली गेल्याने रक्तवाहिन्या मोकळ्या होतात. रक्तप्रवाह वाढल्याने शारीरिक वेदना कमी होतात. या माध्यमातून केल्या जाणाऱ्या मसाजमुळे तुमचं शरीर आरामदायी स्थितीत जातं.

ही थेरपी करून घेण्याआधी आणि नंतर हलका आहार घ्यावा. खूप जड अन्न खाणं टाळावं. हॉट स्टोन थेरपीमुळे शरीरातल्या पाण्याची पातळी कमी होते. त्यामुळे भरपूर पाणी प्यायला हवं. उच्च रक्तदाबाचा त्रास असलेल्यांनी हॉट स्टोन थेरपी घेणं टाळावं.

### पंचांग

**शनिवार, ११ एप्रिल २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८
चैत्र कृ. ९ **(म. फुले जयंती)**,
चंद्रराशी : मकर,
नक्षत्र : उत्तराषाढा, योग : सिद्ध,
सूर्योदय ६.२७, सूर्यास्त ६.५३

### फॉरवर्ड्स

**आँखों में रहा दिल में उतर क़र नहीं देख़ा...**

**कश्ती क़े मुसाफ़िर नें समंदर नहीं देख़ा...!**

### भटकंती

ताम्हिणी घाट निसर्गप्रेमींसाठी पर्वणी ठरतो. या परिसरात बघण्यासारखं खूप काही आहे. तळी, घनदाट झाडी आणि धबधबे हे दृश्य मनोहारी दिसतं. मुळशी धरण पाहिल्याशिवाय इथला प्रवास पूर्णच होत नाही. इथे तुम्ही रिव्हर राफ्टिंगचा आनंद लुटू शकता. इथून जवळच कोलाड नावाचं ठिकाण आहे. कुंडलिक नदीवर बांधण्यात आलेल्या पुलावरून इथे जाता येतं. वंजाई देवीचं मंदिरही पर्यटकांना आकर्षित करतं. इथे आल्यावर सिंहगडाला भेट द्यायला विसरू नका. ताम्हिणी घाटाच्या बाईक टूर्सही असतात. इंटरनेटवर याची माहिती मिळू शकेल.

करिअरवाटा

## कल्पक वाट इव्हेंट मॅनेजमेंटची

आजकाल कोणत्याही समारंभाचं यश नेटकं नियोजन, मनमोहक सजावट आणि उत्तम पदार्थ यावर अवलंबून असतं. या सगळ्या एकत्रित कामालाच इव्हेंट मॅनेजमेंट म्हणतात. सध्या वाढत्या कॉर्पोरेट ट्रेंडमध्ये इव्हेंट मॅनेजमेंट क्षेत्राला चांगले दिवस आले आहेत. विशेष म्हणजे यात



प्रशिक्षित मनुष्यबळाची चणचण जाणवते. त्यादृष्टीने धडपड्या आणि उत्तम व्यवस्थापन कौशल्य असलेल्या तरुणांनी या क्षेत्रात आवर्जुन शिरलं पाहिजे. आपण टीव्हीवर अनेक शोज बघतो. त्यांच्या स्टेजवरचा झगमगाट, प्रकाश योजना, मांडणी आणि ट्रिक्स हे सारं पाहिलं म्हणजे नवल वाटतं. पण यासाठी अनेक कलाकार अनेक दिवस झटतात आणि कंपनीही त्यावर लाखो रुपये खर्च करते. आताच्या काळात एकेका इव्हेंटवर करोडो रुपये खर्चले जात आहेत. याचा फायदा इव्हेन्ट मॅनेजमेंटच्या व्यवसायात शिरणाऱ्या तरुणांना होऊ शकतो. विवाहाच्या आयोजनाचंही मॅनेजमेंट केलं जातं आणि निरनिराळ्या स्वरूपात केलं जातं. या पार्श्वभूमीवर सध्या केवळ इव्हेन्ट मॅनेजमेंटचे प्रशिक्षण देणाऱ्या काही मोजक्याच संस्था आहेत. मात्र एमबीए चं शिक्षण देणाऱ्या काही संस्थां या विषयाचं शिक्षण देत आहेत. इच्छुकांना कोणत्याही व्यवस्थापन शास्त्र संस्थांकडे चौकशी करता येत नाही.

खेचाखेची

## पायावर धोंडा

सकाळी बायकोला एप्रिल फूल करावं म्हणून बळेच बोललो, 'अगं... आज कामवाली येणार नाही.'

... आणि खरंच ती आली नाही राव.

.

.

.

आता माझी नार्को टेस्ट सुरु आहे... मला कसं कळलं म्हणून!

वेगळं काही

फ्रान्सिस्को डोमिंगो या माणसाच्या तोंडात ३३० मिलीलीटरचा कोल्डड्रिंकचा कॅन अगदी सहज मावतो. त्याला 'कनेक्टिव्ह टिश्यू डिसऑर्डर' आहे. २०१० मध्ये २० वर्षांचा असताना त्याने रोममधल्या 'बिग माउथ' स्पर्धेत सहभाग नोंदवला. स्पर्धकांना तोंडात बिअरच्या बाटल्या, कॉफीचे कप, बशी असं बरंच काही ठेवायचं होतं. पण फ्रान्सिस्कोला कोणीतही मात देऊ शकलं नाही. त्याने ३३० मिलीलीटरचा कोल्डड्रिंकचा कॅनच तोंडात ठेवला. त्याला इटालियन टीव्हीवरही आमंत्रित करण्यात आलं होतं. अंगोलातल्या शहरांमधल्या रस्त्यांवरही तो आपलं कौशल्य दाखवत असतो. त्यामुळे देशभरात त्याला खूप लोकप्रियता मिळाली आहे.

ॲक्सेसरीज

## निवड पादत्राणांची

उन्हाळ्यात उन्हाच्या प्रखरतेमुळे केवळ हात, चेहरा, केस यांच्याशी संबंधित समस्या उद्भवतात असं नाही. या ऋतूतील चिकचिकाटामुळे पायाच्या त्वचेलाही अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. त्यामुळे उन्हाळ्यात पादत्राणांची निवड करताना काळजी घ्यावी. या संदर्भातील काही महत्त्वाच्या टीप्स...



* फ्लिप फ्लॉप स्लिपर - उन्हाळ्यात फ्लिप फ्लॉप स्लिपर अत्यंत आरामदायी असतात. पायांना घाम येत असेल तर या उपयुक्त ठरतात. यात पाय कोरडे राहण्यास मदत होते.

* ॲथलेटिक सँडल - ॲथलिट सँडल्स उत्तम ठरतात. यामुळे पावलांमध्ये हवा खेळती राहून घामाचा त्रास होत नाही.

* एस्पाड्रिल्स - बाजारातील लोकप्रिय प्रकार म्हणजे एस्पाड्रिल्स. या पादत्राणांमध्ये आराम आणि स्टाईल या दोहोंचा संगम पहायला मिळतो.

* डेनिम स्लाईड्स - उन्हाळ्यात वॉर्डरोबमध्ये डेनिम असतं तसंच ते शू रॅकमध्येही असावं. कडक उन्हाळ्यात डेनिमची आरामदायी पादत्राणं पसंतीस उतरतात.

* स्लाईड्स - स्टायलिश आणि आराम या दोहोंचा संगम हवा तर स्लाईड्स हा सर्वोत्तम पर्याय आहे. तरुणींमध्ये या स्टाईलची क्रेझ दिसून येते.

## सुडोकू ९०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३ | | | | | | | |
| | | ६ | | ८ | | | ४ | |
| ५ | | | | ९ | | ७ | | ६ |
| २ | | ७ | ६ | ३ | | | ९ | |
| | ५ | | ७ | | ४ | | ६ | |
| | ४ | | | १ | ९ | ३ | | ७ |
| ३ | | १ | | ७ | | | | ४ |
| | ६ | | | ५ | | २ | | |
| | | | | | | | १ | ९ |

**टीप -**
* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ८९चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ३ | ७ | ९ | ५ | ८ | ४ | १ | २ |
| ५ | १ | ८ | २ | ६ | ४ | ७ | ९ | ३ |
| २ | ४ | ९ | १ | ७ | ३ | ५ | ८ | ६ |
| ३ | ६ | ४ | ५ | ९ | ७ | १ | २ | ८ |
| ८ | ७ | २ | ६ | ४ | १ | ३ | ५ | ९ |
| ९ | ५ | १ | ८ | ३ | २ | ६ | ७ | ४ |
| १ | २ | ५ | ३ | ८ | ६ | ९ | ४ | ७ |
| ४ | ८ | ६ | ७ | १ | ९ | २ | ३ | ५ |
| ७ | ९ | ३ | ४ | २ | ५ | ८ | ६ | १ |

## शब्दकोडे क्रमांक ९०

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | | ४ | ५ | | ■ | ६ | ■ | ७ | ■ | ८ | ९ |
| | ■ | १० | | ■ | ११ | | ■ | १२ | | | | १३ | ■ | |
| १४ | १५ | ■ | १६ | १७ | ■ | १८ | | | | ■ | १९ | | २० | |
| २१ | | | ■ | २२ | २३ | | ■ | | ■ | २४ | ■ | २५ | | ■ |
| ■ | | ■ | २६ | | | ■ | २७ | | २८ | | २९ | | ■ | ३० |
| ३१ | | ३२ | | ■ | ■ | ३३ | | | | ■ | | ■ | ३४ | |
| | ■ | ३५ | | ३६ | | | ■ | | ■ | ३७ | | ३८ | | |
| ३९ | ४० | ■ | ४१ | | ■ | ४२ | ४३ | | ■ | | ■ | | ■ | |
| ■ | ४४ | ४५ | | ■ | ४६ | | | ■ | ■ | ४७ | ४८ | ■ | ४९ | |
| ५० | | | ■ | ५१ | | ■ | ५२ | ५३ | ५४ | | | ■ | ५५ | |
| | ■ | ५६ | | | | | ■ | ५७ | | ■ | ■ | ५८ | | ■ |
| ५९ | | | ■ | | ■ | ■ | ६० | | | ६१ | ■ | ६२ | | ६३ |
| | ■ | ६४ | ६५ | | ■ | ६६ | | | ■ | ६७ | | | ■ | |
| ६८ | ६९ | ■ | | ■ | ७० | | | ■ | ७१ | | ■ | ■ | ७२ | |
| ■ | ७३ | | | ■ | ७४ | | ■ | ७५ | | | | ■ | ७६ | |

**आडवे शब्द :-**
१) संध्यासमय
८) व्यवस्थित
१०) व्यय
११) मस्ती, जोम
१२) निराकार
१४) खरेदी
१६) महागच्या विरुद्ध
१८) छोटे वादळ
१९) निरुत्साह, मनाला आलेला थकवा
२१) माया, प्रेम
२२) मुख, चेहरा
२५) माराची शरीरावर उमटलेली खूण
२६) माकडातील एक प्रकार
२७) किरकोळ सामान
३१) आकाराणे फार मोठा असलेला साप
३३) आंबट गोड चवीचे एक काटेरी फळ
३४) वर्ष, साल
३५) प्रज्वलित, पूर्ण तापलेले
३७) पालखी, मेणा
३९) पृथ्वी
४१) पैसा, किंमत
४२) जमिनीचे मोजमाप करण्याचे एक माप
४४) वार्ता
४६) डोक्यात होणारा फोड
४७) शूर
४९) गाढव
५०) मीठाची चव
५१) एकत्र कालविलेला पदार्थ
५२) वेळ घालविणे
५५) उत्सव
५६) पत्त्यातील एक लोकप्रिय खेळ
५७) शिक्षा
५८) बोटाच्या टोकावरील आवरण
५९) दुष्ट, कारस्थानी
६०) पाखरांचा मंजूळ आवाज
६२)नमूना
६४) बिनावासाचे पांढरे फूल
६६) अंधार
६७) कमळ
६८) धमनी
७०) मुंग्यांचे घर
७१) जादू, भ्रम
७२) चामखीळ
७३) पोते शिवण्याची सुई
७४)वाळवंट
७५) मध्यम प्रमाण
७६) अभिनेता

**उभे शब्द :-**
१) रोजचा कार्यक्रम
२) लक्ष, एक आकडा
३) श्रेष्ठपणा, प्रामुख्य
४) भेग, फट
५) गतिमान
६) प्रभात
७) आरोप
९) टवाळक्या करणारा
१२) पौराणिक कहाण्यांतील गाव
१३) श्रेष्ठपुरुष
१५) कालपुरुष
१७) स्तोत्र
२०) मासा पकडण्याचे एक साधन
२३) प्रत्येक, मूल्य
२४) स्वच्छ
२६) उत्तराधिकारी
२७) सूर्य (इं.)
२८) द्रवपदार्थ
२९) घोड्याची लाथ, डोक्याभोवती गुंडाळण्याचे फडके
३०) जन्म मृत्यू
३१) फुलातील सुगंधी द्रव
३२) फळातील खाद्य भाग
३३) या साठी
३४) च्या बरोबर
३६) दारूचा एक प्रकार
३७) शूर पुरुष
३८) डावा
४०) शर्करा
४३) अतिशयपणा, झपाटा
४५) मोठे डोळे
४६) संपणे
४८) वाळवंट
४९) अफूचे बीज
५०) मुद्दामहून विशेषेकरून
५१) गडी, शारीरिक श्रम करणारा
५३) हावरटपणा
५४) सहस्त्र
५८) मुसलमानांची प्रार्थना पद्धती
६०) चिखलात उमलणारे फूल
६१) तृप्त न होणारी भूक
६३) राक्षशीण, डाकीण
६५) तारण ठेवलेली वस्तू
६६) युवक, जवान
६९) सदोदित, नेहमी
७०) दिवस, घाव
७१) भडीमार, वर्षाव
७२) अंत:करण

**(उत्तर उद्याच्या अंकात)**


## मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| च | म | क | ■ | प | स | र | ट | ■ | क | प्पा | ■ | सु | का | ■ |
| व | न | वा | सी | ■ | व | ■ | प | सा | रा | ■ | व | जा | वा | ट |
| दा | न | ■ | ता | त | डी | ने | ■ | ज | ल | त | र | ण | ■ | ण |
| र | ■ | स | ह | ■ | ने | म | स्त | ■ | ■ | र | ण | ■ | पो | क |
| ■ | आ | व | र | णे | ■ | बा | व | न | क | स | ■ | पा | ट | ■ |
| ना | र | ■ | ण | ■ | व्या | ज | ■ | र | वि | ■ | प | ट | ■ | व |
| ना | ■ | भु | ■ | कां | ■ | ■ | स | म | ता | ■ | सा | व | का | री |
| वि | ■ | ई | सा | ■ | ख | र्च | ■ | णे | ■ | का | र | ■ | प | ■ |
| ध | न | को | ■ | ज | ड | ■ | पा | ■ | पा | ल | ■ | स | ड | का |
| ■ | वा | ट | प | ■ | त | न | य | ■ | र | व | र | व | ■ | का |
| त | ग | ■ | स | म | र | स | ■ | स | खा | ■ | वा | ड | गा | ■ |
| रा | त | सा | र | ■ | ■ | ता | र | का | ■ | प | ■ | ■ | व | सा |
| त | ■ | प | ट | क | न | ■ | म | ळ | क | ट | ■ | प | रा | ग |
| रा | ज | ■ | ■ | सा | र | व | ण | ■ | ■ | प | र | ■ | न | वा |
| ■ | म | त | ल | ई | ■ | न्य | ■ | ट | व | ट | वी | त | ■ | न |

# कलासक्त

**पुण्याच्या चौका चौकांतून ज्यांच्या गाण्याचे कार्यक्रम सार्वजनिक गणेशोत्सवाच्या काळात होत असत ते गजानन वाटवे पुण्यात सर्वात प्रथम रहायला आले. बेळगांव येथे जन्मलेले गजानन वाटवे यांच्या वडिलांचा भिक्षुकीचा व्यवसाय होता. लहानपणापासूनच छोट्या गजानन ला गायनाची आवड होती. गाण्याच्या आवडीमुळेचे ते बेळगाव सोडून पुण्यात आले. विनायकराव पटवर्धन यांनी गजानन रावांची सोय गोपाल गायन समाजात केली. गजानन रावांनी शाळा कॉलेजात असतानाच अर्थार्जनासाठी गायनाचे धडे सुरु केले.**

## सुरसम्राट गजानन वाटवे



श्रीराम शेटये

आणि श्रीगणेश झाला तेव्हा पासून परत कधी मागे वळून पाहिले नाही. उत्तरोत्तर प्रगती होत गेली आणि 'एकगळ्यातूनगाणारागायक' अशी ज्यांची ओळख होती. 'गर्जा जयजयकार' 'नवलाख तळपती दीप', 'नका गडे पुन्हा पुन्हा माझ्याकडे पाहू', 'लाजरीच्या रोपट्याला दृष्ट नका लावू', 'तू असतीस तर झाले असते', 'दोन ध्रुवांवर दोघे आपण', 'राधे तुझा सैल अंबाडा'ही त्यांनी गायलेली गीतं खूप प्रसिद्ध आहेत. त्यासोबतच 'अजुनि लागलेची दार', 'आभाळीचा चांद माझ्या आज', 'उठ राजसा घननीळा', 'कुणी कोडे माझे उकलील का ', 'गगनी उगवला सायंतारा', 'गाऊ त्यांना आरती ', 'या धूंद चांदण्यात तू संगती ', आणि 'यमुनाकाठी ताजमहाल' ही गाणीही खूप प्रसिद्ध आहेत असे गायक गजाननराव वाटवे यांचा २ एप्रिल (२००९) स्मृतिदिवस.

संगीताची आवड आणि साहित्याचे वाचन या शिदोरीवर त्यांनी त्या काळात नव्याने लोकप्रिय होत असलेल्या भावगीताच्या प्रांतात ऐन तारुण्यात प्रवेश केला आणि पहिल्याच सलामीत ते शतकवीर ठरले. ''वारा फोफावला'' ही त्यांनी वयाच्या विसाव्या वर्षी म्हणजे १९३७ साली दिलेली ध्वनिमुद्रिका एवढी गाजली की त्यानंतर त्यांना परत मागे वळून पाहायची गरज वाटली नाही. नाट्यसंगीताच्या पाठोपाठ काव्यगायन या प्रकाराला खऱ्या अर्थाने लोकप्रिय व समृध्द केले ते गजानन वाटवे यांनी संगीत तसंच गायकी क्षेत्रासाठी दिलेल्या भरीव योगदानासाठी गजानान वाटवे यांना ''लता मंगेशकर पुरस्कार'', ''गदिमा प्रतिष्ठानचा पुरस्कार'', ''युगप्रवर्तक पुरस्कार'', ''सुशीलस्नेह पुरस्कारा''ने गौरवण्यात आले होते. वाटवेंच्या संगीत प्रवासावर आधारीत त्यांची मुलगी मंजिरी चुणेकर यांनी ''गगनी उगवला सायंतारा'' हे चरित्र लिहीले आणि उतारवयातही संगीताने वाटव्यांना कायम ताजेतवाने ठेवले. त्यामुळेच रमण रणदिवे, संगीता बर्वे यांच्यासारख्या नव्या पिढीतल्या कवींच्या कवितांना ते सहजपणे सामोरे गेले.

गजानन वाटवेंनी संगीतब केलेली ''मोहुनिया तुजसंगे'', ''चंद्रावरती दोन गुलाब'', ''दुभंगुनी जाता जाता मी अभंग झालो'', ''फांद्यावरी बांधिले गं'',''मैत्रिणींनो सांगू नका नाव घ्यायला'', ''गगनी उगवला सायंतारा'',''चल चल चंद्रा पसर चांदणे'',''घर दिव्यात तरी'', ''यमुनाकाठी ताजमहाल'',''मी निरंजनातील वात'',''रानात सांग कानात आपुले नाते'' ही भावगीत आजही रसिकांच्या स्मरणात आहेत. तर त्यांच्या आवाजातील ''गर्जा जयजयकार'', ''नवलाख तळपती दीप'', '' नका गडे पुन्हा पुन्हा माझ्याकडे पाहू'',''लाजरीच्या रोपट्याला दृष्ट नका लावू'', ''तू असतीस तर झाले असते'', ''दोन ध्रुवांवर दोघे आपण'', ''राधे तुझा सैल अंबाडा'' ही त्यांनी गीतं सुध्दा खूपच प्रसिद्ध आहेत.

गजाननरावांनी केशवसुत, गिरीश, माधव जुलियन, यशवंत, कुसुमाग्रज, सुरेश भट, गदिमा, राजा बढे, मंगेश पाडगावकर, शांता शेळके, श्रीनिवास खारकर आदी प्रतिभावंतांच्या दर्जेदार भावकविता अत्यंत सुरेल चालीत बांधल्या आणि त्या रसिकांसमोर पेश केल्या. हे त्यांनी केलेले काव्यगायनाचे कार्यक्रम खूप गाजले. या कार्यक्रमांमध्ये ते विविध प्रकारची गीते सादर करत असत. राष्ट्रप्रेमाची गीते, मातृप्रेमाची गीते, प्रेम गीते, पाऊस गीते, विडंबन गीते असे विविध प्रकार या कार्यक्रमात असल्याने सर्व प्रकारच्या रसिकांना हे कार्यक्रम आवडू लागले.

गजाननरावांनी जवळपास २००० पेक्षाही अधिक गीते स्वरबद्ध केली, त्यापैकी त्यांनी संगीतबद्ध केलेल्या व गायलेल्या गीतांमध्ये रामाला गं चंद्र हवा (१९५४), हीच राघवा हीच पैजणे (१९५४), मंदिरात आलो तुझ्या दर्शनाला (१९८६), झुंजू मुंजू झालं (१९९३), निरांजन पडले तबकात (१९९९), दोन ध्रुवावर दोघे आपण(१९९९), चंद्रावरती दोन गुलाब (१९९९), घट तिचा रिकामा (२००४), प्रीत तुझी माझी (२००६), नयन खेळले जुगार (२०१०), परीसा हो तुलसी रामायण (२०१४) ही गीते विशेष गाजली. तसेच त्यांनी संगीतबद्ध केलेल्या गीतांमध्ये गगनी उगवला सायंतारा, कोणता मानू चंद्रमा, कुंभारासारखा गुरू, ती पहा बापूजींची प्राणज्योती, जारे चंद्रा तुडवित जा पवना जा वेगे, चल चल चंद्रा, घर दिव्यात मंद तरी, गेला दर्यापार घरधनी, गावू त्यांना आरती, कधी कुठे न भेटणार, अंतरीची विशाल स्वप्ने, ऐकलात का हट्ट नवा, उठ राजसा घननिळा, आला स्वप्नांचा मधुमास, रघुवीर आज घरी येणार, या धुंद चांदण्यात तू, नाखवा वल्हव वल्हव, तो सलीम राजपुत्र, ते कसे गं ते कसे, परदेशी सजन घरी आले, सुरांनो जावू नका रे ही गीते रसिकप्रिय झाली. दरम्यान प्रभात फिल्म कंपनीशी त्यांचा संबंध आला आणि दहा वाजता या चित्रपटासाठी त्यांनी पार्श्वगायन केले. अनेक गीतांना त्यांनी चालीही दिल्या. वाटवे यांनी संगीतबद्ध केलेल्या कर्णमधुर कविता मालती पांडे, माणिक वर्मा, सुमन कल्याणपूर, ज्योत्स्ना भोळे, कुमुदिनी पेडणेकर या गायिकांनी गायल्या आहेत. गजाननरावांचा विवाह सुषमा यांच्याशी झाला. त्यांना मिलिंद वाटवे आणि मंजिरी वाटवे-चुणेकर ही दोन मुले.

भावगीत गायनातला फडफडता जरिपटका असा ज्यांचा अफाट लौकिक त्या गजाननराव वाटवे यांनी १९७१ साली 'गगनि उगवला सायंतारा' हे आपलं आत्मचरित्र लिहून प्रसिद्ध केलं होतं. आपल्या आयुष्याच्या चोपन्नाव्या वर्षांपर्यंतची रंगीतसंगीत हकिगत, थोडासा हात राखून वाटव्यांनी त्यात सांगितली आहे. अनिल यांची 'गगनि उगवला सायंतारा' ही आर्त कविता वाटव्यांनी १९४१ साली प्रथम आळवली. तेव्हापासून सलग ७० वर्षं त्या गाण्याने लुब्ध रसिकांच्या हृदयावर राज्य केलं, ही गायक वाटव्यांची अपूर्व कमाई आहे. या कहाणीत वाटव्यांनी आपली जन्मतारीख नोंदलेली ..

भवानी शंकर रोडवरील गणेशोत्सवात (१९४९-५०) तुफान भरलेल्या मंडपात दोन गीतानंतर गोंधळ सुरू झाला. दगड येऊ लागले. गजाननरावांसमोर प्रेक्षकात बसलेल्या मुलाच्या डोक्याला खोक पडली. कार्यक्रम थांबवून पोलिस बोलावण्यापर्यंत मजल गेली. पोलिसांनी संपूर्ण मंडपाला गराडा घातला. श्रोते मात्र जागेवरून हलायला तयार नव्हते. कार्यक्रम रद्द करण्याची कल्पना त्यांनी साफ धुडकावून लावली. तासाभरानंतर परिस्थिती नियंत्रणाखाली आल्यावर गजाननरावांनी पेटी ओढली आणि 'ती पहा ती पहा बापूजींची प्राण ज्योती' आळवायला सुरुवात केली. एकाएकी मंडपातलं वातावरण बदललं. सगळा श्रोतृवर्ग स्तब्ध, मंत्रमुग्ध झाला. स्वरांच्या भावदर्शनासहित अश्रूंचे पाट वाहू लागले. गजाननरावांनी गाता गाता सभोवताली पाहिलं. जिथून गलका झाला तिथेच आता माना डोलावल्या जात होत्या. समोरच दगड लागलेला मुलगा डोक्याला पट्टी बांधून गाणं ऐकत होता.

गजाननरावांच्या स्वरातलं भावदर्शन ही त्याकाळच्या तरुण पिढीची गरज होती. स्वातंत्र्यपूर्व काळापासून थेट साठच्या दशकातील सुरुवातीपर्यंत गजाननरावांच्या भावगीतांनी मराठी मनावर अधिराज्य गाजवलं. गांधी हत्येनंतर महंमद रफीचं 'सुनो सुनो ए दुनियावालों बापू की अमर कहानी' ऐकून गजाननरावांनी कवी मनमोहन यांना गांधीजींच्या जीवनावर कविता लिहिण्याची विनंती केली. मनमोहन यांनी गजाननरावांच्या सदाशिव पेठेतल्या घरातच मांडी ठोकली आणि केवळ १५ मिनिटांत 'बापूजींची प्राणज्योती'सारखं अप्रतिम काव्य लिहून दिलं. तुफान लोकप्रियता हे 'गजानन वाटवे' या नावासरशी जणू घट्ट चिकटलं होतं.

अवघ्या १५ रुपये मानधनापासून प्रारंभ करून पाच हजार रुपयांच्या मानधनापर्यंतचा पल्ला त्यांनी गाठला. दीनानाथ पुरस्कार, शासनाचा लता मंगेशकर पुरस्कार, हृदयेश आर्टस् पुरस्कार, गदिमा पुरस्कार, अशा नामांकित पुरस्कारांनी वाटवे गौरविले गेले. कलावंताच्या जिंदगीतला ऐष त्यांनी भोगला. लौकिकाची गुढी मिरवीत नव्वदी ओलांडली. नंतर मात्र नियतीने त्यांना इंगा दाखवला. जादूगार वाटवे पूर्ण आंधळे झाले. वृद्ध वाटवे मुलाबाळांसह पुण्यातल्या कर्वेनगरातल्या 'गिरिजा शंकर विहार' सोसायटीत अखेरपर्यंत रहात होते. २ एप्रिल २००९ या दिवशी म्हणजेच वयाच्या ९२व्या वर्षी वृध्दापकाळाने पुणे येथील रहात्या घरी गजानान वाटवे यांचे निधन झाले.

त्यांनी लिहिलेले आत्मचरित्र 'गगनि उगवला सायंतारा' यातील वर उल्लेखलेली हकीकत त्यांच्या आत्मकथनातून साभार खाली देत आहे.

अंगात सदरा, खादीचा पायजमा आणि डोक्यावर गांधी टोपी. हातात कापडी पिशवी, पिशवीत सदरा-पायजमा जोडी, पांघरूण,फूलपात्र. बस्स! एवढंच. १३-१४ वर्षाचा मुलगा सुरांच्या ओढीने घरातून बाहेर पडला. वडिलांच्या करड्या नजरेतून निसटला. गाणं शिकण्याचं वेड पराकोटीला पोहोचलं होतं. बेळगावातील मातकट रस्त्यातून चालत स्टेशन गाठेपर्यंत त्याला फक्त वडिलांचे संतापलेले दोन डोळे दिसत होते. मोठ्या भावाची, दादाची काळी-निळी पडलेली पाठ डोळ्यांसमोर येत होती. संध्याकाळी रामरक्षा म्हटली नाही म्हणून वडिलांनी हातातल्या वेताच्या काठीने दादाला बडव बडव बडवला होता. स्टेशनवरील गर्दीत त्याची कावरीबावरी नजर पुण्याकडील आगगाडीतला तिसऱ्या वर्गाचा डबा शोधू लागली. डब्यातल्या खिडकीपाशी तो अंग चोरून बसला. असंख्य प्रश्न त्याच्या मनाला डाचत होते. इथून पुढे काहीच झालं नाही तर? पुण्यासारख्या गावात गाणं शिकवणारा कुणी गुरू भेटलाच नाही तर? पुण्यात राहण्याची सोय झालीच नाही तर? आणि जेवणा-खाण्याचं काय? ज्या हेतूने घर सोडलं तो हेतू साध्य होईल याची खात्री कोण देणार? कदाचित आयुष्य असं वाऱ्यासारखं उधळूनही जाईल. कुणी सांगावं?

आगगाडी पुण्याच्या दिशेने भरधाव निघाली होती. त्याबरोबरच निघाला गजानन जीवन वाटवे. पुण्यात राहून संगीत साधना करायची हे गजाननच्या जीवनातलं सर्वात मोठं ध्येय होतं. पुण्यातली गर्दी लहानग्या जीवाला भंडावून सोडत होती. टांगे ज्या रस्त्याने येत-जात होते, त्याच रस्त्याने तो निघाला. बेळगावच्या तुलनेत पुणं किती तरी मोठं. दिपलेल्या डोळ्यांनी तो पुणे नगरी न्याहाळत होता. सिनेमाचं थिएटर दिसताच क्षणभर थबकला होता. कुठल्या तरी हॉटेलात चहा-पाव खात होता. तेवढा एक आणा त्याच्या खिशात होता. संध्याकाळ झाली. विश्रांतीसाठी एका पायरीवर बसला. मागे वळून पाहिलं तर ते गणपतीचं मंदिर होतं. दिवसभराच्या भटकंतीनंतर हाती काहीच लागलं नव्हतं. पराभूत मनाने घरी परतायचं हा एक मार्ग असला तरी परतीच्या तिकिटाचे पैसे कुठून आणायचे हा प्रश्न होताच.

संपूर्ण रात्र पायरीवर बसून काढली. पहाटे डोळा लागला. सकाळी झोप मोडली तेव्हा चाळीशीचा माणूस त्याची प्रेमाने विचारपूस करू पाहत होता.

''आम्ही मिरजेचे, आम्हाला किल्ल्यातले वाटवे म्हणून ओळखतात.'' गजानन म्हणाला.

चाळीशीतला माणूस आनंदला. तो गजाननच्या वडिलांना ओळखत होता. गोडबोलेंच्या वाड्यात गजानन राहू लागला. त्याला आश्रय देणारा चाळीशीतला नारायणराव जोशी प्रत्येक दिवशी अत्यंत समजूतीच्या स्वरात बेळगावला परतण्याची त्याची मानसिक तयारी करू लागला. पंडित विनायकबुवा पटवर्धन यांनी गाणं शिकवण्याची तयारी दर्शवली. परंतु त्यांच्या गांधर्व महाविद्यालयात राहण्या-खाण्याची व्यवस्था होण्यासारखी नव्हती.

दिवसभर गजानन हुंदडला. शेवटचं डोळे भरून पुणं पाहून घेण्याच्या उद्देशाने. त्याने थोरल्या बाजीरावाचा शनिवारवाडा पाहिला. तुळशीबागेतला राम पाहिला. पर्वती पाहिली. पर्वतीहून परत येताना बेळगावचे सोहोनी भटले. सोहोनींच्या 'महाराष्ट्र मेळ्या'चं बेळगावात मोठं प्रस्थ होतं. सोहोनींनी आणखी दोन दिवस थांबण्याचा सल्ला दिला. त्याच संध्याकाळी सोहोनींनी गजाननची सोय 'गोपाल गायन समाज'मध्ये केली.

इथून पुढे कष्ट साध्य विद्यार्जन एवढंच नियतीने वाढून ठेवल्याचं दिसत होतं. पहिले आठ दिवस जेवणाची सोय खुन्या मुरलीधर मंदिराजवळच्या 'केशवाश्रम' मध्ये झाली. खानावळीच्या जेवणाने माज येतो. शिक्षणाची आंच उरत नाही. तेव्हा हे तामसी अन्न विद्यार्थ्यांला उपयोगी नाही, असा सल्ला गोपाल गायन समाजाच्या चालकाने दिला. आता जेवणा-खाण्याचा प्रश्न अधिकच गंभीर झाला. बेळगावला घरी दररोज वडिलांबरोबर साजूक तुपातला शिरा खाणारा गजानन, पण 'संगीत विशारद'होण्याची जिद्द इतकी अफाट होती की, त्याने हातात चौपदरी धरली आणि थरथरत्या ओठांनी, डबडबलेल्या स्वरांनी पहिली आरोळी ठोकली- 'ॐ भवती भिक्षांदेही.' वैद्य, दाते, आपटे गजाननला भिक्षा घालू लागले. गायन विद्या हस्तगत करण्याकरिता वाट्टेल तेवढे कष्ट उपसण्याची त्याची तयारी होती. श्री. म. माटेंच्या दारी, जयंतराव टिळकांच्या घरी पंचाने गुंडाळलेला हा कृशदेह एका पंचाची झोळी करून- 'भिक्षांदेही'ला निघाला. माटे मास्तरांच्या दारात कंठ इतका दाटून आला की, 'भिक्षांदेही' हे शब्दच मुखातून बाहेर पडेनात. माटेंच्या पत्नीने अत्यंत मायेने पोळी, त्यावर भाताची मूद, त्यावर वरण अशी सुग्रास भिक्षा आणून थाळीत सोडली. गजानन वाटवे यांच्या जीवनात असे असंख्य प्रसंग परीक्षा घेणार होते. गजानन रावांनी ते पार करून यशोशिखर गाठले. ●●

## लक्षवेधी 'ओ रोमियो'

'ओ रोमिओ' हा मुंबईच्या अंडरवर्ल्डमधील एका थरारक प्रेमकथेवर आधारित चित्रपट ओटीटीवर आला असून प्रेक्षकांमध्ये याची मोठी उत्सुकता आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन प्रख्यात दिग्दर्शक विशाल भारद्वाज यांनी केले असून साजिद नाडियादवाला यांनी याची निर्मिती केली आहे. चित्रपटात शाहिद कपूर (हुसेन उस्तरा) आणि तृप्ती डिमरी (सपना दीदी) मुख्य भूमिकेत आहेत. त्यांच्यासोबत नाना पाटेकर आणि अविनाश तिवारी यांच्याही महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. चित्रपटाचे संगीत स्वतः विशाल भारद्वाज यांनी दिले असून, कथेची गरज ओळखून त्यांनी डार्क आणि मेलोडियस संगीताचा वापर केला आहे. चित्रपटाची कथा हुसेन झैदी यांच्या माफिया माफिया क्वि न्स ऑफ मुंबई या पुस्तकातील एका सत्य घटनेवर आधारित आहे.

१९९० च्या दशकातील मुंबई या चित्रपटामध्ये चितारण्यात आली आहे. याचे काही चित्रीकरण स्पेनमध्ये करण्यात आले आहे. चित्रीकरणादरम्यानचा एक अविस्मरणीय किस्सा म्हणजे, शाहिद कपूरने एका ॲक्शन सीनसाठी वापरलेला वस्तरा. विशाल भारद्वाज यांना हा सीन अत्यंत वास्तववादी हवा होता, त्यासाठी शाहिदने महिनाभर एका प्रोफेशनल न्हाव्याकडून वस्तरा चालवण्याचे प्रशिक्षण घेतले होते. शूटिंगदरम्यान खऱ्या वस्तऱ्याचा वापर करताना संपूर्ण सेटवर प्रचंड तणाव असायचा, मात्र शाहिदने तो सीन एका टेकमध्ये अचूक पूर्ण केला. एका पाठलागाच्या सीनमध्ये शाहिदने बॉडी डबल न वापरता स्वतः बाईक स्टंट केले. गमतीची गोष्ट म्हणजे, ताशी शंभर किमी वेगाने बाईक चालवताना तो इतका वेगवान होता की कॅमेरा युनिटला त्याचा पाठलाग करणे कठीण झाले होते.



## 'सुपर सुब्बू'ची सलामी

सुपर सुब्बू (सीझन १) ही नेटफ्लिक्सवरील एक बहुप्रतिक्षित तमिळ-तेलगू ओरिजिनल सीरिज असून जागतिक स्तरावर प्रदर्शित होत आहे. या सीरिजचे दिग्दर्शन कृष्णा मारिमुथू यांनी केले असून लोकप्रिय अभिनेता कविन यात सुब्बू नावाच्या एका सामान्य तरुणाची भूमिका साकारत आहे, जो अनपेक्षितपणे सुपरहिरो बनतो. याची निर्मिती पॅशन स्टुडिओने केली असून अनिरुद्ध रविचंदर यांनी दिलेले संगीत या सीरिजचा आत्मा आहे. सीरिजचे वैशिष्ट्य म्हणजे यात हॉलिवूड स्तरावरील ॲक्शन आणि अस्सल भारतीय मध्यमवर्गीय कुटुंबातील भावना यांचा सुरेख संगम पाहायला मिळतो.

याचे बहुतांश चित्रीकरण चेन्नईच्या गजबजलेल्या गल्ल्यांमध्ये आणि हाय-टेक स्टुडिओमध्ये करण्यात आले आहे. सुमारे पन्नास कोटींच्या बजेटमध्ये तयार झालेली ही सीरिज व्हीएफएक्सच्या बाबतीतही अत्यंत प्रगत आहे. सुपर सुब्बुज कडून प्रेक्षकांना प्रामुख्याने एका हलक्याफुलक्या आणि निखळ मनोरंजक अनुभवाची अपेक्षा आहे. ही सीरिज मध्यमवर्गीय कुटुंबातील रोजच्या आयुष्यातील गंमत आणि विसंगतीवर आधारित असल्याने प्रत्येक प्रेक्षकाला त्यात स्वतःचे प्रतिबिंब दिसेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे. विशेषतः यातील संवादांची चपखल मांडणी आणि पात्रांच्या सहज अभिनयातून प्रेक्षकांना निखळ हास्य मिळेल, ही मोठी अपेक्षा आहे. तसेच आजच्या धावपळीच्या युगात ताणतणाव विसरून संपूर्ण कुटुंबाला एकत्र बसून पाहता येईल अशी ही कलाकृती असावी, असे चाहत्यांना वाटते. या सीरिजमधील पात्रांची गुंफण आणि त्यातून मिळणारा एखादा सकारात्मक संदेश प्रेक्षकांना अधिक भावेल. या सिरीजच्या चित्रीकरणादरम्यानचा एक अविस्मरणीय किस्सा म्हणजे, एका ॲक्शन सीनसाठी कविनला चेन्नईच्या एका उंच इमारतीवरून उडी मारायची होती. मात्र तांत्रिक बिघाडामुळे सेफ्टी वायर काही सेकंदांसाठी अडकली. त्यामुळे संपूर्ण टीम घाबरली. मात्र, कविनने शांत राहून तो सीन यशस्वीरित्या पूर्ण केला. त्याच्या या जिद्दीमुळे सेटवर सर्वांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्याचे कौतुक केले. ही सीरिज भारतीय सुपरहिरो शैलीला एक नवी दिशा देईल, अशी चिन्हे आहेत.




## तांत्रिक भव्यता, थ्रीलरप्रेमींची पसंती

'टर्न्स ऑफ द टाइड सीझन ३' ही नेटफ्लिक्सवरील अत्यंत गाजलेली पोर्तुगीज थ्रिलर सीरिज तिसऱ्या सीझनसह परतत आहे. या सीरिजचे दिग्दर्शन ऑगस्टो फ्रागा यांनी केले असून, याची निर्मिती पॅनोरामा फिल्म्सने केली आहे. मुख्य भूमिकेत जोस कोंडेसा, हेलेना कॅल्डेरा आणि रॉड्रिगो टोमस या कलाकारांनी आपल्या अभिनयाची छाप पाडली आहे. या सीझनसाठी प्रगत साऊंड डिझाइन आणि अंगावर शहारे आणणारे पार्श्वसंगीत वापरण्यात आले आहे. या सीरिजचे बजेट युरोपियन डिजिटल मानकांनुसार भव्य असून अझोरेस बेटांवरील चित्रीकरण दिलखेचक आहे. समुद्राच्या लाटांमधील थरार आणि कोकेन तस्करीची वास्तववादी मांडणी हे या सीरिजचे यश आहे. टर्न्स ऑफ टाईड ही सीरिज सध्याच्या डिजिटल युगातील प्रेक्षकांसाठी एक विशेष आकर्षण ठरते. या सीरिजकडून प्रेक्षकांना प्रामुख्याने एका उत्कंठावर्धक आणि दर्जेदार सस्पेन्स-थ्रिलर अनुभवाची अपेक्षा आहे. कथेची पार्श्वभूमी समुद्र आणि त्याशी निगडित गूढ रहस्यांवर आधारित असल्याने प्रेक्षकांना यात काही तरी नवीन आणि थरारक पहायला मिळेल, अशी आशा आहे. तांत्रिकदृष्ट्या या सीरिजचे चित्रीकरण आणि पार्श्वसंगीत जागतिक दर्जाचे असावे, जे कथेतील गूढ अधिक गडद करेल, अशी चाहत्यांची अपेक्षा आहे. तसेच, यातील कलाकारांचा अभिनय आणि मांडणी ही आजच्या काळातील ओटीटी प्रेक्षकांच्या आवडीनिवडीनुसार असावी. विशेषतः कथानकातील अनपेक्षित वळणे आणि प्रत्येक भागाचा शेवट प्रेक्षकांना खिळवून ठेवणारा असेल, अशी मोठी अपेक्षा सिनेप्रेमी व्यक्त करत आहेत. थोडक्यात, ही सीरिज प्रादेशिक आशयाला जागतिक स्तरावर नेणारा एक भक्कम प्रयत्न असावा, असे प्रेक्षकांना वाटते. या सिरीजच्या चित्रीकरणादरम्यानचा एक अविस्मरणीय किस्सा म्हणजे क्लायमॅक्सचे चित्रीकरण सुरु असताना अटलांटिक महासागरात अचानक मोठे वादळ आले होते.



## 'शंकर-जयकिशन'चा गाजावाजा

मराठी रंगभूमीवर सध्या कमालीची उत्सुकता निर्माण करणारे शंकर जयकिशन हे नाटक विराजस कुलकर्णी यांनी लिहिले असून याचे दिग्दर्शन सुरज पारसनीस यांनी केले आहे. या नाटकाद्वारे प्रेक्षकांना रंगमंचावर पहिल्यांदाच भरत जाधव आणि महेश मांजरेकर या दोन महामेरुंची जुगलबंदी अनुभवायला मिळणार आहे. भरत जाधव यांनी यापूर्वी सही रे सही सारख्या नाटकातून इतिहास घडवला आहे, तर महेश मांजरेकर तब्बल २९ वर्षांनंतर अभिनयासाठी रंगभूमीवर परतले आहेत. त्यांच्यासोबत शिवानी रांगोळे यात महत्त्वाची भूमिका साकारत आहे. हे नाटक महादेव आणि त्याची मुलगी ईशा यांच्यातील नातेसंबंध आणि त्यांच्या आयुष्यात अचानक प्रवेश करणाऱ्या श्यामसुंदर नावाच्या एका अनाकलनीय व्यक्तीवर आधारित आहे. या नाटकाच्या तालमीचा एक रंजक किस्सा म्हणजे, मांजरेकर यांच्या व्यस्त वेळापत्रकामुळे या नाटकाची तालीम चक्क हैदराबादमध्ये पार पडली. विशेष म्हणजे साऊथचा सुपरस्टार फहाद फासील याने तालमीच्या ठिकाणी अचानक भेट देऊन मराठी कलाकारांचे कौतुक केले होते. दोन दिग्गज कलाकार एकत्र असल्यामुळे सेटवर सतत हास्यविनोद आणि एकमेकांच्या जुन्या आठवणींना उजाळा मिळत असे. त्यामुळे नाटकाची तालीम अधिकच रंगतदार झाली.



# बालांगण


## महत्त्वाचं खनिज बॉक्साइट



स्मार्ट टेक

अॅल्युमिनियम मिळवण्यासाठी बॉक्साइट नावाचे खनिज वापरले जाते. बॉक्साइटचा रंग साधारण लालसर, तपकिरी किंवा पिवळसर असतो. हा धातू दगडासारखा दिसतो. पण त्याची रचना मात्र थोडी मऊ आणि मातीसारखी असते. बॉक्साइट जमिनीच्या वरच्या थरांमध्ये तयार होते. उष्ण आणि पावसाळी हवामान असलेल्या भागांत खडक हळ–हळू झिजत जातात आणि त्यातून काही घटक धुऊन निघून जातात. त्यानंतर उरलेल्या घटकांपासून बॉक्साइट तयार होते. त्यामुळे बॉक्साइट बहुतेक वेळा डोंगराळ किंवा पठारी प्रदेशात आढळतो. खाणीतून बॉक्साइटचे मोठे मोठे खडकासारखे तुकडे काढले जातात. हे तुकडे कारखान्यात नेले जातात. तिथे त्यावर प्रक्रिया करून त्यातून अॅल्युमिनियम धातू तयार केला जातो. ही प्रक्रिया काही टप्प्यांमध्ये केली जाते, कारण बॉक्साइटमध्ये इतरही घटक मिसळलेले असतात. काही उद्योगांमध्ये बॉक्साइटचा थेट उपयोगही केला जातो. उष्णता सहन करणाऱ्या विटा तयार करण्यासाठी आणि काही रासायनिक पदार्थ बनवण्यासाठी बॉक्साइट वापरले जाते. अॅल्युमिनियम हलका असल्यामुळे भांडी, डबे, पाण्याच्या बाटल्या, स्वयंपाकघरातील अनेक वस्तू बनवण्यासाठी तो वापरला जातो. तसेच अन्नपदार्थ गुंडाळण्यासाठी वापरली जाणारी पातळ चकाकणारी पत्रीदेखील अॅल्युमिनियमपासूनच तयार केली जाते. मोठ्या उद्योगांमध्येही अॅल्युमिनियमचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. रेल्वेचे काही भाग, मोटारीचे भाग, विमानांचे काही हलके भाग आणि विजेच्या ताराही अॅल्युमिनियमपासून तयार केल्या जातात. कारण हा धातू हलका असूनही मजबूत असतो आणि त्यातून वीजही चांगली वाहते. भारतामध्ये ओडिशा, झारखंड, छत्तीसगड, महाराष्ट्र आणि गुजरात या राज्यांत बॉक्साइट मोठ्या प्रमाणात सापडतो.

## अशा या ग्रंथी




हेल्थ वेल्थ

अनेकांना थायरॉइड ग्रंथींची समस्या असते. टॉन्सिल्सही त्रास देतात. थायरॉइड या ग्रंथी आहेत. थायरॉइडप्रमाणेच शरीरात इतरही बऱ्याच ग्रंथी असतात. त्या वेगवेगळी कार्य करतात. ग्रंथी म्हणजे नेमकं काय हे आपण जाणून घेऊ या.

ग्रंथी हा आपल्या शरीरातला अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. शरीरातल्या विविध ठिकाणी या ग्रंथींचं अस्तित्व असतं. आकाराने लहान असल्या तरी त्या अनेक महत्त्वाच्या घटकांची निर्मिती करतात. लाळ, घाम आणि अश्रू यांची निर्मिती संबंधित ग्रंथीच करतात. काही ग्रंथींमधून हार्मोन्सची निर्मिती होते. शरीराच्या योग्य वाढीसाठी हार्मोन्स गरजेचे असतात. हार्मोन्सच्या असंतुलनामुळे विविध विकार जडू शकतात.

रोगप्रतिकारक क्षमतेमुळे आपण निरोगी राहतो. अनेक विकारांपासून आपला बचाव होतो. या कामातही ग्रंथींचं कार्य महत्त्वाचं मानलं जातं. ग्रंथींमधून स्त्रवणाऱ्या विविध घटकांमुळे रोगांपासून शरीराचं संरक्षण होतं. आजारी पडल्यावर बरं होण्यासाठीही याच ग्रंथी मदत करतात. त्यामुळे त्या निरोगी राहणं गरजेचं असतं.

थायरॉइड ग्रंथी खूप महत्त्वाच्या मानल्या जातात. या ग्रंथी हार्मोन्सची निर्मिती करतात. टी ४ आणि टी ३ अशी या हार्मोन्सची नावं आहेत. शरीरातल्या विविध पेशींचं कार्य सुरळीत सुरू राहण्यासाठी थायरॉइड संप्रेरकांची गरज असते. लहान मुलांच्या वाढीत या हार्मोन्सची महत्त्वाची भूमिका असते. या ग्रंथींचा आकार छोट्या फुलपाखरासारखा असतो. त्या गळ्याच्या खालच्या बाजूला असतात. या ग्रंथींच्या कार्यात अडथळे आल्याने बरेच विकार जडू शकतात. त्यामुळे ग्रंथी निरोगी ठेवणं हे आपलं काम आहे.

## झाडाझुडपांची आवड आहे?



कोण होणार?

बऱ्याच मुलांना काहीतरी वेगळं करायची आवड असते. तुम्हाला विज्ञान, जैवतंत्रज्ञान अशा विषयांमध्ये रस असेल तर 'प्लांट पॅथोलॉजी'चा अभ्यास करता येईल. वृक्ष तसंच रोपट्यांना कीड लागते. त्यांच्यावर अनेक रोग पडतात. या रोगांवर उपचार करण्यासोबतच झाडं निरोगी राहण्यासाठी काय करायला हवं, हे प्लांट पॅथोलॉजिस्ट ठरवतो. या क्षेत्राविषयी...

'प्लांट पॅथोलॉजी'ला 'फिथॉपॅथोलॉजी' असंही म्हटलं जातं. विविध प्रकारचे जीवाणू, विषाणू, घातक वायू, बुरशी तसंच अन्य कीटकांमुळे झाडांना रोग लागतात. अशा रोगांमुळे पिकं नष्ट होतात. अशा परिस्थितीत वनसंपदेला धोका निर्माण होऊ शकतो. पिकांचं नुकसान झाल्याने अन्नधान्याचा तुटवडा निर्माण होऊ शकतो. त्यामुळे प्लांट पॅथोलॉजिस्टचं काम महत्त्वाचं मानलं जातं.

'लांट प्रोटेक्शन सायन्स' ही कृषी अभ्यासक्रमातली एक शाखा आहे. यात झाडांना निरोगी कसं ठेवायचं हे शिकवलं जातं. प्लांट पॅथोलॉजिस्टला बरंच संशोधन करावं लागतं. त्यामुळे वैज्ञानिक दृष्टिकोन आणि धैर्य या दोन्ही गोष्टी अंगी बाणवणं गरजेचं असतं.

'इंडियन अॅग्रीकल्चरल रिसर्च इन्स्टीट्यूट', नवी दिल्ली, 'सेंट्रल इन्स्टीट्यूट ऑफ फिशरीज एज्युकेशन' यांसह देशभरातल्या कृषी संस्थांमध्ये हा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. झाडाझुडपांची आवड आणि मेहनत करण्याची तयारी असेल तर या क्षेत्रात खूप चांगलं नाव कमावता येईल.


## यूरोपियन जलदेवता

गोष्टी नद्यांच्या

ऱ्हाईन ही युरोप खंडातील एक अतिशय महत्त्वाची नदी आहे. तिची लांबी सुमारे १२३० किलोमीटर आहे. ही नदी अनेक देशांतून वाहत असल्यामुळे व्यापार, वाहतूक आणि इतिहासाच्या दृष्टीनेही तिचे मोठे महत्त्व आहे. ऱ्हाईन नदीचा उगम स्वित्झर्लंड या देशातील स्विस आल्प्स या उंच पर्वतरांगांमध्ये होतो. तिथे हिमनद्या आणि बर्फ वितळून नदीचा प्रवाह सुरू होतो. त्यानंतर ही नदी जर्मनी आणि फ्रान्स यांच्या सीमेजवळून वाहते. पुढे ती नेदरलँडमध्ये प्रवेश करते आणि शेवटी उत्तर समुद्राला मिळते. या नदीच्या काठावर अनेक मोठी आणि महत्त्वाची शहरे वसली आहेत. उदाहरणार्थ कलोन, डुसेलडॉर्फ,आणि रॉटरडॅम ही प्रसिद्ध शहरे ऱ्हाईन नदीजवळ आहेत. या शहरांमुळे व्यापार आणि उद्योग मोठ्या प्रमाणावर वाढले आहेत. या नदीत अनेक प्रकारचे गोड्या पाण्यातील मासे आणि इतर जलचर प्राणी आढळतात. यूरोपियन ईल हा लांबट आकाराचा मासा ऱ्हाईन नदीत आढळतो. तसेच अटलांटिक सालमन हा प्रसिद्ध मासाही येथे सापडतो. हा मासा समुद्रातून नदीत येऊन अंडी घालतो. नॉर्दन पाइक आणि कॉमन कार्प हे मासेही या नदीत मोठ्या प्रमाणावर आढळतात. ऱ्हाईन नदीवर अनेक धरणे आणि जलविद्युत प्रकल्प बांधलेले आहेत. इफ्फेझैम आणि ग्रँड कॅनल द'अल्साके हे या नदीवरील महत्त्वाचे प्रकल्प आहेत. या धरणांमुळे वीज निर्मिती, पूर नियंत्रण आणि जलमार्ग व्यवस्थापन यांना मदत होते. ऱ्हाईन नदी युरोपमधील सर्वात व्यस्त जलमार्गांपैकी एक आहे. मोठी मालवाहू जहाजे या नदीतून सतत ये–जा करत असतात. कोळसा, धान्य, यंत्रसामग्री, लोखंड आणि इतर अनेक वस्तू या मार्गाने एका देशातून दुसऱ्या देशात नेल्या जातात. त्यामुळे युरोपमधील व्यापारासाठी ही नदी खूप महत्त्वाची आहे. या नदीचे ऐतिहासिक महत्त्वही फार मोठे आहे. रोमन साम्राज्याच्या काळात ऱ्हाईन नदी एक महत्त्वाची सीमा मानली जात असे. या नदीवर अनेक धरणे आणि जलविद्युत प्रकल्प बांधले आहेत. या प्रकल्पांमुळे वीज निर्मिती आणि पूर नियंत्रणास मदत होते. ऱ्हाईन नदीच्या काठावर सुंदर दऱ्या, डोंगर आणि द्राक्षांच्या बागा दिसतात. त्यामुळे हा भाग पर्यटकांसाठीही खूप आकर्षक मानला जातो. म्हणून ऱ्हाईन नदीचे नाते युरोपच्या इतिहास, व्यापार आणि संस्कृतीशी घट्ट जोडले गेले आहे.



## सगळ्यात मोठा पाण्याचा ढग



नासा आणि कॅलिफोर्निया इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथील शास्त्रज्ञांनी मिळून अंतराळात प्रचंड प्रमाणात पाण्याची वाफ असलेला एक मोठा मेघ शोधला आहे. तो पाण्याचा ढग आकाशात दिसणाऱ्या ढगांसारखा नाही. पण हे पाणी द्रवरूपात नाही. ते खूप गरम आणि विरळ अवस्थेत वाफेच्या स्वरूपात अंतराळात पसरलेले आहे. या पाण्याच्या साठ्याचे प्रमाण इतके मोठे आहे की ते आपल्या पृथ्वीवरील सर्व महासागरांतील पाण्यापेक्षा अनेक पटींनी जास्त आहे. मात्र तापमान खूप जास्त असल्यामुळे ते पिण्यासाठी किंवा वापरण्यासाठी योग्य नाही. हा मेघ पृथ्वीपासून अब्जो प्रकाशवर्ष दूर आहे आणि एका क्वासार म्हणजे खूप तेजस्वी, उर्जायुक्त आकाशीय वस्तूच्या आसपास आढळला आहे. या शोधामुळे पाणी फक्त पृथ्वीवरच नाही, तर विश्वात इतर ठिकाणीही मोठ्या प्रमाणात अस्तित्वात आहे हे शास्त्रज्ञांच्या लक्षात आले आहे.

## गुपित मडक्यातल्या थंड पाण्याचं




नॉलेज अपडेट

आता उन्हाच्या झळा लागायला सुरुवात झाली आहे. अशा वेळी काहीतरी थंडगार खावंसं वाटतं. आपण गार पाणी पितो. गार पाण्यामुळे मस्त वाटतं. फ्रीजमधल्या थंड पाण्यापेक्षा मडक्यातलं पाणी रुचकर लागतं. ते औषधीही असतं. मडकं उन्हात ठेवलं तरी पाणी गार राहतं. हे असं का बरं होत असावं? बाष्पीभवनाच्या प्रक्रियेमुळे मडक्यातलं पाणी थंड राहतं. मडकं मातीप–ासून तयार केलेलं असतं. त्याला सूक्ष्म छिद्रं असतात. या छिद्रांमधूनच पाणी झिरपत असतं. बाष्पीभवनाच्या प्रक्रियेसाठी पाणी उष्णता शोषून घेतं आणि त्याचं रूपांतर वाफेत होतं.

या प्रक्रियेत उर्वरित पाणी थंड होतं. मडक्याच्या आतलं पाणी ही उष्णता सतत शोषून घेत असतं. त्यामुळे बाष्पीभवन होऊन काही तासांमध्ये ते थंड झालेलं पहायला मिळतं. काच किंवा धातूच्या भांड्यांना छिद्रं नसतात. त्यामुळे त्यातलं पाणी थंड होत नाही. बाष्पीभवन ही वातावरण थंड ठेवणारी नैसर्गिक प्रक्रिया आहे. अनेक सजीवही याचा वापर करत असतात. आता कुत्र्याचं उदाहरण घ्या. खूप धावल्यानंतर कुत्रा जीभ बाहेर काढतो. यामुळे त्याच्या लाळेचं बाष्पीभवन होऊन जीभ गार होते आणि त्याला थंडपणाची अनुभूती मिळते.

## आग वेळेत आटोक्यात आणण्यासाठी...



अनेक ठिकाणी आगी लागत असतात. उंच आणि मोठ्ठाल्या इमारतींमध्ये आग लागल्यानंतर सर्वांचीच पंचाईत होते. आगीचे बंब येतात. पण तोपर्यंत बराच वेळ जातो आणि घरांचं नुकसान होतं. अनेकदा शॉर्ट सर्किट हे आगीचं कारण असतं. सोळा वर्षांच्या मुंबईकर शिव कंपानीच्या इमार–तीला अशीच आग लागली. त्याआधी त्याचे आजीआजोबा रहात असलेल्या इमारतीलाही आग लागली होती. या दोन धक्क्यांमुळे शिव चांगलाच हादरला. अशा पद्धतीने लागणाऱ्या आगींची वेळेत सूचना देणारं एखादं उपकरण तयार करावं असं त्याच्या मनात आलं आणि तो कामाला लागला.

शिवने इंटरनेटवर संशोधन केलं। मुंबईसारख्या प्रचंड लोकसंख्येच्या शहरात अशा आगी वरचेवर लागत असल्याची बाब त्याच्या लक्षात आली. अशा आगी वरचेवर तर लागतातच शिवाय सुरुवातीला त्या सौम्य स्वरुपाच्या असतात. या आगींकडे वेळीच लक्ष दिलं तर त्या लवकर आटोक्यात आणता येतात, हेही त्याला समजलं. आता तर आपण काहीतरी करायलाच हवं असा निश्चयच त्याने करून टाकला. मग त्याने लगेच आगीची सूचना देणारं उपकरण तयार करायचं ठरवलं.

काही वर्षं संशोधन केल्यानंतर त्याने स्मार्ट 'गॅस डिटेक्टर' तयार केला. या उपकरणाला 'सेनसेफ' असं नाव देण्यात आलं. हे उपकरण धूर, एलपीजी गॅस तसंच अन्य धोकादायक आणि ज्वलनशील वायूंचं प्रमाण तपासतं आणि लोकांना लागलीच सूचना देतं.

हे उपकरण तयार करण्यासाठी शिवने अगदी झपाटून काम केलं. आपलं उपकरण पूर्णपणे तयार असून त्याचं पेटंट घेण्याचा माझा प्रयत्न असल्याचं शिव सांगतो. पेटंट विभागाने हिरवा कंदिल दाखवला की हे उपकरण उपलब्ध होऊ शकेल. 'सेनसेफ' हाताच्या तळव्याएवढं उपकरण असून घरात कुठेही बसवता येतं. गॅस गळती किंवा आग लागल्यानंतर ते धुराचं प्रमाण तपासतं. धुराचं प्रमाण अधिक वाटल्यास हे उपकरण वापरकर्त्यांच्या मोबाईलवर मेसेज पाठवतं.

## चालणारे दगड - जादू की विज्ञान?



रंजक विज्ञान

तुम्ही कधी चालणाऱ्या दगडांबद्दल ऐकले आहे? अमेरिकेतील कॅलिफोर्निया राज्यात असलेल्या डेथ व्हॅली या उष्ण वाळवंटात अशी एक खरोखरच आश्चर्यकारक घटना पाहायला मिळते. येथे स्लायडिंग स्टोन्स म्हणून ओळखले जाणारे दगड कुणीही ढकलल्याशिवाय आपोआप जागा बदलतात. त्यांच्यामागे वाळूत लांबच लांब रेघा दिसतात. त्यामुळे असे वाटते, की जणू काही दगड स्वतः चालत गेले आहेत.

ही घटना रेसट्रॅक प्लाया नावाच्या सपाट, कोरड्या मैदानावर घडते. चालणाऱ्या दगडांची नोंद सर्वात आधी १९१५ मध्ये झाली, असे मानले जाते. जोसेफ क्रूक नावाच्या खाणकाम करणाऱ्या व्यक्तीने रेसट्रॅक प्लाया भागात हे विचित्र दृश्य पाहिले. त्याला दगडांच्या मागे तयार झालेल्या लांब रेघा दिसल्या आणि त्यामुळे हा प्रकार लोकांच्या लक्षात आला. काही लोकांनी यामागे भुते किंवा गूढ शक्ती असल्याचाही अंदाज लावला. अनेक वर्षे शास्त्रज्ञांनादेखील हे एक कोडेच वाटत होते. पण वैज्ञानिक नेहमीप्रमाणे शांतपणे याचे उत्तर शोधत होते.

खरे तर हे दगड हलण्यासाठी तीन गोष्टी एकत्र येणे आवश्यक असते. पाणी, थंडी आणि वारा. या वाळवंटात कधीकधी हलका पाऊस पडतो आणि मैदानावर अतिशय पातळ पाण्याचा थर तयार होतो. तसेच रात्री तापमान कमी झाल्यावर यापाण्याचे बर्फ तयार होते. सकाळी सूर्य उगवल्यावर बर्फ तुटू लागतो आणि मोठ्या, पातळ बर्फाच्या पत्र्या तयार होतात.

हळूहळू वाहणाऱ्या वाऱ्यामुळे या बर्फाच्या पातळ पत्र्या दगडांना ढकलू लागतात. दगड थेट वाऱ्याने हलत नाहीत. मात्र ते बर्फाच्या मदतीने घसरत पुढे जा–तात. हे सर्व इतक्या हळूहळू घडते की डोळ्यांनी पाहताना दगड हलताना दिसतही नाहीत. पण काही वेळाने पाहिल्यावर ते काही मीटर दूर गेलेले असतात.

२०१४ साली शास्त्रज्ञांनी जीपीएस आणि कॅमेऱ्यांच्या मदतीने या दगडांच्या हालचालींचा पुरावा मिळवला. त्यांनी प्रत्यक्ष पाहिले की बर्फाच्या पातळ थरांमुळे दगड हळूहळू पुढे सरकत होते. त्यामुळे हे गूढ अखेर उलगडले.

याचाच अर्थ हा, की निसर्गात दिसणाऱ्या प्रत्येक आश्चर्यामागे काही ना काही वैज्ञानिक कारण असते. कधी ते लगेच समजते. तर कधी त्यासाठी अनेक वर्षे संशोधन करावे लागते. स्वतः चालणारे दगड हे जादू नाही. हा निसर्ग आणि विज्ञान यांचा एक सुंदर खेळ आहे. निर्जीव दगडांचे हे चालणे आजही लोकांना आश्चर्यचकित करते.

## माणसाची उत्पत्ती माकडापासूनच?

माणूस आणि माकड दोघेही खूप खूप वर्षांपूर्वी एका समान पूर्वजापासून निर्माण झाले. म्हणजेच एका प्राण्यापासून पुढे दोन वेगवेगळ्या प्रजाती निर्माण झाल्या. एकातून आजची माकडे तयार झाली आणि दुसऱ्यातून हळूहळू माणूस विकसित झाला. डार्विन यांच्या कल्पनेनुसार उत्क्रांती टप्प्याटप्प्याने झाली. प्रथम एपसारखे प्राणी तयार झाले. त्यानंतर थोडासा सरळ चालणारा ऑस्ट्रालोपिथेकस तयार झाला. होमोहॅबिलिस हा साधी साधने वापरणारा अधिक विकसित माणूस होता. तर होमोइरेक्टस मनुष्याच्या जवळचा वाटू शकेल असा पूर्णपणे सरळ उभा राहून चालणारा प्राणी होता. आणि शेवटी होमोसेपियन्स म्हणजे आजचा माणूस. हे सर्व बदल सर्वात आधी आफ्रिका खंडात झाले असे शास्त्रज्ञ मानतात. त्यामुळे आफ्रिकेला मानवजातीचे उगमस्थान असेही म्हणतात. थोडक्यात, माणूस हा माकडाचा थेट मुलगा नाही. पण दोघांचे आजोबा एकच होते असे म्हणता येईल.

## टायटॅनिक आजही आठवते!

टायटॅनिक त्या काळातील सर्वात मोठे, खूप आलिशान आणि कधीही न बुडणारे जहाज मानले गेले होते. टायटॅनिकमध्ये प्रवासी आणि जहाजावरील कर्मचारी मिळून सुमारे २२०० लोक होते. टायटॅनिकचे कप्तान एडवर्ड जॉन स्मिथ होते. भव्य जेवणाचे हॉल, स्विमिंग पूल, जिम, वाचनालय, स्टीम बाथ, लिफ्ट अशा सुविधा त्यात होत्या. श्रीमंत प्रवाशांसाठी हॉटेलसारख्या खोल्या आणि खास सेवा होत्या. हे जहाज बांधण्यासाठी त्या काळात सुमारे ७.५ दशलक्ष डॉलर्स खर्च आला होता. १९१२ मध्ये ते पहिल्या प्रवासासाठी ब्रिटनहून अमेरिकेला निघाले आणि हिमनगाला धडकले. सुमारे १५०० लोकांचा या अपघातात मृत्यू झाला. त्यामुळे ती इतिहासातील सर्वात मोठी आणि प्रसिद्ध समुद्री दुर्घटना मानली जाते. प्रचंड आकार, आलिशान सुविधा आणि मजबूत बांधकाम असलेले टायटॅनिक आजही कुणीही विसरू शकत नाही.



## अमर जेलीफिश

अमर जेलीफिश हा निसर्गाने निर्माण केलेला एक अत्यंत अद्भुत आणि आश्चर्यकारक जीव आहे. त्याचे वैज्ञानिक नाव तुर्रिटोप्सिस डोहर्नी असे आहे. हा समुद्रात आढळणारा अतिशय लहान जेलीफिश आहे. पण त्याचे वैशिष्ट्य म्हणजे तो परत लहान होऊ शकतो. साधारणपणे सर्व सजीव जन्मतात, मोठे होतात आणि नंतर मरतात. पण हा जेलीफिश जखमी झाला किंवा त्याला धोका वाटला, तर तो पुन्हा आपल्या बाल अवस्थेत म्हणजेच पोलिप स्टेजमध्ये परत जातो आणि स्वतःचे आयुष्य पुन्हा सुरू करू शकतो. या प्रक्रियेला रिजुवेनेशन म्हणतात. हा जेलीफिश नैसर्गिकरीत्या वृद्धापकाळामुळे मरत नाही. म्हणजेच इतर प्राण्यांसारखा तो म्हातारा होऊन मरत नाही. त्यामुळे तो सैद्धांतिकदृष्ट्या अमर मानला जातो. मात्र तो पूर्णपणे अमर नाही. कारण त्याला इतर प्राणी खाऊ शकतात किंवा त्याला आजारही होऊ शकतात.



# निवडक

## माजी कसोटीपटू गोपीनाथ यांचे निधन



**चेन्नई :** भारताच्या पहिल्या कसोटी विजेत्या क्रिकेट संघाचे सदस्य सीडी गोपीनाथ यांचे गुरुवारी निधन झाले. ते ९६ वर्षांचे होते. त्यांच्या निधनानंतर मुंबईचे ९५ वर्षीय चंद्रकांत पाटणकर हे आता हयात असणारे देशातील सर्वांत वयस्क क्रिकेटपटू आहेत. पाटणकर यांनी १९५५ मध्ये न्यूझीलंडविरुद्ध एकमेव कसोटी सामना खेळला होता.सीडी गोपीनाथ यांच्या निधनाने भारताच्या पहिल्या कसोटी विजयाशी जोडलेली शेवटची मानवी कडीही तुटली असे मानले जात आहे. १९५२ मध्ये चेन्नईतील चेपॉक स्टेडियमवर इंग्लंडविरुद्ध मिळवलेल्या भारताच्या पहिल्या कसोटी विजयाच्या आठवणी ते मोठ्या उत्साहाने सांगत.गोपीनाथ यांनी भारतासाठी आठ कसोटी सामने खेळले. त्यात त्यांनी २४२ धावा केल्या आणि एक अर्धशतक साकारले. १९५१ मध्ये ब्रेबॉर्न येथे कसोटी पदार्पणात त्यांनी इंग्लंडविरुद्ध ५० आणि ४२ धावांची खेळी केली होती. मात्र, त्यानंतरच्या इंग्लंड दौर्यात त्यांनी फारशी समाधानकारक कामगिरी न केल्याने त्यांना पुढे संघात सातत्याने स्थान मिळू शकले नाही. देशांतर्गत क्रिकेटमध्ये मात्र गोपीनाथ यांनी मोठे योगदान दिले. मद्रास संघाकडून त्यांनी ८३ सामन्यांत ४२५९ धावा केल्या, ज्यात नऊ शतकांचा समावेश होता. न्यूझीलंड दौर्यात दक्षिण विभागाकडून खेळताना त्यांनी दुसर्या डावात केलेली १७५ धावांची खेळी विशेष गाजली. खेळाडू म्हणून कारकीर्द संपल्यानंतर त्यांनी राष्ट्रीय निवड समितीचे अध्यक्ष म्हणून काम केले.

## ब्राझीलच्या गोलंदाजाचा जगभरात डंका

**ब्राझील :** ब्राझीलकडून खेळणाऱ्या महिला क्रिकेटपटूने टी -२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एकाच सर्वाधिक विकेट्स घेण्याचा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे. बीसीए कालाहारी महिला टी -२० ट्रॉफी स्पर्धेत लेसोथो आणि ब्राझील हे दोन्ही महिलांचे क्रिकेट संघ आमने-सामने आले होते. प्रथम फलंदाजी करताना या संघाने २० षटकांअखेर २०२ धावांचा डोंगर उभारला. लेसोथो संघाला हा सामना जिंकण्यासाठी २० षटकात २०३ धावांचा पाठलाग करायचा होता. या धावांचा पाठलाग करताना लेसोथो संघाचा डाव पत्त्यांच्या



बंगल्याप्रमाणे कोसळला. लेथोसो संघाचा संपूर्ण डाव अवघ्या ६.२ षटकात १३ धावांवर आटोपला. ब्राझील संघातील गोलंदाज लॉरा कार्डोसो. या गोलंदाजाने ३ षटकं टाकली. यादरम्यान तिने ९ फलंदाजांना बाद केले. म्हणजे अवघ्या १८ चेंडूत तिने ९ फलंदाजांना माघारी धाडलं. यासह ती टी -२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या इतिहासात सर्वाधिक ९ विकेट्स घेणारी ती जगातील पहिलीच गोलंदाज ठरली आहे. याआधी टी -२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील पुरुष किंवा महिलांच्या क्रिकेटमध्ये कुठल्याही गोलंदाजाला ९ विकेट्स घेता आल्या नव्हत्या. याआधी हा रेकॉर्ड पुरुषांच्या टी -२० क्रिकेटमधील भूटानच्या सोनम येशेच्या नावावर होता. त्याने ८ विकेट्स घेतल्या होत्या. तर महिलांच्या टी -२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये इंडोनेशियाच्या रोहमालियाने ७ विकेट्स घेतल्या होत्या. आता ९ विकेट्सचा रेकॉर्ड कोण मोडणार? हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

## लखनौचा सलग दुसरा विजय

**मुंबई :** आयपीएल २०२६ मधील १५ वा सामना केकेआर वि. लखनौ सुपर जायंट्स यांच्यात पार पडला. शेवटच्या ओव्हरपर्यंत रंगलेल्या सामन्यामध्ये लखनौने विजय मिळवला. लखनौच्या मुकुल चौधरी या युवा खेळाडूने एकट्याच्या दमावर सामना फिरवला. नाबाद ५४ धावांची अर्धशतकी खेळी करत लखनौला दुसरा विजय मिळवून दिला. लखनौचे प्रमुख फलंदाज माघारी परतले होते, केकआर हा सामना जवळपास जिंकल्यात जमा होती. पण मुकूल चौधरीने एकट्याने संपूर्ण सामना फिरवला. शेवटच्या ओव्हररध्ये १४ धावांची गरज होती, पठ्ठ्याने कसलाही दबाव न घेता विजय मिळवला. या विजयासह लखनौने चार गुण मिळवत पॉइंट टेबमध्ये थेट पाचव्या स्थानी झेप घेतली आहे. केकेआरला



आपला पहिला विजय अद्यापही मिळवता आला नाही.केकेआरने २० ओव्हरमध्ये १८१-४ धावा केल्या होत्या. या धावांचा लखनौ संघाने यशस्वीपणे पाठलाग केला आहे. लखनौकडून आयुष बदोनी ३४ चेंडूत ५४ धावा आणि मुकूल चौधरी याने २७ चेंडूत नाबाद ५४ धावा या दोघांनी अर्धशतकी खेळी केली. इतर कोणत्याही फलंदाजाला २५ धावांचा टप्पा ओलांडता आला नाही. निकोलस पूरन १३ धावा, ऋषभ पंत १० धावा, अब्दुल समद ३ धावा हे स्वस्तात परतले होते, मात्र मुकूलने सात षटकार आणि दोन चौकारांची आतषबाजी करत सामना जिंकवला.

## विद्यार्थ्यांना मोफत कराटे प्रशिक्षण



**रामराज :** रामराज येथील रायगड जिल्हा परिषदच्या शाळेमध्ये मोफत कराटे प्रशिक्षण दोन महिने देण्यात आले शाळेतील ३५ मुला-मुलींनी सहभाग घेतला होता. यामध्ये मुलींना स्वसंरक्षण तसेच कराटे बेसिक फाईट शिकवण्यात आली. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या मुला-मुलींना जय शोतो कान कराटे अँड स्पोर्ट अकॅडमी संघटनेचे अध्यक्ष संतोष रामचंद्र कवळे नवगाव तसेच रामराज रा. जि. प. शाळेचे मुख्याध्यापक शिवशरण पाटील, भारतीय ऑलिंपिकची मान्यता असलेल्या खेलो इंडिया क्रीडा स्पर्धेत सिल्वर मेडल प्राप्त केलेली श्रमिका श्रीधर पाटील महाजने यांच्या शुभहस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच राष्ट्रीय मेडलिस्ट आणि मुंबई येथे झालेल्या कार्यक्रमात राष्ट्रीय पुरस्कार मिळवणारी कराटे ब्लॅक बेल्ट प्रशिक्षक लायबा शेजाद अन्सारी रामराज, कराटे ब्लॅक बेल्ट उत्कृष्ट फायटर विश्वास कामी तसेच कराटे ब्लॅक बेल्ट शालेय मुंबई विभागीय गोल्ड मेडलिस्ट जिग्नेश गजानन कोळी अलिबाग, गावातील प्रतिष्ठित नागरिक, पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप स्पर्धा २०२७

# १२ संघांचा रणसंग्राम

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप स्पर्धेचं चौथं पर्व सुरू असून २०२७ साली अंतिम सामना होणार आहे. यासाठी ९ संघांमध्ये टॉप २ मध्ये जागा मिळवण्याची चुरस सुरू आहे. असं असताना आयसीसीने पाचव्या पर्वात बदल करण्याची तयारी केली आहे. या पर्वात संघांची संख्या ९ वरून १२ करण्याची तयारी सुरू झाली आहे.

रिपोर्टनुसार, पुढच्या पर्वात तीन संघ नव्याने दाखल होणार आहेत. हे पर्व २०२७ पासून सुरू होणार आहे. जय शाह यांच्या नेतृत्वात आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप स्पर्धेत झिम्बाब्वे, आयर्लंड आणि अफगाणिस्तान या संघांचा सहभाग नोंदवला जाईल. तर भारत, पाकिस्तान, ऑस्ट्रेलिया, दक्षिण अफ्रिका, न्यूझीलंड, वेस्ट इंडिज, इंग्लंड, बांग्लादेश आणि श्रीलंका हे संघ आधीपासून या स्पर्धेत खेळत आहे. तीन संघ नव्याने दाखल होताच या स्पर्धेच्या स्वरूपात बदल होण्याची शक्यता आहे.

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपमध्ये प्रत्येक दोन वर्षात संघ आपल्या आवडीच्या ६ संघांसोबत आपल्या देशात आणि विदेशात मालिका खेळते. यापैकी तीन मालिका देशात, तर तीन मालिका विदेशात होतात. यानंतर गुणतालिकेत विजयी टक्केवारीच्या आधारावर क्रमवारी ठरते. यात टॉप २ संघ अंतिम फेरीत खेळतात. पण तीन संघांची एन्ट्री होताच यात बदल होण्याची शक्यता आहे.

आता हा बदल कसा होतो हे पाहणं औत्सुक्याचं ठरेल. प्रत्येक संघासोबत दोन सामन्यांची कसोटी मालिका होणार की आणखी हे आता सांगणं कठीण आहे. पण कसोटी क्रिकेटचा दर्जा राखला जाईल असं नियोजन केलं जाईल. तसेच कसोटी क्रिकेटचा ओढाही वाढेल.




### वर्ल्ड टेस्ट चॅम्पियन

आतापर्यंत तीन संघ वर्ल्ड टेस्ट चॅम्पियन ठरले आहेत. पहिलं पर्व २०१९-२०२१ ला पार पडलं. यात न्यूझीलंडने बाजी मारली आणि पहिलं जेतेपद मिळवलं. त्यानंतर २०२१-२०२३ मध्ये ऑस्ट्रेलियाने विजयी पताका फडकावली. तर २०२३-२०२५ च्या अंतिम फेरीत दक्षिण अफ्रिकेने ऑस्ट्रेलियाला पराभूत केलं आणि जेतेपदावर नाव कोरलं. भारताने पहिल्या दोन पर्वात अंतिम फेरी गाठली होती. पण दोन्ही वेळेस पदरी निराशा पडली. तिसऱ्या पर्वात तिसऱ्या क्रमांकावर राहिल्याने अंतिम फेरी खेळता आली नाही. यंदाच्या पर्वातही भारताची कामगिरी काही खास नाही. त्यामुळे अंतिम फेरी गाठेल की नाही हे सांगणं कठीण आहे.

# पेण बाप्पा संघ उपांत्य फेरीसाठी पात्र



| पोयनाड | प्रतिनिधी |

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पुरुषांच्या खुल्या गटाची टी-ट्वेन्टी प्रीमियर लिग क्रिकेट स्पर्धा सध्या पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर सुरू आहे.स्पर्धेतील प्ले ऑफ फॉरमॅट मधील एलिमिनेटर फेरीच्या सामन्यात,पेण बाप्पा संघाने चमकदार कामगिरी करत उपांत्य फेरीच्या सामन्यासाठी आपला प्रवेश निश्चित केला आहे.

शुक्रवारी झालेल्या अटीतटीच्या सामन्यात पेण बाप्पा संघाने के.श्री वॉरियर्स संघावर ३ गडी राखून विजय मिळवला आहे. प्रथम फलंदाजी करतांना के.श्री वॉरियर्स संघाने निर्धारित वीस षटकांमध्ये ७ गडी गमावत १५४ धावसंख्या उभारली त्यामध्ये निकुंज विठलांनी यांनी दमदार फलंदाजी करत सर्वाधिक ४४ धावा काढल्या तर सलामीवीर फलंदाज ओंकार गावडे यांनी २६, विराज कुथे २७, तेजस गिलबिले यांनी २२ धावांची खेळी संघासाठी केली.पेण संघाकडून जबजीत सिंह यांनी २ ऋषभ शर्मा व सागर मुळे यांनी प्रत्येकी एक फलंदाज बाद केला.

१५४ धावसंख्येचा पाठलाग करतांना पेण बाप्पा संघानी शेवटच्या षटकात संघाचे ७ फलंदाज बाद झाले असतांना १५५ धावसंख्येचे लक्ष पूर्ण केले. त्यामध्ये भावेश पाटील यांनी चौफेर फटकेबाजी करत सर्वाधिक ५९ धावा काढल्या त्याला दुसऱ्या बाजूने विनय ठाकूर यांनी २६, सागर मुळे २५ तर शेखर भगत यांनी बहुमूल्य २३ धावांचे योगदान संघाला देऊन विजय मिळवून दिला.

# न्यू पनवेलमध्ये मिशन लक्ष्यवेध टेबल टेनिस

- विभागीय निवड चाचणीचा बिगुल
- ३४ अव्वल खेळाडूंमध्ये चुरस

| रायगड | प्रतिनिधी |

क्रीडा क्षेत्रातील भावी जागतिक विजेते घडवण्याच्या उद्देशाने शासनाच्या मिशन लक्ष्यवेध अंतर्गत मुंबई विभागीय टेबल टेनिस निवड चाचणीला न्यू पनवेल येथे (दि.९) दिमाखात सुरुवात झाली.

या निवड चाचणीसाठी संपूर्ण विभागातून ८३ खेळाडूंनी नोंदणी केली होती. मात्र, मिशन लक्ष्यवेधच्या कडक निकषांनुसार छाननी केल्यानंतर केवळ ३४ खेळाडू या चाचणीसाठी पात्र ठरले आहेत. सहभागी खेळाडूंमध्ये २ आंतरराष्ट्रीय, १५ राष्ट्रीय आणि १८ राज्यस्तरीय पदक विजेत्यांचा समावेश असल्याने स्पर्धेची पातळी अत्यंत उच्च दर्जाची आहे. केवळ सामन्यांतील विजय-पराजय न पाहता, खेळाडूच्या सर्वांगीण क्षमतेवर भर देण्यात येत आहे. यासाठी प्रामुख्याने तीन स्तरांवर मूल्यांकन केले जात आहे:

मिशन लक्ष्यवेधच्या माध्यमातून निवडल्या जाणाऱ्या या खेळाडूंना पुढील टप्प्यावर विशेष प्रशिक्षण आणि सुविधा पुरवल्या जाणार आहेत, जेणेकरून ते ऑलिम्पिकसारख्या जागतिक स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करू शकतील.

चेस कॅंडिडेट्स स्पर्धा


# वैशाली ड्रॉसह अव्वल स्थानी

## दिव्या आणि प्रज्ञानानंदा हरले

| मुंबई | प्रतिनिधी |

भारतीय ग्रँडमास्टर वैशाली रमेशबाबूने चेस कॅंडिडेट्स स्पर्धेच्या महिला गटातील १०व्या फेरीत युक्रेनच्या एना मुजिचुकविरुद्ध ड्रॉ खेळला. या ड्रॉमुळे मिळालेल्या अर्ध्या गुणांसह वैशाली अव्वल स्थानावर पोहोचली. दुसरीकडे, भारतीय ग्रँडमास्टर दिव्या देशमुखला रशियाच्या अलेक्झांड्रा गोर्याचकिनाविरुद्ध पराभव पत्करावा लागला.

ओपन गटात भारताचा ग्रँडमास्टर आर प्रज्ञानानंदाला उझबेकच्या जावोखिर सिंदारोव्हविरुद्ध पराभवाला सामोरे जावे लागले. या पराभवानंतर प्रज्ञानानंदा ७व्या स्थानावर घसरला. ही स्पर्धा



सायप्रसच्या पाफोस येथे खेळली जात आहे. अजून चार फेऱ्या बाकी आहेत.

१०व्या फेरीत वैशालीला फारशी अडचण आली नाही आणि सामना चढ-उतारांशिवाय ड्रॉ राहिला. झू जिनेरला बिबिसारा असाउबायेवाविरुद्ध पराभवाला सामोरे जावे लागले, ज्यामुळे वैशालीला आघाडी मिळाली. स्पर्धा अत्यंत रोमांचक बनली आहे. टॉप-६ खेळाडूंमध्ये १ गुणाचा फरक आहे. झू जिनेर आणि अन्ना मुजिचुक ५.५ गुणांसह वैशालीपेक्षा अर्धा गुण मागे आहेत. ११व्या फेरीत वैशालीचा सामना गोरियाचकिनाशी होईल, तर दिव्या झू जिनेरविरुद्ध खेळेल. गेल्या वेळी भारताच्या डी. गुकेशने हे जिंकून चीनच्या डिंग लिरेनला आव्हान दिले होते. तेव्हा गुकेश कॅंडिडेट्स टूर्नामेंट जिंकणारा भारताचा दुसरा खेळाडू ठरला होता. ५ वेळा वर्ल्ड चॅम्पियन राहिलेल्या विश्वनाथन आनंदने १९९५ मध्ये पहिल्यांदा कॅंडिडेट्स टूर्नामेंट जिंकली होती.

कॅंडिडेट्स टूर्नामेंट बुद्धिबळ जगातील सर्वात महत्त्वाचा कार्यक्रम मानला जातो, कारण यामुळेच वर्ल्ड चॅम्पियनला पुढील आव्हान देणारा कोण असेल हे ठरते. याला वर्ल्ड चॅम्पियनशिपची सेमीफायनल असेही म्हटले जाते. विजेत्याला थेट वर्ल्ड चॅम्पियनसोबत खेळण्याची संधी मिळते. ही बुद्धिबळाची सर्वात मोठी पात्रता स्पर्धा आहे.

कॅंडिडेट्स टूर्नामेंट दर दोन वर्षांनी होते आणि विजेता वर्ल्ड चॅम्पियनला आव्हान देतो. ओपन गटातील विजेत्याचा सामना भारताच्या डी. गुकेशसोबत, तर महिला गटातील विजेत्याचा सामना चीनच्या जू वेनजुनसोबत होईल.

# आशियाई चॅम्पियनशिपमध्ये भारताचा सुवर्ण चौकार

## जरीन-लवलीना यांच्या नावावर कांस्यपदके

| मंगोलिया | वृत्तसंस्था |

मंगोलिया येथे झालेल्या आशियाई बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये भारतीय महिला संघाने अव्वल स्थान पटकावले. ४ सुवर्ण, २ रौप्य आणि ४ कांस्य पदकांसह एकूण १० पदके जिंकली. संघातील प्रत्येक खेळाडू पदक जिंकून परतली. प्रशिक्षक सँटियागो निवा यांच्या नेतृत्वाखाली मीनाक्षी, प्रीती, प्रिया आणि अरुंधती यांनी सुवर्णपदके जिंकली.

मीनाक्षीने मंगोलियाच्या नोमुंदारी एन्ख-अमगालनला हरवून पहिले सुवर्ण मिळवून दिले. त्यानंतर प्रीतीने चायनीज तैपेईच्या तीन वेळा



विश्वविजेत्या हुआंग शियाओ-वेनला हरवले. प्रीतीने टोकियो ऑलिम्पिक कांस्यपदक विजेत्या हुआंगविरुद्ध आपले वर्चस्व कायम ठेवले. तर, प्रिया घनघासने उत्तर कोरियाच्या वोन उन-ग्योंगला हरवून सुवर्णपदक जिंकले.अरुंधती चौधरीने कझाकिस्तानच्या बाकित सेइदीशला हरवून भारतासाठी चौथे सुवर्णपदक जिंकले.

चारही भारतीय खेळाडूंनी अंतिम फेरीत विजय मिळवून अव्वल स्थान पटकावले.

यापूर्वी आठवड्यात निखत झरीन (५४ किलो), अंकुशिता बोरो (६५ किलो), लव्हलिना बोरगोहेन (७५ किलो) आणि पूजा राणी (८० किलो) यांनी उपांत्य फेरीत पराभव पत्करल्यानंतर कांस्यपदके जिंकली होती. काही वजन गटांमध्ये कमी खेळाडू असल्यामुळे लव्हलिना, पूजा आणि अल्फिया यांना केवळ सहभागासाठीच पदक मिळाले.

# ॲटलेटिकोचा बार्सिलोनाला धक्का

| बार्सिलोना | वृत्तसंस्था |

ज्युलियन अल्वारेझ आणि ॲलेक्सांडर सोरलोथ यांनी केलेल्या गोलच्या जोरावर ॲटलेटिको माद्रिदने युएफा चॅम्पियन्स लीग फुटबॉलच्या उपांत्यपूर्व फेरीतील पहिल्या टप्प्याच्या लढतीत बार्सिलोनाला २-० असा पराभवाचा धक्का दिला. दिएगो सिमिओने यांच्या १५ वर्षांच्या प्रशिक्षकपदाच्या कार्यकाळात ॲटलेटिको संघाला बार्सिलोनाचे घरचे मैदान असलेल्या कॅम्प नाऊ स्टेडियमवर प्रथमच विजय मिळवता आला.

भरीव सांघिक कामगिरी आणि मोक्याच्या क्षणी सर्वोत्तम खेळ केल्याने आम्ही यश मिळवले, असे सिमिओने म्हणाले. सिमिओने यांचा ॲटलेटिको संघ बचावात्मक खेळासाठी ओळखला जातो. या सामन्यातही त्यांनी याच योजनेसह खेळ केला. सुरुवातीच्या मिनिटांत बार्सिलोनाने चेंडूवर ताबा राखताना गोलच्या संधी निर्माण केल्या.

त्यांना चेंडू गोलजाळ्यात मारता आला नाही. ४४व्या मिनिटाला या सामन्याचे चित्र पालटले. बार्सिलोनाचा प्रमुख बचावपटू पाओ



कुबारसीला लाल कार्ड मिळाले. पुढच्याच मिनिटाला ज्युलियन अल्वारेझने गोलकक्षाबाहेरून अप्रतिम फ्री-किक मारत बार्सिलोनाला आघाडी मिळवून दिली. उत्तरार्धात १० खेळाडूंसह खेळूनही बार्सिलोनाने पुनरागमनाचा प्रयत्न केला. उजव्या बाजूने लामिन यमालने ॲटलेटिकोच्या बचावपटूंना दडपणाखाली ठेवले. मात्र, त्याच्या प्रयत्नांना यश मिळाले नाही. ॲटलेटिकोने चेंडूचा ताबा मिळवण्याच्या हेतूने उंचपुरा आघाडीपटू सोरलोथला मैदानावर उतरवले. सोरलोथने आपले काम चोख केले, शिवाय ७१व्या मिनिटाला ॲटलेटिकोची आघाडीही दुप्पट केली. त्यानंतर ॲटलेटिकोने बचाव भक्कम राखत विजय साकारला. आता परतीची लढत १४ एप्रिलला खेळवली जाईल.

# महाराष्ट्राच्या मुला-मुलींची विजयी घोडदौड

राष्ट्रीय मुष्टियुद्ध स्पर्धा

| नागपूर | वृत्तसंस्था |

महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणाऱ्या नागपूरच्या समीक्षा सिंग जम्मू-काश्मीरच्या सोनियाचा ५-० गुणांनी धुव्वा उडवून महाराष्ट्र मुष्टियुद्ध संघटनेतर्फे आयोजित १७ वर्षांखालील राष्ट्रीय मुष्टियुद्ध स्पर्धेत ५७ मुलींच्या गटाची उपांत्यपूर्व फेरी गाठली.

महाराष्ट्राचेच संस्कार, गोपाल, पार्थ यांनीही आपापले सामने जिंकून मुलांच्या गटाच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश निश्चित केला.




आमदार निवासात सुरू असलेल्या या स्पर्धेतील ४४ किलो वजन गटात सहभागी संस्कारने आसामच्या दीपज्योतीला ४-१ ने, ५० किलो वजन गटात गोपालने मणिपूरच्या लांचेनबा सिंगचा ५-० ने आणि ५७ किलो गटात पार्थने हरियानाच्या गुरमेलवर ५-० ने सहज विजय नोंदविला.

## वेश्वी येथे कबड्डी स्पर्धा

**अलिबाग:** ॐकार क्रीडा मंडळ यांच्यातर्फे रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने वेश्वी येथे कै. पूर्वा भगत स्मृती चषक जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत शनिवारी पुरुष संघांची स्पर्धा खेळविण्यात येणार आहे. या स्पर्धेत ३२ संघाना प्रवेश देण्यात येणार आहे. रविवारी (दि.१२) महिला संघांची स्पर्धा होईल.


आशियाई बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धा | सिंधू, प्रणोय, उन्नतीचे आव्हान संपुष्टात

# आयुष शेट्टीची उपांत्यपूर्व फेरीत धडक

| निंगबो (चीन) | वृत्तसंस्था |

भारताचा युवा खेळाडू आयुष शेट्टी याने आशियाई बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेतील पुरुष एकेरी गटामध्ये उपांत्यपूर्व फेरीमध्ये प्रवेश केला. भारताच्या इतर खेळाडूंना मात्र पराभवाला सामोरे जावे लागले. पी. व्ही. सिंधू, एच. एस. प्रणोय व उन्नती हुडा यांच्याकडून एकेरी गटातील लढतीत निराशा झाली.

आयुष शेट्टी याने चीन तैपईच्या ची यू जेन याच्यावर २१-१६, २१-१२ असा सरळ दोन गेममध्ये विजय संपादन केला. आयुष शेट्टी याने ४१ मिनिटांमध्ये विजयाला गवसणी घातली. आता पुढील फेरीमध्ये त्याच्यासमोर इंडोनेशियाच्या जोनाथन ख्रिस्ती याचे आव्हान असणार आहे.



पी. व्ही. सिंधू हिच्याकडून सपशेल निराशा झाली. चीनच्या वँग झियी हिने पी. व्ही. सिंधू हिला २१-१८, २१-८ असे नमवले. भारताच्या फुलराणीचा ४६ मिनिटांमध्ये पराभव झाला. पुरुषांच्या एकेरीमध्ये एच. एस. प्रणोय याने झुंज दिली, पण त्याचाही पराभव झाला. चीनच्या वेंग हाँग यांग याने एच. एस. प्रणोय याला २१-१२, २१-१९ असे पराभूत केले.महिला एकेरीतील अन्य लढतीत भारताच्या उन्नती हुडा हिलाही प्रभाव टाळता आला नाही. टी. मियाझाकी हिने उन्नती हुडा हिला सरळ दोन गेममध्ये नमवले. टी. मियाझाकी हिने उन्नती हुडाचे आव्हान २१-१७, २१-९ असे परतवून लावले.

चेन टँग जी-तोह वेई या जोडीने ध्रुव कपिला-तनीषा क्रॅस्टो या जोडीवर २१-१३, २१-१४ असा सरळ दोन गेममध्ये विजय संपादन केला. पाचवी मानांकित जोडी वाय. फुकूशिमा-एम. मातसमोतो यांनी कोनजेंगबाम-श्रुती मिश्रा या भारतीय जोडीवर २१-१०, २१-१३ असा सहज विजय मिळवला.

### अव्वल दर्जाचा खेळ

**आयुष शेट्टी-ची यू जेन यांच्यामधील लढतीत पहिल्या गेममध्ये चुरस पाहायला मिळाली. सुरुवातीला १०-६ असा पिछाडीवर असलेल्या आयुष शेट्टी याने १२-१२ अशी बरोबरी साधली. त्यानंतर चीन तैपईच्या खेळाडूकडून चुका झाल्या व आयुष शेट्टी याने १८-१४ अशी आघाडी घेत पुढे जाऊन पहिला गेम २१-१६ असा आपल्या नावावर केला. पुढील गेममध्ये आयुष शेट्टीच्या अव्वल दर्जाच्या खेळासमोर ची यू जेन याचा निभाव लागला नाही. अखेर त्याला २१-१२ अशी हार पत्करावी लागली.**

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)